## आपत्ती दिल्लीवर नाही तर भाजपवर..

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :**
दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान मोदींच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. 'आप' हे दिल्लीतील 'आपत्तीचे सरकार' असल्याचे पंतप्रधानांनी शुक्रवारी सांगितले.

त्यावर केजरीवाल म्हणाले, 'दिल्लीवर आपत्ती कोसळल्याचे पंतप्रधानांनी अनेकदा सांगितले आहे. आपत्ती दिल्लीत नाही तर भाजपवर आली आहे. तीन प्रकारच्या आपत्ती आहेत, पहिली आपत्ती- भाजपकडे मुख्यमंत्री चेहरा नाही. दुसरे म्हणजे, निवडणुका कोणत्या मुद्द्यावर लढायच्या आहेत, याचे नरेटिव्ह भाजपकडे नाही, तिसरे म्हणजे, निवडणुका कोणत्या अजेंड्यावर लढवायच्या आहेत, याची माहिती नाही.

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २७७ * * नागपूर * शनिवार, दिनांक ४ जानेवारी २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

### अग्राग्रलेख
### खरीखरी..

## श्रीनाथ की अनाथ

जगात बापाची सेवा करणारे पुत्र आणि पुत्री नाहीत असे नाही. त्यांचे आपल्या देशातल्या समस्त बापांच्या तर्फे अभिनंदन केलेच पाहिजे. परंतु या देशात असेही कुपुत्र आणि कुपुत्री आहेत की, ज्यांना आपल्या जन्मदात्या आई-बापांची सेवा करणे हा विषय तर समजतच नाही. त्या उलट त्यांच्या कष्टाने कमावलेल्या संपत्तीला हडप करून कायमस्वरूपी हे दिवटे आणि दिवटे असे गडप होतात की, त्यांना खेटरेही मारता येत नाहीत. 2023 सालात पद्मश्री पुरस्कार मिळालेले श्रीनाथजी खंडेलवाल हे आजच्या विषयाचे नायक आहेत. हे श्रीनाथजी खंडेलवाल म्हणजे एक संवेदनशील साहित्यिक, अनेक पुस्तके लिहिणारे, अनेक दुर्बोध पुस्तकांचे सुबोध भाषांतर करणारे एक विद्वान होते. पुण्यक्षेत्र वाराणसीच्या एका कुष्ठरोग्यांच्या वृद्धाश्रमात त्यांनी आपल्या अखेरचे दिवस घालवले. हे खंडेलवाल चांगले लेखक होते. त्यांची बरीच पुस्तके प्रकाशित झाली होती. जवळपास 250 हे 300 च्या संख्येत त्यांची ग्रंथसंपदा आहे. यांच्या पुस्तकाच्या विक्रीतून झालेली मिळकत किती असावी, असा प्रश्न जर विचारला तर त्याचे उत्तर आहे. जवळपास 80 ते 120 कोटी रुपये, अशा या साहित्यिकाच्या आणि कोमल, कवी हृदयाच्या लेखकाने आपला सर्व कारभार आपल्या पुत्र आणि पुत्रीकडे सोपवला होता. तिथेच दुर्दैवाची सुरुवात झाली असावी. विश्वास टाकणारा बाप भेटला पण हे पुत्र आणि पुत्री दोघेही जण कुपुत्र आणि कुपुत्री झाले. त्यांनी जिवंतपणी आपल्या जन्मदात्या बापाला वृद्धाश्रमाच्या नरक यातना झेलावयास भाग पाडले. त्या बिचाऱ्या बापाला कोणताही आजार नव्हता. तरीही त्यांना कुष्ठरोग्यांबरोबर देहावसनापर्यंत म्हणजेच अंतिम काळापर्यंत राहावे लागले. त्यांचा एवढाच दोष होता की, संधीसाधू अपत्यांवर त्यांनी विश्वास ठेवला होता. खंडेलवाल यांची ही दोन अपत्ये इतकी क्रूर आणि मग्रूर निघाली की, बापाच्या अंत्यविधीच्या क्षणी त्यांना काही सामाजिक कार्यकर्त्यांनी निरोप देऊनही बापाचे अंत्यदर्शन घेण्याचे साधे सौजन्यही त्यांनी दाखवले नाही. या दोन प्राण्यांना जर खरोखरच नरक असेल. तर त्यांना घोर कष्टकारी अशा कुंभीपाक नावाच्या नरकात जावे लागेल. नरक लोकात वैतरणी नावाची नदी असते. ती नदी पार करताना त्या घाणेरड्या नदीतील जलचर अशा कुकर्मी आणि पापी लोकांच्या शरीराचे लचके तोडतात. अशीच शिक्षा यांना मिळाली पाहिजे. वाराणसी म्हणजे काशी, या पवित्र पुण्यभूमीत जिचे नाव काशी आहे. तिथे अशा प्रकारची 'शी' करणाऱ्या या कुळविरोधी अपत्यांना त्यांचे कपडे काढून फटके मारले पाहिजेत. आपल्या मराठीत एक म्हण आहे. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' पण हे खरोखरचे गुंडी आणि गुंडा बापासाठी दंडा घेऊन बापालाच हाकलायला सरसावले. पद्मश्री पुरस्कार प्राप्त एका संवेदनशील लेखकाला आपलीच अपत्ये असलेल्या अशा आपल्याच रक्तातील गुंडांसमोर किती यातना सहन कराव्या लागल्या असतील. याची कल्पना केली. तर आपल्या अंगावर शहारे उभे राहतात. डोळ्यातून पाण्याच्या धारा वाहू लागतात. आपण या बिचाऱ्या दुर्दैवी खंडेलवाल यांना पाहिले नाही. त्यांचा आपला काही संबंध नाही, त्यांचे आपले काही नाते नाही. तरी आपल्या मनात त्यांच्याबद्दल कणव निर्माण होते. पण ज्यांच्या संपत्तीच्या बिळावर असे संधीसाधू नाग आणि नागिण फणा काढून बसले होते की त्यांच्या व मनातून आणि वागणुकीतून या बिचाऱ्या साहित्यिकाला म्हातारपणी किती अयाचित याचना झेलाव्या लागल्या असतील. त्याची कल्पनाही करवत नाही. चार-पाच दिवसांपूर्वी एका मुलाने तो इंजिनिअरिंगच्या परीक्षेत वारंवार नापास होतो. म्हणून हटकल्यावर आणि तो जिच्यावर लट्टू होता. ती मुलगी पसंत नाही असे आईबापाने म्हटल्यावर त्या दिवट्याने चक्क आईबापांचा खूनच करून टाकला. ही घटना नागपुरातील आहे. आपल्या नात्यातील हे भीषण वास्तव आजकाल वृत्तपत्रांना वेगवेगळ्या प्रकारे दररोज छापावे लागत आहे. ही मनाला वेदना देणारी बाब आहे. यावर जेवढे लिहावे तेवढे कमीच आहे. मात्र आजच्या कथेचे मूळ नायक, स्वर्गारोहण करणाऱ्या 'पद्मश्री' प्राप्त श्रीनाथ खंडेलवालांना आम्ही श्रद्धांजली अर्पण करतो आणि पुत्र आणि पुत्री म्हणून असलेल्या दोन कुलांगरांना असा शाप देतो की, यांची बोटे कुष्ठरोगाने झडावी आणि त्यांनाही अशीच परिस्थिती येऊन, त्यांच्या जखमांत किडे पडावेत. अजून बरेच आहे, पण त्या कुलांगार मंडळींची लायकी तेवढीच आहे.

इति लेखनसीमा !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023



# आता थांबणार नाही!
# परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
राज्यातील उद्योगधंदे परराज्यात जात असल्यावरून महाराष्ट्र सरकारवर सातत्याने टीका होत असताना आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंदाची बातमी दिली आहे.

सहा महिन्यांतील परदेशी गुंतवणूक वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के जमा झाली आहे. अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे, अशी माहिती फडणवीसांनी दिली.

महाराष्ट्र आता थांबणार नाही! वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के एफडीआय अवघ्या ६ महिन्यांत, असं सांगत फडणवीस म्हणाले, आपला महाराष्ट्र सातत्याने परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करण्यात अग्रेसर आहे. आता २०२४-२५ या आर्थिक वर्षातील सप्टेंबरला संपलेल्या दुसऱ्या तिमाहीची आकडेवारी आली आहे.

त्यात अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. गेल्या ४ वर्षांतील सरासरी पाहिली तर १,१९,५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे.

याचाच अर्थ संपूर्ण वर्षभराच्या ९४.७१ टक्के गुंतवणूक ही फक्त ६ महिन्यात आली आहे. मी महाराष्ट्राचे मनःपूर्वक अभिनंदन करतो, माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वात आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड अशीच कायम राहील, अशी ग्वाही देतो.

देवेंद्र फडणवीसांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, सहा महिन्यांतील परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र एक नंबरला असताना कर्नाटक दुसऱ्या, गुजरात तिसऱ्या, दिल्ली चौथ्या आणि तामिळनाडू पाचव्या क्रमांकावर आहे. यापूर्वी महाराष्ट्र तिसऱ्या स्थानी होता.

## मीही शीशमहल बांधू शकलो असतो



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :**
विधानसभा निवडणुकीपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीत 4500 कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. दिल्लीतील अशोक विहारमध्ये बांधलेल्या 1,675 फ्लॅटचे उद्घाटनही पंतप्रधानांनी केले.

गरिबांसाठी नवीन घराचे उद्घाटन करताना पीएम मोदी म्हणाले, मीही शीशमहल बांधू शकलो असतो. पण मी स्वतःचे घर कधीच बांधले नाही, 10 वर्षात मी 4 कोटी गरीब कुटुंबांना कायमस्वरूपी घरे दिली आहेत. आज ज्यांना नवीन घरं मिळाली आहेत, त्यांच्या स्वाभिमानाचं हे घर आहे. ते स्वाभिमानाचे घर आहे. हे नवीन आशा आणि नवीन स्वप्नांचे घर आहे.

याशिवाय दिल्ली विद्यापीठात 600 कोटी रुपयांच्या 3 नवीन प्रकल्पांची पायाभरणीही पंतप्रधानांनी केली. यात रोशनपुरा येथील वीर सावरकर महाविद्यालयाच्या इमारतीचा समावेश आहे.

पंतप्रधान म्हणाले, आज भारत हे राजकीय आणि आर्थिक स्थिरतेचे प्रतीक बनले आहे. हे वर्ष भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा अधिक मजबूत करण्याचे वर्ष असेल.

आज ज्या प्रकल्पांचे उद्घाटन झाले ते गरीबांसाठी घरे, शाळा-कॉलेज प्रकल्प आहेत. झोपडपट्टीत भाड्याच्या ऐवजी कायमस्वरूपी घर मिळणे. घर एक नवीन सुरुवात आहे. आज संपूर्ण देश विकसित भारताच्या उभारणीत व्यस्त असल्याचे त्यांनी सांगितले.

## मुंडे बंधू भगिणींचा पत्ता कट?
### अजित पवार पालकमंत्री होणार..



■ **वृत्तसंस्था बीड, दि. ३ :**
बीडच्या संतोष देशमुख हत्याकांडामुळे अवघ्या महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. या घटनेमुळे बीड जिल्ह्यातील कथित गुन्हेगारीचा मुद्दा चव्हाट्यावर आला आहे. ही गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी सर्वपक्षीय आमदारांनी बीडचे पालकत्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घ्यावे अशी मागणी केली आहे. त्यावर अजित पवारांनी यासंबंधी सकारात्मकता दर्शवल्याची माहिती आहे.

बीडच्या पालकमंत्रीपदावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात चर्चा झाली आहे. या चर्चेत बीडचे पालकमंत्रीपद धनंजय मुंडे किंवा त्यांच्या भगिनी मंत्री पंकजा मुंडे यांना न देण्यावर मतैक्य झाल्याची माहिती आहे. अजित पवार या जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारतील, असा दावा एका मराठी वृत्तवाहिनीने केला आहे.

### राजीनाम्याची टांगती तलवार

मस्साजोग हत्याकांडाप्रकरणी नेमण्यात आलेल्या एसआयटीच्या अहवालानंतर मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचा निर्णय घेतला जाईल, असे सूचक विधान मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले आहे. त्यामुळे मुंडे यांच्या डोक्यावर राजीनाम्याची टांगती तलवार असल्याचे स्पष्ट झाले आहे. संतोष देशमुख हत्याकांडाचा तपास करण्यासाठी १० जणांची एसआयटी नियुक्त करण्यात आली आहे. या विशेष तपास पथकाने आपला अहवाल दिल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याविषयी योग्य तो निर्णय होईल, असे राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले. खंडणी प्रकरणात सीआयडीने वाल्मीक कराडला अटक केली आहे.

## फडणवीसांनी बंद केली पोलीस मानवंदनेची प्रथा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :**
राज्यात शासकीय दौऱ्यावर असताना पुष्पगुच्छ देणे तसेच पोलिसांकडून मानवंदना देण्याची प्रथा बंद करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

फडणवीस स्वतःपासून या नियमाची सुरुवात करणार आहेत. त्यामुळे इतर मंत्र्यांनाही त्याचे अनुकरण करावे लागेल. मुख्यमंत्र्यांनी शासकीय दौऱ्याबाबत नवी नियमावली जाहीर करण्यात आली. दौऱ्यात स्वागतासाठी कुणीही पुष्पगुच्छ आणणार नाही. पोलिस दलाकडून देण्यात येणारी मानवंदना यापुढे माझ्या दौऱ्यात बंद करावी, असे त्यात नमूद आहे. विभागीय ायुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त व इतर अधिकाऱ्यांना हे आदेश पाठवण्यात आले आहेत.

## बच्चू कडूंनी दिला सरकारी पदाचा राजीनामा



■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. ३ :**
दिव्यांगांच्या सर्वांगिण विकासाठी मंत्रालयाचे काम अद्यापही सुरू झालेले नाही. पदावर राहून हे काम होणार, ही शक्यता मला मावळताना दिसत आहे. दिव्यांगांसोबत बेईमानी करणे मला शक्य होणार नाही, असे सांगत प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक माजी आमदार बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण अभियानाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राजीनाम्याचे पत्र पाठविताना भारतातले पहिले दिव्यांग मंत्रालय महाराष्ट्रात निर्माण केल्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत. परंतु अद्याप दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयाचे काम सुरू झाले नाही.


या विभागाच्या अध्यक्षपदावर राहून हे काम होणार, अशी शक्यता मला दिसत नाही. दिव्यांगासोबत बेईमानी मला शक्य नाही. त्यामुळे माझा दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान, अध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे. तो मंजूर करुन सहकार्य करावे, तसेच मला असलेली सुरक्षा सुध्दा काढून टाकावी, असेही पत्रात म्हटले आहे.

## जितेंद्र आव्हाडांवर गोपनीय पोलिसांची नजर, घरात घुसून केले शूटिंग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर ठाण्याच्या एसबी पोलीस (गोपनीय विभागची) नजर असल्याचं समोर आलं आहे.



जितेंद्र आव्हाड यांची पत्रकार परिषद सुरू असताना पोलीस आव्हाडांच्या पत्रकार परिषदेमध्ये घुसले. ही पत्रकार परिषद आव्हाडांच्या घरात सुरू होती. पोलिसांकडून पत्रपरिषदेचं चित्रिकरण करण्यात आलं आहे. या घटनेनंतर जितेंद्र आव्हाड यांनी चांगलाच संताप व्यक्त केला आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांवर पोलीस का वॉच ठेवत आहेत? असा सवाल आव्हाड यांनी केला.




## अनेक वर्षांचे स्वप्न काही महिन्यांत पूर्ण केले

### फडणवीस, शिंदेंचे भुजबळांकडून कौतुक



■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. ३ :**
भारतात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या थोर समाजसेविका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ वा जयंतीनिमित्त सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे आज अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात माजी मंत्री छगन भुजबळ यांनी गेल्या महायुती सरकारने मंत्रालयाच्या प्रेवशद्वारावर महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा बसवल्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे.

यावेळी बोलताना भुजबळ म्हणाले की, मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचाही पुतळा असावा असे अनेक वर्षांचे स्वप्न यांनी (शिंदे-फडणवीस) काही महिन्यांत पूर्ण केले.

भुजबळ म्हणाले, मी विरोधी पक्षात असताना शिंदे आणि फडणवीस या दोघांचे सरकार होते. मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शिवरायांचा, जिजामाता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे आहे. तेथेच जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचाही पुतळा बसवावा अशी मागणी आम्ही केली होती. तुम्हाला सांगतो अनेक वर्षांचे आमचे जे स्वप्न होते, ते यांनी काही महिन्यांत पूर्ण केले.

जयंतीनिमित्त नायगाव (सातारा) येथील त्यांच्या जन्मस्थळी आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मंत्री पंकजा मुंडे, अतुल सावे, शंभुराज देसाई, छगन भुजबळ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## भिडे वाड्यातील स्मारकाचे काय?
### राज ठाकरेंचा सवाल



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :**
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारला विनंती केली आहे.

सावित्रीबाई फुले यांचं पुण्यातील भिडे वाडा येथील स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. या स्मारकासाठी विनंती करताना त्यांनी लाडकी बहीण योजनेवरूनही सरकारला टोला लगावला आहे. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले हे दोघेही ज्ञानासाठी आसुसलेले होते, आणि त्यामुळेच ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाईनी शिक्षणाचा मार्ग स्वीकारला.

२ वर्षांपूर्वी तत्कालीन राज्य सरकारने पुण्यात ज्या भिडे वाड्यात सावित्रीबाई फुलेंनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, त्या वाड्याचं रूपांतर राष्ट्रीय स्मारकात करण्याची घोषणा केली होती. त्याचे काय झाले? स्मारक कधी होणार? असा सवाल त्यांनी केला आहे.

महासागर आवृत्त्या ▮ नागपूर ▮ अकोला ▮ अमरावती ▮ खामगांव ▮ यवतमाळ ▮ वर्धा ▮ गडचिरोली ▮ वाशीम ▮ भंडारा ▮ गोंदिया ▮ मुंबई ▮ पालघर (ठाणे) ▮ नाशिक आणि चंद्रपूर महासागर

## संक्षिप्त

### दारु साठी पैसे नाही दिले म्हणून झोमाटो बॉयला मारहाण

उल्हासनगर, दि. ३ : प्रतिनिधी

काल नववर्षाच्या पुर्व संध्येला एका झोमाटो बॉयने दोन मित्राना दारु पिण्यास पैसे दिले नाही म्हणुन त्याला मारहाण करुन त्याच्यावर धारदार हत्याराने वार करुन त्याचा मोबाईल तोडला. तर या प्रकरणी दोन जणा विरुध्द मध्यवर्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. उल्हासनगर कॅंप ३ येथील धोबीघाट या ठिकाणी राहणारा अविनाश अशोक गुंजाळ (२४) हा झोमाटो बॉय चे काम करतो.हे काम करुन तो आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करतो. काल रात्री तो कॅंप २ येथील बालकनजी बारी येथुन जात असताना त्याच्याच परिचयाचे मित्र तेजस वडेरा , अजय चौरसिया यांनी अविनाश याला अडवुन त्याच्या कडे दारु पिण्यासाठी पैसे मांगितले परंतु त्याने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे चिडुन जावुन तेजस व अजय यानी अविनाश याला जबर मारहाण करुन त्याच्यावर धारदार हत्याराने वार करुन जखमी केले असुन अविनाश चा मोबाईल जमीनीवर आपटुन तोडुन टाकला. या मारहाण प्रकरणी अविनाश गुंजाळ यांने मध्यवर्ती पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यांच्या तक्रारीवरुन पोलिसानी गु . रजि . १३५४ /२०२४ कलम ११५(२) ३५२ ३२४(४) ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन आरोपी हे फरार झाले आहेत. या गुंह्याचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

### नव्या वर्षाची सुरुवात स्वच्छता अभियानाने श्री सदस्यांनी जमा केला चार टन कचरा

भिवंडी, दि. ३ : प्रतिनिधी

डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या सौजन्याने तसेच स्वच्छतादूत पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाने बुधवारी वर्षारंभाच्या सकाळी भिवंडीतील हजारो श्रीसदस्यांनी मिळून सकाळी दिंडीगडावर जाऊन श्रमदानाने तीर्थस्थळ परिसर स्वच्छ केला. तसेच श्री सदस्यांनी या श्रमदानाने नवीन वर्षात सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणाचा संदेश नागरिकांना दिला.भिवंडी शहरालगत असलेल्या दिंडीगडास राज्य शासनाने तीर्थस्थळाचा दर्जा आहे. चावींद्रा ते सोनाळे या गावाच्या परिसरात डोंगरावर असलेल्या पुरातन शिवशंकराच्या मंदिराचा परिसर स्वच्छ व हिरवागार या साठी भाविकांचे प्रयत्न असते. त्यापैकी भिवंडी मनपाच्या हद्दीत असलेल्या डोंगरावर दरवर्षी पालिकेमार्फत झाडे लावली जातात.तसेच शहर आणि शहराबाहेरील भाविकांची या गडावर नेहमी वर्दळ असते. त्यामुळे विविध प्रकाराचा कचरा या गडावर जमा होतो. त्याची दाखल घेत भिवंडीतील श्री सदगुरु बैठकीतील श्री सदस्यांनी

बुधवारी सकाळी श्री क्षेत्र दिंडेश्वर महादेव मंदिर परिसर आणि दिंडीगडावर स्वच्छता अभियान राबविले. भिवंडीत एकूण १७ असून त्यामधील १००० श्री सदस्यांनी दिंडीगडावरील चार किलोमीटर परिसर स्वच्छ करीत ४ टन कचरा जमा केला. याप्रसंगी भिवंडी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, वडपा विभागाचे वनपाल धनेश हनुमंत मेनकर ग्रामपंचायत सदस्य संजय मढवी, ह.भ.प.चिंतामणी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दिंडीगडावर असलेल्या झाडांची आयुष्य वाढावे यासाठी देखील उपक्रम राबविण्यात आले.

### कळंबोलीमध्ये वर्षअखेरीस मसाला दूध वाटप संपन्न



पनवेल, दि. ३ : प्रतिनिधी

शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्या वतीने कळंबोली येथे 31 डिसेंबर रोजी मसाला दूध वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो नागरिकांना दुधाचे वाटप करण्यात आले.31 डिसेंबरच्या दिवशी अनेक जण मद्यपान करून वाहन चालवतात. त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. या 31 डिसेंबरच्या दिवशी नागरिकांनी नियमांचे उल्लंघन करू नये आणि कधीही मद्य पिऊन वाहन चालवू नये असे आवाहन वारंवार करण्यात येते. 31 डिसेंबर हा आपला सण नाही. आपला नवीन वर्ष गुढीपाडव्याच्या दिवशी असतो. 31 डिसेंबरच्या दिवशी शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्या वतीने दरवर्षी मसाला दुधाचे वाटप करण्यात येते. यावर्षीचे हे तेरावे वर्ष होते. यावेळी अनेक नागरिकांना मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. दूध वाटपवेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.


### उपचाराच्या नावाखाली बलात्कार, मांत्रिकाला अटक

वसई : मानसिक त्रास आणि पोटदुखीचा आजार बरा करतो असे सांगून एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या भोंदू मांत्रिकाला विरार पोलिसांनी अटक केली आहे. उपचाराच्या नावाखाली मंत्र आणि विधीकरून त्या महिलेवर बलात्कार करून त्याने पैसे उकळले होते. पीडित महिला ४५ वर्षांची असून पतीसह विरारमध्ये राहते. या परिसरात एक व्यक्ती मांत्रिकाचे काम करतो. पैशाचा पाऊस पाडणे, गुप्तधन शोधून देणे आदी दावे तो करत असतो. पीडित महिलेला पोटदुखीचा तसेच मानसिक त्रास होता. त्यामुळे ती या मांत्रिकाकडे उपचारासाठी जात होती. तिच्यावर तो उपचार करत होता. मे महिन्यात त्याने या महिलेला पाण्यात कोळसा टाकून पाणी पिण्यास दिले आणि त्यानंतर तिला गुंगी आली. यानंतर राजभर याने बलात्कार केला. माझी पत्नी गेल्या काही दिवसांपासून अबोल झाली होती.

# गोपाळनगरच्या मुख्य रस्त्यावर अनेक महिन्यांपासून वाहत्या नाल्यातील घाण पाणी

भिवंडी, दि. ३ : प्रतिनिधी

भिवंडीतील कल्याण नाक्याजवळ असलेले गोपाळनगर हे शहरातील उच्चभ्रू लोकवस्ती मानली जात आहे.मात्र या लोकसंकुलाच्या प्रवेशद्वारावर असलेल्या नाल्याची दुरुस्ती गेल्या काही महिन्यापासून होत नसल्याने गोपाळ नगरच्या प्रवेशद्वारावर नेहमी नाल्याचे घाण पाणी व चिखल साचलेला असतो. नेहमी रस्त्यावर पाणी साचल्याने रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे निर्माण झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी वारंवार महानगरपालिकेकडे मागणी करूनही येथील नाल्याची बांधकाम विभागाकडून दुरुस्ती केली जात नाही. तसेच मनपाच्या स्वच्छता विभागाकडून नाल्याची सफाई केली जात नाही. त्यामुळे त्याचे घाण पाणी रस्त्यावर वाहत आहे. विशेष म्हणजे मनपाच्या मुख्य हाकेच्या अंतरावर असलेल्या गोपाळ नगरच्या मुख्य रस्त्याच्या दुर्दशेची माहिती प्रभाग समिती २ चे सहाय्यक आयुक्त किंवा शहर अभियंता यांच्याकडेही नाही.याच गोपाळ नगरच्या प्रवेशद्वाराजवळ दादासाहेब दांडेकर विद्यालय



आहे.यामध्ये प्राथमिक ते माध्यमिकपर्यंत विद्यार्थी शिक्षण घेतात.त्यामध्ये बहुतांश विद्यार्थी पायीच शाळेत येतात.मात्र त्यांना नाल्याच्या या घाण पाण्यातून जावे लागते.याशिवाय येथे नेत्र रुग्णालये,दंत रुग्णालये आणि मेडिकल स्टोअर्स आहेत. तसेच लोक संकुलास लागून कच्च्या कापडाचे कार्यालये असल्याने नेहमी मोठ्या वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे येथे नागरिकांची देखील नेहमीच वर्दळ असते. अशा स्थितीत गोपाळनगरचा संपूर्ण रस्ता अनेक ठिकाणी नादुरुस्त स्थितीत आहे. तसेच या लोकवस्तीत रस्त्यावरील चेंबर उघडे आहेत. तसेच गोपाळ नगर दुसऱ्या प्रवेशद्वाराजवळ वाहतूक कार्यालयाजवळ तेथील नाला गेल्या काही वर्षांपासून उघडा आहे. तेथे पावसाळ्यात खूप पाणी साचलेले असते.गोपाळ नगर मधील रहिवासी माजी नगर सेवक व समाजवादी पक्षाचे नेते अजय यादव यांनी सांगितले की, पावसाळ्याच्या दिवसात या ठिकाणी सुमारे दोन फूट पाणी साचते.नाल्याची दुरुस्ती न केल्याने नाला पूर्णपणे तुडुंब भरला आहे.यासाठी महापालिकेला अनेकदा पत्रेही लिहिली असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र महापालिकेने लक्ष दिले नाही. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी भेट दिल्याचे त्यांनी सांगितले. मात्र याबाबत बांधकाम विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता सचिन नाईक यांनी प्रभाग समितीचे कनिष्ठ अभियंता विनोद भोईर यांच्याशी बोलून माहिती देणार असल्याचे सांगितले. घटनास्थळी भेट दिल्यानंतर प्रभाग समिती २ चे सहाय्यक आयुक्त माणिक जाधव यांनी सांगितले की. दोन्ही अधिकाऱ्यांनी कोणतीही माहिती दिली नाही.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत पनवेल मध्ये 117 जणांची नियुक्ती

पनवेल, दि. ३ : प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत पनवेल तालुक्यातील 71 ग्रामपंचायतपैकी 69 ग्रामपंचायतमध्ये 69 जणांची आणि पंचायत समितीत वेगवेगळ्या डिपार्टमेंटमध्ये 48 अशा 117 जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते ग्रामपंचायत, पशु विभाग, पाणी पुरवठा विभाग, शिक्षण, पनवेल पंचायत समिती, आरोग्य केंद्र या ठिकाणी कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना 6 हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारक विद्यार्थ्यांना 8 हजार तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना 10 हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने येणार आहे. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून 10 दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन देण्यात येणार नाही. यापैकी 69 जण ग्रामपंचायतमध्ये, 6 जण पशु विभागात, 5 जण प्राथमिक आरोग्य केंद्रात, 9 जण पंचायत समितीत, 13 जण बांधकाम विभागात, दोन जण पाणीपुरवठा विभागात आणि इतर आरोग्य विभाग आणि आयसीडीएस मध्ये कार्यरत आहेत. प्रत्येक युवक-युवतींना शिक्षणानुरूप रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी युवक-युवती आणि त्यांचे पालक जागरूक असतात. राज्य शासन देखील त्यांच्या रोजगार निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. युवा वर्गाचे शिक्षण पूर्ण झाल्यांनतर वेळेत योग्य मार्गदर्शन आणि व्यवसाय करणाऱ्यांसाठी भांडवल उपलब्धता शासन विविध योजनांच्या माध्यमातून करून देत आहे. रोजगार इच्छुक युवक-युवती आणि रोजगार देणाऱ्या विविध आस्थापना यांच्यामध्ये संवाद आणि समन्वय साधून उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ आणि युवा वर्गाला रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरू केली आहे.

## पुण्यात शिवसेना (ठाकरे) पक्षाला धक्का, पाच नगरसेवक भाजपच्या वाटेवर

पुणे, दि. ३ : प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे) पक्षाचे पाच माजी नगरसेवक भाजपच्या वाटेवर आहेत. पुढील आठवड्यात या नगरसेवकांबरोबर काही पदाधिकाऱ्यांचाही पक्षप्रवेश होण्याची शक्यता असल्याने पुण्यात शिवसेना ठाकरे पक्षाला धक्का बसला आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढविणाऱ्या भाजप, शिवसेना (शिंदे) राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला मोठे यश मिळाले. महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविणाऱ्या काँग्रेस, शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला पराभवाचा मोठा धक्का बसला. शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या वरिष्ठांकडून पक्ष वाढीसाठी कोणतेही निर्णय घेतले जात नसल्याचा आरोप करून दोन माजी नगरसेवकांनी पक्ष सोडत असल्याचे जाहीर केले आहे.

शिवसेनेत तीन वर्षांपूर्वी पडलेल्या फुटीनंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देऊन आठ माजी नगरसेवकांनी शिवसेना (ठाकरे) पक्षात राहण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्यातील पाच जण शिवसेनेला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती. त्यामध्ये माजी नगरसेवक विशाल धनवडे, बाळा ओसवाल यांच्यासह तीन नगरसेविका आहेत. हे पाचजण भाजपच्या वाटेवर असल्याचे बोलले जात होते. त्यांपैकी धनवडे आणि ओसवाल यांनी भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचे जाहीर केले.

पुण्यात शिवसेनेला (ठाकरे) कोणीही वाली नाही. जिल्ह्यात पक्षालाच शिवसेना नकोय असे वाटायला लागले. ना लोकसभेला जागा, ना विधानसभेला. जागा मिळाली, तरी उमेदवाराच्या मागे कोणतीही ताकद द्यायची नाही, कोणतीही रसद पुरवायची नाही. ना कोणत्या शिवसैनिकाला मदत करायची. शिवसैनिकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हायचे नाही. ज्यांना पक्ष वाढविण्याची भूक आहे, त्याला काम करू न देणे हे गेली पाच वर्षे सुरू आहे. पक्षात जे नगरसेवक आहेत ते पक्ष वाढवायचे सोडून केवळ पायात पाय घालण्याचे काम चालू आहे. पक्ष वाढविण्यासाठी पाच वर्षात एकही बैठक झाली नाही, असा आरोप धनवडे यांनी करत पक्ष सोडणार असल्याचे जाहीर केले आहे.

## महापारेषणच्या वार्षिक दिनदर्शिका-2025 चे थाटात प्रकाशन




मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या वार्षिक दिनदर्शिका-२०२५ चे प्रकाशन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते थाटात झाले. यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, श्रीमती जुईली वाघ, मुख्य अभियंता (अभिकल्प) श्री. किशोर गरुड, महाव्यवस्थापक (मानव संसाधन-अतांत्रिक) श्री. राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. महेश आंबेकर, श्रीमती रेणुका नाटके उपस्थित होते. सुरूवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी नववर्षाच्या शुभेच्छा देऊन उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना संदेश दिला. गेल्या वर्षात राज्य पारेषण उपक्रम, अभिकल्प, कंत्राटे आणि अनुश्रावक, संचलन व सुव्यवस्था, चाचणी, स्वयंचलन आणि संचार विभाग, मानव संसाधन, वित्त, राज्य भार प्रेषण केंद्र, स्थापत्य, ईआरपी, सुरक्षा, कंपनी सचिव, जनसंपर्क विभाग, दक्षता व विधी या विभागांनी आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करून महत्त्वाची भूमिका बजावली. अशाच प्रकारे यावर्षी देखील आपल्या विभागाची जबाबदारी पार पाडल्यास पर्यायाने कंपनीच्या प्रगतीचा आलेख उंचावत राहील. कोणत्याही कामात तीन गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. त्यातील पहिली म्हणजे जीवनामध्ये निरंतर सुधारणा अत्यावश्यक आहे. ती सुधारणा आपण केली पाहिजे. दुसरे म्हणजे कायम नवीन शिकणं आवश्यक आहे. त्याचबरोबर सकारात्मकता ठेवायला हवी, असे डॉ. संजीव कुमार यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी केले.

**जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांना कौतुकाची थाप**

महापारेषण २०२४ च्या दैनंदिनी व दिनदर्शिकेला पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या वतीने सर्वोत्कृष्ट तीन पुरस्कार मिळाले. तसेच पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ॲन्ड पीआर व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांची पाठ थोपटून अभिनंदन केले. भविष्यातही, जनसंपर्क विभाग सर्वोत्कृष्ट काम करून महापारेषणची प्रतिमा जनमानसात उंचावेल, असा विश्वास डॉ. संजीव कुमार यांनी व्यक्त केला.

# नववर्षात एफएसआयसोबत तितकाच टीडीआरही घ्यावा लागणार

## अंबरनाथ नगरपालिकेचे टीडीआरला प्रोत्साहन देण्यासाठी निर्णय

उल्हासनगर, दि. ३ : प्रतिनिधी

अंबरनाथ नगरपालिकेने आता नव्या वर्षातील बांधकाम परवानग्यांसाठी एफएसआयसह तितकाच समान टीडीआर घेण्याचे सक्तीचे केले आहे.

बांधकाम परवानगी घेताना मुळ चटईक्षेत्र निर्देशांक अर्थात एफएसआय, प्रिमीयम एफएसआय आणि त्यावर अनुज्ञेय असलेला सहायक चटईक्षेत्र निर्देशांक अर्थात अँसिलरी एफएसआय वापरला जातो. अशावेळी हस्तांतरणीय विकास हक्क अर्थात टीडीआरची मागणी केली जात नाही. त्यामुळे शहरात टीडीआरच्या माध्यमातून संपादित होणाऱ्या जमिनींची प्रकरणी कमी झाली असून त्याचा विकास योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम होत आहे. अशी बाब अंबरनाथ नगरपालिकेच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे टीडीआर निर्मिती थंडावली असून त्याचसाठी अंबरनाथ नगरपालिकेने आता नव्या वर्षातील बांधकाम परवानग्यांसाठी एफएसआयसह तितकाच समान टीडीआर घेण्याचे सक्तीचे केले आहे. याबाबतचा आदेश नुकताच पालिका प्रशासनाने जाहीर केला.

एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीचा बांधकाम क्षेत्राला मोठा फायदा झाला. यात अनेक मुद्द्यांवर सुसूत्रता आली. या नियमावलीनुसार रहिवासी बांधकाम परवानगी प्रकरणामध्ये कमाल बांधकाम क्षमतेच्या मर्यादित , वापरलेला बेसिक एफएसआय, प्रिमियम एफएसआय आणि टिडीआर या सर्वांवर ६० टक्के अँसिलरी एफएसआय घेण्याची तरतूद आहे. मात्र बऱ्याचशा बांधकाम परवानगी प्रकरणात मुळ एफएसआय आणि प्रिमियम एफएसआय तसेच त्यावर अनुज्ञेय असलेला अँसिलरी एफएसआय वापरुन बांधकाम परवानगी प्रकरणे सादर केली जातात. अशा प्रकरणात टीडीआर वापरुन अतिरिक्त एफएसआय मागितला जात नाही. त्यामुळे नगरपरिषद हद्दीतील टीडीआरचे महत्व कमी झाले असून या माध्यमातून संपादित होणाऱ्या जमिनींची प्रकरणे कमी झाल्याची बाब अंबरनाथ नगरपालिकेच्या निदर्शनात आली आहे. त्यामुळे शहराच्या विकास योजनेच्या अंमलबजावणीवर फरक पडत आहे. विकास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरक्षणाखालील, विकास योजना रस्त्याखालील जमिनी टीडीआरच्या माध्यमातून संपादित करणे आवश्यक आहे. अंबरनाथ शहरात १९८ आरक्षणे आहेत. त्यातील अवघे चार टक्के आरक्षणे पालिकेच्या ताब्यात आली आहेत. विकास योजना रस्त्याखालील जमिनीच्या मालकांनी स्वतः पुढाकार घेऊन टीडीआरच्या मोबदल्यात या जमिनी नगरपालिकेला हस्तांतरीत करणे गरजेचे आहे. त्यामुळे या टीडीआरच्या निर्मितीला आणि वापराला प्रोत्साहन देण्यासाठी त्याच्या वापराची सक्ती करण्याचा निर्णय अंबरनाथ नगरपालिकेने घेतला आहे. त्यामुळे १ जानेवारीपासून सादर केल्या जाणाऱ्या सर्व बांधकाम परवानगी प्रकरणात एफएसआय आणि टीडीआर समान प्रमाणात वापरावा लागणार आहे. याबाबतचा आदेश नुकताच अंबरनाथ पालिका प्रशासनाने जाहीर केला आहे.

सध्या प्रचलित एफएसआय वापरामुळे पालिका प्रशासनाला थेट उत्पन्न मिळते. मात्र त्याचवेळी टीडीआरचे महत्व कमी झाल्याने पालिकेला आरक्षण विकासासाठी जागा मिळत नाही. टीडीआर खासगी व्यक्तीकडून मिळेल, त्यामुळे पालिकेचे काही अंशी नुकसान होईल, पण आरक्षित भुखंडांवरचा विकास आणि त्यासाठी टीडीआर निर्मिती महत्वाची असल्याचे पालिकेच्या वतीने सांगितले जात आहे.

बांधकाम व्यवसासियांकाचे आस्ते कदम अंबरनाथ नगरपालिकेने एफएसआय आणि टीडीआर समान प्रमाणात वापण्याची सक्ती केली असली तरी त्यावर अद्याप बांधकाम व्यवसायिकांनी प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे अंबरनाथ नगरपालिकेचा हा निर्णय बांधकाम व्यवसायिक कसा घेतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. अंबरनाथ शहरात सुर्योदय सोसायटीत मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास सुरू आहे. शहरात विविध भागात अनेक गृहप्रकल्प सुरू आहेत. त्याचवेळी आलेल्या या निर्णयामुळे अनेक चर्चाही रंगल्या आहेत. मात्र हा निर्णय एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीच्या आधारेच घेतला असून मुंबई महानगर प्रदेशातील अनेक पालिकांनी वर्षभरापूर्वीच असा आदेश जाहीर केल्याची माहिती पालिकेच नगररचनाकार विवेक गौतम यांनी दिली आहे.



*मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या गोदी विभागातील शेड सुप्रीटेंडंट व सामाजिक कामगार कार्यकर्ते संदीप चंद्रकांत परब हे मुंबई पोर्टच्या ३७ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर निष्कलंकपणे सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने त्यांचा इंदिरा गोदीतील हमालेज बिल्डिंग येथे ३१ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे वरिष्ठ सहाय्यक गोदी प्रबंधक हंसराज सावंत यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी सोबत मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे उपाध्यक्ष व मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे बोर्ड मेंबर प्रदीप नलावडे, युनियनचे सेक्रेटरी आणि माजी बोर्ड मेंबर दत्ता खेसे, युनियनचे सेक्रेटरी विजय रणदिवे, युनियनचे प्रसिद्धी प्रमुख मारुती विश्वासराव असिस्टंट ट्रॅफिक मॅनेजर गणेश जाधव आणि अदाते.*

# थकबाकीमुळे वीज कनेक्शन तोडलेल्या ग्राहकांसाठी अभय योजनेला 31 मार्च पर्यंत मुदतवाढ

## थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर होणार कायदेशीर कारवाई

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना २०२४ ला ग्राहकांच्या मागणीनुसार ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी केले.

राज्यातील महावितरणच्या ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपल्या नंतर ३१ डिसेंबर पर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्ष्यात घेऊन ही योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. मात्र ३१ मार्च २०२५ नंतर या योजनेला मुदत वाढ न देण्याचा निर्णय महावितरणने घेतला असुन थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील ९३८४८ वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून १३० कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना ५७ कोटी ३६ लाख रुपयांचे व्याज व २ कोटी १२ लाख रुपयांचा विलंब आकार माफ झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. जे घरगुती, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहक एकरकमी थकीत बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रॅंचायझी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

**असा लाभ घ्या**

संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून ऑनलाईन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल. महावितरणच्या मोबाईल ॲपवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीजग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर योग्य पुरावे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल.

# भाजीविक्रेत्यांना हलवल्याने रस्त्याने घेतला मोकळा श्वास

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ३ :

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबीत असलेला आणि वारंवार उपाययोजना केल्यानंतरही निकाली न निघालेला दत्त चौक परिसरात रस्त्यावर उभे राहून भाजी विक्री करणाऱ्यांचा प्रश्न अखेर निकाली निघाला आहे. त्यासाठी नगरपालिकेच्या विद्यमान मुख्याधिकारी लघीमा तिवारी यांनी पुढाकार घेत भाजीमंडईच्या जागेचे तब्बल १७६ जणांना इश्वरचिठ्ठीने वाटप केले.

तसेच जिल्हा वाहतूक शाखेचे प्रमुख ज्ञानोबा देवकते यांनी या विक्रेत्यांना निश्चित केलेल्या जागांवर बसवले. त्यामुळे मागील अनेक वषार्नंतर संत सेना चौकातून जाजू चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.




यवतमाळ शहराचे हृदयस्थान असलेल्या दत्त चौक परिसरात संत सेना चौक ते जाजू चौक रस्त्यावर नित्याने भाजीविक्रेत्यांचे अतिक्रमण राहते. त्यामुळे दुपदरी असलेल्या या रस्त्याची एक बाजू भाजीविक्रेत्यांच्या अतिक्रमणामुळे नेहमी बंद राहत असे. त्यामुळे एकाच बाजूने वाहनधारकांना वाहने चालवावी लागत. या भाजीविक्रेत्यांना पालिकेच्या मार्केटच्या मागच्या बाजूला ओटे बांधून देण्यात आले आहेत. त्यासोबतच बाजूला असलेली एक मोकळी जागा देखील व्यवसायासाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. असे असतानाही त्या जागा रिकाम्या सोडून रस्त्यावर हातगाडे लावून हे व्यावसायिक भाजी विक्री करत. त्याचा त्रास शहरवासीयांना होत होता. दरम्यान, पालिकेच्या मुख्याधिकारी पदाचा प्रभार असलेल्या भाप्रसे अधिकारी लधीमा तिवारी यांनी या प्रकरणात गांभीयार्ने दखल घेत कारवाई सुरू केली.

गुरूवारी २ जानेवारी रोजी थेट भाजी मंडईत पोहचून व्यावयायिकांना दिलेल्या जागेवर रखाने आखून घेत त्यांना क्रमांक दिले. त्यानंतर भाजीविक्रेत्यांची यादी बनवून इश्वर चिठ्ठीच्या माध्यमातून तब्बल १७६ जणांना जागा वितरीत करण्यात आली. ही यादी पालिका प्रशासनाकडे राहणार असून त्या जागेवर दुसऱ्याने व्यवसाय केल्यास कारवाई होईल, असा इशारा यावेळी जागाधारकांना देण्यात आला.

पालिकेच्या संकुलातील गाळेधारकांना आनंद ही कारवाई झाली त्या परिसरात पालिकेचे मोठे व्यापारी संकुल आहे. मात्र त्या संकुलासमोर सातत्याने भाजी विक्रेत्यांचे अतिक्रमण असल्याने या व्यावसायिकांना व्यवसाय करणे कठीण झाले होते. वारंवार तक्रारी केल्यानंतरही कारवाई होत नसल्याने त्यांनी हात टेकले होते. मात्र, आता हे अतिक्रमण हटल्याने पालिकेच्या गाळे धारकांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. ही शिस्त कायम राहण्याची अपेक्षा आहे.

आता शहरातील इतर रस्त्यांवर कारवाईची मागणी दत्त चौक परिसरात असलेल्या रस्त्यावर भाजी विक्री करणाऱ्या व्यावसायिकांचा प्रश्न आता निकाली निघाला आहे. त्यानंतर आता जाजू चौक, सिव्हिल लाईन परिसर, स्टेट बँक चौक, आर्णी नाका, राणाप्रताप गेट परिसर, दारव्हा नाका या ठिकाणी रस्त्यावर भाजी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांच्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.

# नभोमंडपात ७ जानेवारीला सात घटनांचा अनोखा संगम



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ३ :

नभोमंडपात ग्रह-तारकांचा अनोखा मेळा एकत्र बघता येणार आहे. विशेष म्हणजे आगामी ७ जानेवारीला सुमारे सात घटनांचा संगम अनुभवण्याची संधी मिळणार आहे. सोबतच २५ जानेवारीला सूर्यमालेतील सर्व ग्रह एका बाजूला येण्याची दुर्मिळ घटना आकाशप्रेमींसाठी एक अनोखी पर्वणी असेल, अशी माहिती विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी दिली.

नव्या वर्षाच्या सुरुवातीला ७ जानेवारी रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास सूर्यमालेतील सात खगोल, सात राशी, नक्षत्र समूहातील सातव्या पुनर्वसू नक्षत्राचे, सात तारकांच्या सप्तषीर्चे उदय समयाला, सात बहिणींच्या व सात तारकांच्या कृत्तिका नक्षत्राच्या उपस्थितीत, सात चंद्र दर्शनाचा हा अनोखा सोहळा होणार आहे. सूर्यमालेतील सात ग्रह बघता येतील. यावेळी पृथ्वीवरुन पश्चिमेस शुक्राची तेजस्वी चांदणी २५ अंशावर, जरा वर शनी ग्रह ३५ अंशावर कुंभ राशीत, नंतरचा नेपच्यून ४७ अंशावर आणि आकाश मध्याशी अष्टमीचा अर्धा चंद्र ७५ अंशावर मीन राशीत, नंतर पूर्वेस वर युरेनस ७४ अंशावर मेषेत, त्याचे जवळचा ठळक गुरु ग्रह ५६ अंशावर वृषभ राशीत रोहिणी जवळ आणि पूर्व क्षितिजावर उदित लालसर मंगळ ग्रह कर्क राशीत असेल, असे दोड म्हणाले.

सूर्य, चंद्र व ग्रह आकाशात सूयाभोवती फिरणाऱ्या मागार्ला आयनिकवृत्त किंवा राशीचक्र म्हणतात. या बारा राशीतील पूर्व क्षितिजावर नुकतीच उदय पावणारी कर्क राशी, तिच्या वरची मिथुन, नंतरची वृषभ व पुढे मेष अश्विनीसह बघता येईल. या वेळी अष्टमीचा अर्धा चंद्र मीन राशीत व नंतर पश्चिमेस कुंभ राशी व मकर राशी मावळतीला असेल. पूर्व क्षितिजावर नक्षत्र समूहातील सातवे पुनर्वसू नक्षत्र कॅस्टर व पोलूक्स या दोन ताऱ्यांच्या स्वरूपात पाहता येईल, असे दोड यांनी सांगितले. येत्या २५ जानेवारीला सूर्यमालेतील सर्व ग्रह एका बाजूला येणार आहेत. यावेळी बुध, शुक्र, मंगळ, गुरू, शनी, युरेनस व नेपच्यून हे सर्व ग्रह सूयाभोवती फिरताना एकाच दिशेला असतील. ही घटना अतिशय दुर्मिळ व क्वचितच पाहायला मिळते. त्याचाही लाभ घेता येईल, असे ते म्हणाले.

रोज दिसणाऱ्या चंद्रासारखेच सात चंद्र बघता येणार आहे. त्यात चार चंद्र गुरू ग्रहाचे आणि शूक्र ग्रहाला अष्टमीच्या चंद्राप्रमाणे, तर बुध ग्रहाचा आकार एकादशीला दिसणाऱ्या चंद्रासारखा अनुभवता येईल. मात्र, नेहमी दिसणारा चंद्र सोडून बाकी सहा चंद्र दुर्बिणीतून बघता येतील, असे दोड यांनी सांगितले.

# आठ दिवस रेल्वे फाटक बंद

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ३ :

शहरातील न्यू तापडिया नगरकडे जाणाऱ्या मार्गावरील फाटक रेल्वे मार्गाची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी आठ दिवस बंद ठेवण्यात आले. त्यामुळे हजारो नागरिकांना मनस्तापाचा सामना करावा लागत आहे. मोठा फेरा घेऊन नागरिकांना शहर गाठावे लागते. मध्य रेल्वेच्या आडमुठ्या धोरणामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. मध्य रेल्वे मार्गावरील फाटक क्र. ३८ ए हे १ जानेवारीला सकाळी ६ वाजतापासून रेल्वे मार्गाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी बंद केले. हे फाटक ८ जानेवारीला रात्री ८ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद राहील. मध्य रेल्वेने तब्बल आठ दिवस रेल्वे फाटक बंद ठेऊन परिसरातील नागरिकांना चांगलेच वेठीस धरले आहे. आतापर्यंत मध्य रेल्वेकडून मागार्ची देखभाल व दुरुस्तीचे कार्य रात्रीच्या सुमारास वाहतूक बंद ठेऊन केले जात होते. या वेळेस प्रथमच संपूर्ण आठ दिवस २४ तास वाहतूक बंद केली. याठिकाणी दिवसा रेल्वे मागार्चे काम सुरू ठेऊन रात्री ते बंद ठेवण्यात येते. वास्तविक रात्री काम करून दिवसा फाटक वाहतुकीसाठी सुरू ठेवता आले असते. मात्र, मध्य रेल्वेने नागरिकांच्या गैरसोयीचा विचार न करता थेट आठ दिवसांसाठी रेल्वे फाटक बंद ठेवण्याचा मनमानी निर्णय घेतला. जठारपेठमधून न्यू तापडिया नगरकडे जाणारा हा अत्यंत वर्दळीचा रस्ता आहे. न्यू तापडिया नगर, पंचशील नगर, खरप बु. आदी परिसरासह विविध गावांना अकोला शहराशी जोडणारा हा मार्ग असून रेल्वे फाटक बंद असल्यामुळे या भागातील नागरिकांची अत्यंत अडचण होत आहे.

# थेट पीक कर्ज वितरणाचे जिल्हा बँकेचे प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ३ :

मागील वर्षभरापासून जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून शेतकऱ्यांना थेट पीक कर्ज वितरीत करण्यासंदर्भात हालचाली सुरू आहेत. मात्र, त्यासंदर्भात अद्याप निर्णय झालेला नाही. त्याचाच फटका बसून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची अनिष्ट तफावत वाढून आता ९१३ कोटींवर पोहेचली आहे. ही तफावत कमी करण्यासाठी आता शेतकऱ्यांना थेट पीक कर्ज वाटपाबाबत नुकत्याच पार पडलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. निर्णय मात्र अद्याप राखून ठेवण्यात आला आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अनिष्ठ तफावतीत मागील वर्षीच्या तुलनेत तब्बल १८३ कोटींची वाढ झालेली आहे. तफावतीची ही रक्कम ९१३ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. वाढत चाललेल्या अनिष्ठ तफावतीमुळे बँकेसमोरील संकट वाढले आहे.




ही तफावत कमी करण्यासाठी संचालक मंडळाचे प्रयत्न सुरू असले तरी त्यांना यश मिळालेले नाही. यामुळे आता शेतकऱ्यांना सोसायटीमार्फत पीक कजार्चे वाटप न करता थेट पीक कर्ज वाटप करण्याची चर्चा संचालक मंडळाच्या बैठकीत झाली. सध्या यावर कोणताही निर्णय झालेला नाही. मात्र, येणाऱ्या काही महिन्यांत अभ्यास करून पीक कर्ज वाटपाच्या धोरणावर निर्णय होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. बँकेच्या धोरणापेक्षा जास्त पीककजार्चे वाटप झाले होते. यामुळे निरीक्षकांना मोठ्या प्रमाणात दंड आकारला होता. कर्मचारी तसेच कर्मचारी संघटनांनी यावर निवेदन देत दंड कमी करण्याची मागणी करण्यात आली होती. संचालक मंडळाच्या बैठकीत या मुद्यावरही चर्चा झाली.

धोरणापेक्षा जादा वाटप प्रकरणात क्षेत्रीय निरीक्षकांना प्रतीसंस्था १० हजार रुपये दंड आकारला होता. याविरुद्ध कर्मचारी तसेच कर्मचारी संघटनेमध्ये नाराजी होती. संचालक मंडळाच्या बैठकीत ही रक्कम ५० टक्क्याने कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. ५० टक्के रक्कमही मोठी असल्याचे म्हणत कर्मचाऱ्यांमध्ये दंडाच्या रक्कमेवरुन नाराजीचा सूर उमटत आहे. या बैठकीत काही प्रमुख प्रस्तावांवर, तसेच निर्णय बदलाच्या अनुषंगानेही चर्च झाल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. वाहनाची काच फोडल्याचे प्रकरण बैठकीत पुन्हा चर्चेत काही दिवसांपूर्वी एका बँकेच्या अध्यक्षांच्या वाहनाचे काच फोडून वाहनातील बॅग लंपास झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणाची कुठेही तक्रार नसली तरी या प्रकरणाची खमंग चर्चा जिल्हाभरात आहे. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीतही ह्यतेह्ल प्रकरण कोणाशी संबंधित आहे, अशा प्रकारची चर्चा झाल्याची माहिती आहे.

# मानव शरिराने गेला, तरी कर्तृत्वामुळे अमर राहतोः अरुण महाराज सालोडकर

■ महासागर प्रतिनिधी
पुसद दि. ३

जगातील सर्वात शेवटचे सत्य म्हणजे मृत्यू. मात्र, मानव शरीराने गेला तरी त्याला मृत्यु म्हणता येणार नाही. कार्य, कर्तृत्वाने त्याच्या स्मरणाने अमरत्व लाभते. हजारो लोक मरतात, मग एखाद्याच्या जाण्याने काय होते. परंतु, हजारो लोक ज्या एकाची बराबरी करु शकत नाही त्याच्या जाण्याने दुःख होते. अश्रू ढळतात व त्याचे नित्य स्मरण होते ते मरण नव्हे, असे प्रतिपादन अरुण महाराज सालोडकर यांनी केले.

पुसद येथे कुसुम धमाळे यांच्या चौदावीनिमित्त किर्तनाचे आयोजन नुकतेच केले होते. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी ज्ञानेश्वर केसाळे, भानुदास कऱ्हाळे, सप्तखांजिरी किर्तनकार पंकजपाल महाराज, नारायण महाराज, नेताजी केणे उपस्थित होते. या वेळी भानुदास कऱ्हाळे, सत्यपाल महाराजांचे शिष्य पंकजपाल, नारायण महाराज, प्रमोद देशमुख, नेताजी केने यांनी श्रध्दांजली अर्पण केली. किर्तनात हार्मोनियम ज्ञानेश्वर ताकतोडे, तबला प्रशांत आत्राम त्यांना साथसंगत ज्ञानेश्वर केसाळे, मेजर साहेबराव राठोड, संजय ठाकूर, गजानन कवाने, कैलास मस्के, बाबासाहेब वाघमारे यांनी दिली.

# शिवाजी हायस्कूल भामोद येथे विद्यार्थी सुरक्षा

■ महासागर प्रतिनिधी
दर्यापूर, दि. ३

भामोद येथील शिवाजी हायस्कूलमध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा १२६ वा जयंती उत्सव व स्नेहसंमेलनादरम्यान विद्यार्थी व सायबर सुरक्षा आणि निसगार्चे अवलोकन अशा तीन विषयावर व्याख्यानमाला आयोजित केली होती. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद ओमप्रकाश देशमुख उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थी सुरक्षा या




विषयावर येवदा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विवेक देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, की विद्यार्थ्यांनी जीवन जगताना सतर्क राहून सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर करावा. सोबतच त्यांनी गुड टच, बॅड टचबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना काही त्रास असेल तर त्यांनी पालक, शिक्षक व पोलिस विभागाला कळवावे, असे आवाहन उपस्थित विद्यार्थ्यांना केले. तसेच दुसऱ्या सत्रात सायबर सुरक्षा या विषयावर एमकेसीएल कंपनीचे अमरावती विभाग मार्केटिंग प्रमुख नीलेश बहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, की आज सायबर क्राइम मोठ्या प्रमाणावर घडत असून विविध फोन, मेसेजद्वारे नागरिकांची सायबर क्राईम गुन्हेगार फसवणूक करत आहेत. कोणालाही आपला पासवर्ड न देता आपली सुरक्षा आपण करावी आणि कोणत्याही जाहिराती व पैसे कमावण्याच्या आमिषाला बळी पडू नये, असा सल्ला दिला. तसेच विद्यार्थ्यांनी बहिरे यांना प्रश्न विचारून शंकेचे निरसन केले.

तिसऱ्या सत्रात अवलोकन निसगार्चे या विषयावर ॲड. वसुसेन देशमुख यांनी निसगार्तील पशू, पक्षी तसेच विविध जातीचे साप याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नागरिक नरेश देशमुख, पोलिस पाटील नितीन कात्रे, दिनकर ठाकरे, प्रफुल्ल देशमुख, अस्मिता देशमुख, जया देशमुख, प्रभारी मुख्याध्यापक वैभव देशमुख, शिक्षक अजय हिंगणकर, रमेश सोळंके, धनंजय देशमुख, शिक्षिका पूजा इंगळे व विद्यार्थी प्रतिनिधी प्रशिक पळसपगार, अनुष्का शेजे उपस्थित होते.

# काशीराम महाराज पुण्यतिथी महोत्सव प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
नांदगाव पेठ, दि. ३

संत काशीनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाला शनिवार, ४ जानेवारीपासून प्रारंभ होणार आहे. एक महिन्यापासून सुरू असलेली पुण्यतिथी महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात असून संत काशीनाथ महाराज यांच्या मंदिरावर तसेच मंदिर परिसर व छत्रपती शिवाजी महाराज चौकात आकर्षक रोशनाई देखील केली आहे. नाफडे पेट्रोल पंपानजीक असलेल्या संत काशीनाथ धाम या ठिकाणी धार्मिक वातावरणात पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन केले आहे.

विदर्भासह राज्यातील भाविकांची या पुण्यतिथी महोत्सवा दरम्यान दर्शनासाठी गर्दी उसळणार आहे. सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. सोपान महाराज काळबांडे आळंदीकर यांच्या वाणीतील संगीतमय भागवत कथेचे भाविकांसाठी आयोजन केले आहे. संत काशीनाथ महाराज विश्वस्त संस्था तसेच गावकरी मंडळी महोत्सवाच्या आयोजनासाठी अविरत परिश्रम घेत आहेत. पुण्यतिथी महोत्सवाचे हे १९ वे वर्ष आहे.

संत काशीनाथ महाराज यांचा भक्तगण संपूर्ण राज्यात असून, दरवर्षी पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने संतनगरी नांदगाव पेठ येथे भाविकांची मांदियाळी असते.

# भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त प्रतिकृती विजय स्तंभास मानवंदना

■ महासागर प्रतिनिधी
अंजनगाव सुर्जी, दि. ३

१ जानेवारी १८१८ ला भीमा कोरेगाव येथे शूरवीर ५०० महार सैनिकांनी २८ हजार पेशव्यांच्या पराभव करून जो इतिहास घडवला त्या शौर्य दिनानिमित्त अंजनगाव सुर्जी येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भीमा कोरेगाव प्रतिकृती विजय स्तंभास खा. बळवंत वानखडे, समता सैनिक दलाचे पदाधिकारी तसेच विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्तांनाच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

या वेळी सर्व प्रथम विजय स्तंभास समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देऊन बुद्ध वंदना, त्रिशरण, पंचशील घेण्यात आले. या वेळी मनोज मेळे, तेजस अभ्यंकर, प्रेमदास तायडे व सिद्धार्थ सावळे यांच्या कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते समाज भूषण पुरस्कार देण्यात आला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक समितीचे अध्यक्ष तेजस अभ्यंकर, साहेबराव सदाशिव, अमोल हेरोळेंसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# वनराई बंधारा बांधून दिवंगत प्राचार्यांना अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ३ :

माती-पाणी संवर्धन तसेच शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आयुष्यभर प्रयत्नरत असणाऱ्या आपल्या लाडक्या प्राचार्यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांनी एकत्र येत श्रमदानातून नवराई बंधाऱ्याची निर्मिती केली. या उपक्रमातून दिवंगत प्राचार्यांना या विद्यार्थ्यांनी अनोखे अभिवादन केले. यवतमाळ तालुक्यात येणाऱ्या मनपूर या गावी विद्यार्थ्यांनी या वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली असून विद्यार्थ्यांच्या या कायार्चे सर्वत्र कौतुक होत आहे.

कोरडवाहू शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडण्यासाठी आवश्यक असणारा कृती कार्यक्रम म्हणजेच पाणलोट क्षेत्र विकास. हा उपचार आपल्या विद्यार्थ्यांमार्फत विदर्भभर पोचवणारे कृतिशील प्राचार्य म्हणून डॉ. अविनाश शिर्के ओळखले जात होते. त्यांच्याकडून शेतकऱ्यांसाठीच नव्हे तर समाजातील विविध घटकांसाठी सातत्याने सामाजीक उपक्रम राबवण्यात येत होते. ३ डिसेंबर रोजी शिर्के यांचा स्मृतिदिवस होता. त्यानिमित्ताने सावित्री जोतिराव समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पाणलोट क्षेत्र उपचारातील दोन महत्त्वाचे उपचार शिकून घेत त्याची प्रत्यक्ष निर्मितीसद्धा केली. विद्यार्थ्यांनी एकत्रित येत महाविद्यालयाशेजारील फुटलेला बांध दुरुस्त केला. याशिवाय, यवतमाळ तालुक्यातील मनपूर येथे सुंदर वनराई बंधाऱ्याची निर्मिती करून आपल्या प्राचार्यांच्या कायार्ला कृतिशील अभिवादन केले.

या पथकाने केली बंधाऱ्याची निर्मिती या मोहिमेत प्रतीक भोंगाडे, कृणाल खिराडे, सचिन हटकर, संचित म्हैसकर, विवेक पाटील, वैष्णवी किन्हेकार, साक्षी सीडाम, प्रतीक बरडे, प्रियंका किनाके, प्रणय अराठे, भूमिका चचाने, प्रियंका अखंडे, हेमंत फुपरे, किरण गोंडे, भाग्यश्री मोहितकर, मेहर राठोड, अवंतिका कुरडकर, पल्लवी ठाकरे, प्रतीक्षा मांढरे ,हर्षदा नागोसे, दीपक मिरासे, गौरी हारगुडे, साक्षी वानखडे, अनघा दरणे आणि कोट्यापचे समन्वयक सुनील कदम यांनी सहभाग घेतला.

# वर्धमान गोरक्षणाच्या कामाचे भूमिपूजन

## लोणार येथे संरक्षण भिंत आणि सामाजिक सभागृहाची होणार उभारणी



■ महासागर प्रतिनिधी
लोणार, दि. ३ :

शहरातील वर्धमान गोरक्षण संस्थेचे गोरक्षण अद्ययावत करण्याच्या दृष्टीने सहा एकर भूखंडाला संरक्षण भिंत आणि सामाजिक सभागृहाचे जैन आचार्य युगंधर विजय यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

शहरात रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या गायींना जैन समाजाच्या माध्यमातील वर्धमान गोरक्षणात आश्रय देऊन संगोपन केले जाते. सद्यःस्थितीत या गौरक्षणमध्ये शंभरावर गायी आहेत. या गोरक्षणासाठी समाजबांधवांनी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी यांच्या माध्यमातून तत्कालीन आमदार डॉ. संजय रायमूलकर यांच्याकडे निधीची मागणी केली होती. त्यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून २ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करून आणला होता. या निधीच्या माध्यमातून गोरक्षण अद्ययावत करण्यात येणार आहे. त्या अंतर्गत गोरक्षणाच्या सहा एकर भूखंडाला संरक्षण भिंत आणि अद्ययावत सामाजिक सभागृहाचे बांधकाम होणार आहे. आज आचार्य युगंधर विजय यांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रवचनकार धनजयविजय, तपोजयविजय, सौम्यप्रज्ञा, विनीतप्रज्ञा, जिनदर्शना, तारुण्यताश्री यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी, श्री श्वेतांबर मुनिसुव्रत जैन संघाचे अध्यक्ष शांतीलाल सिंगी, वर्धमान स्थानकवासी संघाचे अध्यक्ष भीकमचंद डोंगरवाल, नवीनचंद संचेती, निर्मल संचेती, विजय गोलेच्छा, सुमित बोरा, अक्षय सुनील संचेती आदी उपस्थित होते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ABDUL NADEEM.** NOW MY NEW NAME IS **ABDUL NADEEM SHEIKH.**
**ADD :** HOUSE NO. 694, GANJIPETH NEAR HAJ HOUSE NAGPUR

MY OLD NAME WAS **SHEIKH ABDUL KAIF ABDUL SHAKEEL.** NOW MY NEW NAME IS **ABDUL KAIF.**
**ADD :** ADDRESS, PLOT NO.701 NALSAHEB CHOWK NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **DEVKANT KAILASH YADAV.** NOW MY NEW NAME IS **DEO KANT YADAVA.**
**ADD :** PLOT NO 15, RING ROAD DHADIWAL LAYOUT NAGPUR - 440027

MY OLD NAME WAS **ABDUL REHAN SHEIKH ABDUL KADIR.** NOW MY NEW NAME IS **REHAN KADIR SHEIKH.**
**ADD :** FLAT NO. 410B NARENDRA NAGAR NAGPUR

# महाकुंभ!



उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथील कुंभमेळ्याला सुरूवात होत आहे. केवळ देशातूनच नव्हे तर विदेशातून कोट्यवधी भाविक येथे येतात. कुंभमेळ्यासारख्या विशाल आयोजनातील आव्हानांना ओलांडून केवळ चार महिन्यांत उत्कृष्ट असे सुविधांयुक्त शहर वसवण्यात आले आहे. या ठिकाणी ५० दिवस सहभागी होणाऱ्या ४० कोटी भाविकांची गैरसोय होऊ नये, असा त्यामागील उद्देश आहे.

-----------------

या महाआयोजनासाठी आधुनिक व्यवस्थापनातील धडे गिरवण्यात आले. सर्वात मोठी बाब म्हणजे काम वेळेवर सुरू करणे. अडचण येत असल्यास बुलडोझरसारखी शक्ती वापरणे. उदाहरणार्थ- रस्ते रुंदीकरणामध्ये तसे झाले. प्रत्येक व्हर्टिकलकडून दररोज फीडबॅक घेतानाच आढावा घेतला गेला. त्यामुळे समस्या समजू शकली. मोठ्या प्रकल्पांत हे गरजेचे असते.

सगळे अधिकारी रात्री २ वाजेपर्यंत कुंभमेळ्यात असतात. बैठका घेतात. त्यामुळे टीममध्ये उत्तरदायित्वाची भावना राहते. काम कसे पूर्ण होईल, यावर नव्हे तर ते कोण उत्कृष्टपणे करू शकेल, यावर लक्ष केंद्रित केले जाईल. म्हणजेच गुणवत्तेशी तडजोड नाही. त्याशिवाय शहराला आधुनिक सुविधांशी जोडताना लाखो कर्मचाऱ्यांमध्ये अभिमानाची भावना असावी यावर लक्ष दिले गेले.

कारण प्रत्येक कर्मचाऱ्याला आपल्या कामाचा अभिमान असेल तर तो अशक्य वाटणारे कामही शक्य करू शकेल. कुंभमेळ्यातील हजारो स्वच्छता कामगार, नाविकांपासून अभियंत्यांपर्यंत ही अभिमानाची भावना दिसून येते. त्यातूनच मोठे उद्दिष्ट साध्य होऊ शकले.

**तीन लाख चष्मे देण्याची तयारी**

कुंभमेळ्यात नेत्र रुग्णालयही उभारले जात आहे. मेळा प्रशासनानुसार हे जगातील सर्वात मोठे अस्थायी रुग्णालय असेल. येथे ४५ दिवसांत पाच लाख मोतीबिंदूंची शस्त्रक्रिया होईल. ३ लाख गरीबांना चष्म्यांचे वाटपाची तयारी आहे.

अशा प्रकारचे सेटअप तयार करणे, दोन महिन्यानंतर ते हटवणे आणि यंत्रे आपपल्या ठिकाणी पोहोचवणे ही मोठी लॉजिस्टिक प्रकारातील कवायत म्हटली पाहिजे. हे काम अगदी अचूकपणे साध्य करणे मोठे आव्हानात्मक आहे.

**दूरसंचार दुरुस्ती :** ३० लाख मोबाइल ठेवून देखील कुंभमधील मोबाइल व्यवस्था नेहमी अयशस्वी राहिली. त्यामुळेच सहकारी वॉकी-टॉकीद्वारे सदैव संपर्कात राहण्याचा सराव करत आहेत. म्हणजे हातून काही निसटू नये.

कामाची वेळ पाहिल्यास येथे लोक १५-१५ तास काम करत आहेत. सुट्टी, ओव्हरटाइम, टीए-डीए यांची त्यांना चिंता नाही. सेवा करून त्यांना व कुटुंबाला अमर्याद असे पुण्य मिळेल, अशी त्यांची भावना आहे.

पिण्याचे पाणी, सांडपाण्यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. पंचतारांकित डोम, गरजूंना डॉरमेट्री आहे. अस्थायी शहर एवढ्या कुशलतेने चालू शकत असल्यास स्थायी शहरात असे का होत नाही? असा विचार मनात येतो. म्हणूनच अस्थायी शहराला कुंभमेळा विद्यापीठ म्हटले तर वावगे नाही.

सुंदरकांडमध्ये एक पद आहे..

*विनय न मानत जलधि*
*जड़ गए तीन दिन बीति,*
*बोले राम सकोप तब*
*भय बिनु होय न प्रीति...।*

त्याचा अर्थ, स्तुतीनंतरही समुद्राने श्रीरामांना मार्ग दिला नाही तेव्हा संतापून श्रीराम म्हणाले, हे लक्ष्मण हा मूर्ख सागर विनयाची भाषा जाणत नाही. काही लोक भीतीविना प्रेम समजू शकत नाहीत, अगदी तसेच हे आहे.

यावरून बोध घेऊन सीईओ म्हणजे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी प्रयागराजमध्ये रस्ता चौपदरीकरण अभियान रोखणाऱ्यांवर कडक उपाययोजना केली.

येथे प्रत्येक प्रश्नावर तोडगा आहे. कारण अनेक शहरांना अशाच प्रश्नांना सतत तोंड द्यावे लागते. येथील प्रभावी व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांचे शांत वागणे या गोष्टी जाणून घेण्यासाठी उज्जैनचे एडीजी उमेश जोगा यांनी येथे भेट दिली. कारण पुढचा कुंभमेळा त्यांच्या शहरात होणार आहे.

गंगा नदीने या वेळी सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत जमीन सोडलेली नव्हती. हेच सर्वात मोठे आव्हान होते. म्हणूनच हा प्रकल्प ३० दिवस विलंबाने सुरू झाला. एवढे असूनही रेताड जमिनीला वाळवून समतल करण्यात आले. म्हणजे क्रेनच्या साह्याने कचरा हटवता येऊ शकेल.

केवळ चार महिन्यांत ३०० किमी लांबीचा रस्ता बांधण्यात आला. एक किमी लांबीचे पूल तयार केले गेले. हे पूल अवजड वाहतुकीसाठी गरजेचे आहेत. कारण आयोजनाला काही दिवस बाकी आहेत.

कर्मचाऱ्यांनी आता प्रकल्प पूर्ण करताना त्यात शॉर्टकट वापरता कामा नये. कारण सगळे दबावाखाली आहेत. दोन महिने ही ऊर्जा कायम राहावी यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे.

2013 वर्षी झालेला महाकुंभ आणि यावर्षी होत असलेल्या महाकुंभाची व्यवस्था यात खूप फरक आहे. सुविधा वाढल्या आहेत. कॅम्पमध्ये शौचालये, नळ आणि अन्य सुविधांमध्ये बराच बदल झाला आहे.

यावेळी सरकार 5 हजार कोटींपेक्षा जास्त खर्च करत आहे. मागील कुंभाच्या तुलनेत यावेळी 3 पटीने जास्त भाविक येणार आहेत. या संदर्भात जत्रेचा आकारही वाढवण्यात आला आहे. 40 चौरस किलोमीटर परिसर सुशोभित व चकाचक करण्यात येत आहे.

कुंभनगरची सुरक्षा अभेद्य किल्ल्यासारखी मजबूत करण्यात आली आहे. कुंभनगरीच्या मास्टर प्लॅनचे काम वेगाने सुरू आहे. कुंभमेळा सुरू होण्याच्या 20 दिवस आधीपासून गर्दीमुळे दीड किलोमीटर अगोदर बॅरिकेड्स लावून वाहने थांबवली जात आहेत, अशा पद्धतीने तयारी सुरू आहे.

●●●●●



यावेळी महाकुंभाचे बजेट ५०६० कोटी रुपये आहे. केंद्र सरकारने महाकुंभासाठी २१०० कोटी रुपये दिले आहेत.



2013 च्या कुंभच्या वेळी राज्यात समाजवादी पक्षाची (एसपी) सत्ता होती. अखिलेश यादव मुख्यमंत्री होते.

या भव्य कार्यक्रमासाठी 1214 कोटी रुपयांचे बजेट देण्यात आले होते. मात्र, या मेळ्यावर एकूण 1017 कोटी 37 लाख रुपये खर्च झाला.

2025 च्या महाकुंभाचे बजेट 2013 पेक्षा 4,043 कोटी रुपये जास्त आहे.



**जत्रेत 2400 हेक्टरने वाढ, 30 पोंटून पूल बांधले**



क्षेत्रः 2013 मध्ये कुंभमेळा 16 चौरस किलोमीटर परिसरात होता. यावेळी 2400 हेक्टर क्षेत्र वाढले

---

# भारतीय सामाजिक कार्यकर्त्या!



## सिंधुताई सपकाळ पुण्यस्मरण विशेष

सिंधुताई सपकाळ या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या विशेषतः भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांना नुकताच २०२१ मध्ये सामाजिक कार्य श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या वेळोंवेळी अनेक गौरवांच्या मानकरी ठरल्या. सिंधुताईंना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांतील पद्मश्री पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार, मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार, आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनचा दत्तक माता पुरस्कार, सोलापूरचा डॉ.निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार,राजाई पुरस्कार, शिवलीला महिला गौरव पुरस्कार, श्रीरामपूर अहमदगर जिल्हा येथील सुनीता कलानिकेतन न्यासातर्फे कै.सुनीता त्र्यंबक कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार, सीएनएन- आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनने दिलेला रिअल हीरो पुरस्कार, दैनिक लोकसत्ताचा सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार, प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार, डॉ.राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार, पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार आदींचा समावेश आहे.

सिंधुताईंचा जन्म आणि त्यांचे सुरवातीचे जीवन खडतर होते. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १९४७ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात आणि ब्रिटीश भारतातील बेरार येथील अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला.

एक अवांच्छित मूल असल्याने त्यांचे नाव चिंधी- फाटलेल्या कापडाचा तुकडा ठेवले. पण हीच चिंधी अनेक फाटक्या ठिगळांना जोडते, याचा त्यावेळी कोणी विचारही केला नसेल. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली.



श्रीकृष्णदास निरंकारी- बापू. गडचिरोली. ९४२३७१४८८३

त्यांचे वयाच्या बाराव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लग्न झाले, जे त्यांच्यापेक्षा तब्बल वीस वर्षांनी मोठे होते. लग्नानंतर त्या वध्यार्तील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या. घरी प्रचंड सासुरवास होता.

कुटुंबात शैक्षणिक वातावरण नाही. जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या तर त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत.

अठराव्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वळणे, हाच व्यवसाय असायचा. गुरेही शेकड्यांनी असायची. त्यांचे शेण काढता काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही.

रस्त्यावर मुरूम फोडणाऱ्यांना मजुरी, पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्टवाले करायचे. इथे सिंधुताईंनी बंड पुकारले आणि लढा सुरू केला. त्यामुळे या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गदा आली. हा लढा जिंकल्या पण त्यांना या लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली.

ताईंच्या या धैर्याने गावातील जमीनदार, दमडाजी असतकर दुखावला गेला होता. जंगलखात्याकडून येणारी मिळकत बंद झाली. दमडाजीने सिंधुताईंच्या पोटातील मूल आपले असल्याचा प्रचार सुरू केला. नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारून घराबाहेर काढले.

गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांना कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. हे लग्न फार काळ टिकले नाही आणि वयाच्या वीसव्या वर्षीच त्यांना त्यांच्या मुलीसोबत नवऱ्याने सोडून दिले.

माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या, पण सख्ख्या आईनेही पाठ फिरवली. परभणी, नांदेड, मनमाड रेल्वे स्टेशनांवर त्या भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या.

एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. त्या दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. परंतु तेथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही.

स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनी २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना तेथे कायम राहता येणार नाही. म्हणून शेवटी सिंधुताईंनी स्मशान गाठले.

अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. सन १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली.

आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. तेथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाऊ लागले. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जात असे.

शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते.

अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. त्यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत त्या अशा- बाल निकेतन हडपसर, पुणे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा. अभिमान बाल भवन, वर्धा. गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा. ममता बाल सदन, सासवड. सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेशदौरे केले आहेत.

आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या बोलण्याने आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन संस्थेची स्थापना केली आहे. त्यांना महानुभाव पंथाचा अनुग्रह होता. महानुभाव पंथाच्या नियमाप्रमाणे त्यांना भुमीडाग देण्यात आला.

अशातच सिंधुताईंवर दि.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये डायफ्रामॅटिक हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. त्यांच्यावर शस्त्रक्रियोत्तर काळजी घेण्यात येत होती. पाच वर्षांहून अधिक काळ ग्रस्त असलेल्या डायफ्रामॅटिक हर्नियामुळे त्यांचे डाव्या बाजुचे फुफ्फूस व्यवस्थितरित्या कार्य करीत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रकृती थोडी बरी झाली होती.

तथापि, पाच दिवसांपूर्वी त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग वाढल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली, त्यामुळे त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि दि.०४ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ८ वाजून १० मिनीटांनी त्यांचे निधन झाले.

पुणे येथील गॅलक्सी केर या दवाखान्यामध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. स्मृतिदिनी त्यांच्या ममत्वाला व कार्यकर्तृत्वाला मानाचा लवून मुजरा!!

■ ■ ■

---

# पाच राज्ये ओलांडून ईशान्येत पोहोचताहेत पाकची शस्त्रे



पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आता भारताच्या ईशान्येकडील राज्यांमध्ये अशांततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी जातीय वातावरण तापवण्यात गुंतली आहे. यासाठी आधुनिक शस्त्रास्त्रांची मोठी खेप पाकिस्तानमधून जम्मू, काश्मीर आणि पंजाबमार्गे ईशान्येकडील राज्यांमध्ये आणली जात आहे.

यासाठी बिहार राज्याचा वापर ट्रान्झिट मार्ग म्हणून आणि तस्करांसाठी शस्त्रे ठेवण्यासाठी केला जात आहे. अलीकडेच या संदर्भात गुप्तचर तपास यंत्रणांना काही माहिती मिळाली आहे.

गुप्तचर यंत्रणांना माहिती मिळाली आहे की, पाकिस्तानचे काही मोठे शस्त्रास्त्र तस्कर तस्करीच्या माध्यमातून जम्मू-काश्मीर आणि पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे पुरवत आहेत.

ही शस्त्रे येथून हरियाणातील गुप्त तळांवर, नंतर यूपी आणि बिहारमार्गे नेली जातात. मागणीनुसार नागालँड, मणिपूर आणि इतर ईशान्येकडील राज्यांना ही शस्त्रे पुरवली जात आहेत.

पाकिस्तानचे काही मोठे शस्त्रास्त्र तस्कर जम्मू-काश्मीर आणि पंजाबमध्ये तस्करीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे पुरवत आहेत.

एनआयएने 5 राज्यांतील संशयास्पद ठिकाणी छापे टाकून शस्त्रे आणि रोख रक्कम जप्त केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. गुप्तचर यंत्रणांनी डार्क वेबवर पाकिस्तानातील काही शस्त्रास्त्रे तस्कर आणि भारतातील काही शस्त्रास्त्र तस्कर यांच्यातील संभाषण रोखले होते. यावरून ईशान्येकडील राज्यांमध्ये वातावरण बिघडवण्यासाठी अवैध शस्त्रे मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात असल्याचे समोर आले आहे. या शस्त्रांचे पेमेंट बिटकॉईनद्वारे करण्यात आले आहे.

●●●●●

---

# खराब हवेचा आरोग्यावर परिणाम

मुंबई आणि परिसराच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरायला लागली आहे. गेले काही दिवस मुंबई, नवी मुंबई आणि मुंबई उपनगर या ठिकाणच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरली आहे याचा दुष्परिणाम नागरिकांवर होऊ लागला आहे.

मुंबईच्या हवेत धुळीचे बारीक कण असल्याने त्याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांवर होऊ लागला आहे. मुंबईत दम्याचे रुग्ण वाढू लागले आहेत त्यामागेही हेच कारण आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यात प्रामुख्याने वाढते औद्योगीककरण, वाहनांचे प्रदूषण, वाढती बांधकामे.

मुंबईत, रस्ते, मेट्रो, इमारती आदींचे बांधकामे सुरू असून त्यासोबतच वाहनांमधून उत्सर्जित होणारे कणही वातावरणात जमा होतात. हवेतील धूळ, कण आणि इतर प्रदूषण करणारे घटक पावसामुळे वातावरणातून बाहेर पडतात. पावसाळा संपला तरी हे कण हवेतच राहतात. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरण्यामागे देखील हेच कारणे आहेत.

मुंबईच्या हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने तज्ज्ञांची समिती नेमायला हवी. या समितीने मुंबईच्या हवेचा दर्जा कसा सुधारेल याचा अभ्यास करावा त्यासाठी या समितीला परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यावी लागली तरी सरकारने ती मिळवून द्यावी. कारण मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरणे म्हणजे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात येणे.

मुंबईकरांचे आरोग्य टिकवायचे असेल तर हवेच्या प्रदूषणावर ठोस उपाय करावाच लागेल. दिवाळी नंतर हे वायू प्रदूषण आणखी वाढेल असा इशारा तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरला. सरकारने दसरा, दिवाळी, नाताळ व नववर्षात वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांवर देखील बंदी घालावी. कारण फटाक्यांच्या प्रदूषणाने हवा आणखी खराब होते त्याचा दुष्परिणाम शेवटी मुंबईकरानांच भोगावा लागतो.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

चक्रीवादळ, मुसळधार पाऊस याची माहिती जशी एस एम एस ने दिली जाते तशी दुसऱ्या दिवसाच्या संभाव्य प्रदूषण पातळीची माहिती देता येईल . असे तंत्रज्ञान तयार करावे जेणेकरून नागरिक प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करतील. मुंबईतील वाढत्या वाहनांवर देखील नियंत्रण आणावे, वाढत्या वाहनांमुळे देखील प्रदूषण वाढत आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबईत सम विषमचा प्रयोग करावा.नागरिकांनीही सार्वजनिक वाहनांचा वापर करावा. वाढते प्रदूषण ही खूप गंभीर समस्या आहे. ही समस्या केवळ मुंबई दिल्ली सारख्या मोठ्या शहरातच नाही आहे असे नाही तर संपूर्ण देशातच ही समस्या आहे. त्यामुळे देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने कायम स्वरुपी ठोस उपाययोजना करावेत.

●●●●●

---

# हिवाळ्यात वजन कमी करायचे?

## स्वयंपाकघरातील हे पदार्थ ठरतील फायदेशीर



धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेकांना लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब आणि मानसिक ताण यांच्यासारख्या समस्या उद्भवतात. लठ्ठपणामुळे तुम्हाला अनेक समस्या होऊ शकतात. दररोज सकाळी नियमित व्यायाम केल्यास आणि योग्य आहार खाल्यास लठ्ठपणा कमी होतो.

शरीरातील चरबी कमी करण्यासाठी तुमच्या तुमच्या आहारामध्ये काही विशेष गोष्टींचा समावेश करणे गरजेचे आहे. तुमच्या शरीरामध्ये लठ्ठपणा वाढल्यामुळे हार्मोनल बदल होतात. अशा स्थितीमध्ये वजन कमी करणे गरजेचे असते.

वजन कमी करण्यासाठी आहारामध्ये भरपूर प्रमाणात प्रोटिन फायबर आणि मिनरल्स सारख्या घटकांचा समावेश करावा लागणार. त्यासोबतच तेलकट आणि मसालेदार पदार्थांचे सेवन टाळावे लागेल.

तेलकट पदार्थांमध्ये भरपूर प्रमाणार फॅट्स आणि कॅलरिज असतात ज्यामुळे वजन वाढते. वजन कमी करण्यसठी तुमच्या आहारामध्ये काही विशेष गोष्टींचा समावेश करणे गरजेचे असते.

**हिरवी मिरची :** वजन कमी करण्यासाठी तुमच्या आहारामध्ये हिरव्या मिरचीचे सेवन फायदेशीर ठरते. हिरव्या मिरचीचे सेवन केल्यामुळे तुमचे आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते.

त्यासोबतच तुमचे चयापचय सुधारते. त्यामुळे तुम्हाला जर वजन कमी करायचे असेल तर दररोज २ ते ३ हिरव्या मिरच्या खाणे अत्यंतत फायदेशीर ठरेल.

**हिरवे मूग :** हिरव्या मुगाच्या डाळीमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन अ, ब, क आणि ई असते ज्यामुळे शरीर निरोगी राहाण्यास मदत होते. याशिवाय हिरव्या मुगाचे सेवन केल्यामुळे तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात कॅल्शियम, लोह, फायबर आणि प्रोटीन मिळते. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात हिरव्या मुगाच्या डाळीचे सेवन करा.

**वेलची :** दररोज तुमच्या आहारामध्ये वेलचीचे सेवन केल्यामुळे तुमच्या शरीरातील चयापचय सुधारते. तुमच्या दैनंदिन आहारामध्ये वेलचीचे सेवन केल्यामुळे तुमची पचनशक्ती वाढते, गॅस, ॲसिडिटी अशा समस्या होणार नाहीत. वजन कमी करायचे असेल तर दरोरज झोपण्यापूर्वी किंवा सकाळी लवकर उठल्यावर २ ते ३ वेलचीचे सेवन करावे.

**कढीपत्ता :** कढीपत्त्यात भरपूर प्रमाणात ॲंटिऑक्सिडेंट आणि लठ्ठपणाविरोधी गुणधर्म असतात. ज्यामुळे वजन कमी करण्यासाठी आणि शरीर डिटॉक्सिफाय करण्यासाठी आहारामध्ये कढीपत्त्याचे सेवन करणे गरजेचे असते.

**ग्रीन टी :** आजकाल अनेकांना ग्रीन टीचे सेवन करण्यास आवडते. ग्रीन टी प्यायल्यामुळे तुमच्या शरीरामध्ये चयापचय वाढते. त्यासोबतच तुमच्या शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती वाढण्यास मदत होते. दररोज सकाळी ग्रीन टीचे सेवन केल्यामुळे तुमच्या शरीरातील खराब चरबी वितळते आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते.

■ ■ ■

---

## अशोकायन

### आरोग्य हीच संपत्ती

आरोग्य हीच संपत्ती
मुद्दा ठेवा ध्यानी
आरोग्याची कराल हेळसांड
होईल अपरिमीत हानी ..

व्यायाम आहार निद्रा
यात असावे सामंज्यस्य
सुखी हसतमुख जीवनाचे
भाऊ ह्यात दडलय रहस्य..

संपत्ती असुनही करोडोची
जर शरीर देत नसेल साथ
उपभोग कसा घ्याल वस्तुंचा
आयी क्या समझमे बात?



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# डाबर च्यवनप्राशने तुमची प्रतिकारशक्ती वाढवा आणि हिवाळ्याचा आनंद घ्या



**नागपूर, ३ जानेवारी :** हिवाळा कोणाला आवडत नाही, पण या हिवाळ्यात खोकला, सर्दी आणि श्वसनाचे आजार उद्भवले की, थंडीची मजाच विरून जाते. सामान्यत: तापमान आणि बदलत्या हवामानामुळे माणसाच्या शरीरातील प्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे हे आजार होतात. अशा परिस्थितीत, हजारो वर्षांपासून प्रसिद्ध असलेले आणि लाखो लोकांनी यशस्वीरित्या प्रयोग केलेले आयुर्वेदिक उत्पादन च्यवनप्रास खूप दिलासा देते. डाबर च्यवनप्राशचे सेवन केल्याने आपली प्रतिकारशक्ती वाढवून या ऋतूत वारंवार होणाऱ्या खोकला आणि सर्दी यांसारख्या आजारांपासून तर आपले संरक्षण होतेच शिवाय आपल्या शरीरातील अनेक अवयवांचे कार्य सुधारून शरीर मजबूत होते.

डाबरच्या प्रमुख आरोग्य सेवा ब्रँड डाबर च्यवनप्राशने देशभरातील वंचित मुलांना सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने एक मेगा जागरूकता उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली. या उपक्रमांतर्गत, डाबर च्यवनप्राशने अग्रगण्य डॉक्टरांच्या सहकार्याने मुलांना बदलणारे हवामान, सामान्य जीवाणू आणि विषाणूंशी लढण्यासाठी मजबूत रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करण्याची आवश्यकता याविषयी शिक्षित करण्यासाठी रोग प्रतिकारशक्ती सत्र आयोजित केले.

सुवती देवी झुनझुनवाला कन्या विद्यालय, नागपूर येथील २५० हून अधिक मुलांसाठी आयोजित केलेल्या विशेष सत्राद्वारे या मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला सुवती देवी झुनझुनवाला कन्या विद्यालय, नागपूरच्या आदरणीय मुख्याध्यापिका श्रीमती कविता पवार आणि डाबर इंडिया लिमिटेडचे विपणन प्रमुख राजीव जॉन उपस्थित होते. हिवाळ्यात आजारांशी लढण्यासाठी मुलांमध्ये जागृती निर्माण करणे हा या सत्राचा उद्देश होता. मूलभूत स्वच्छता आणि पौष्टिक आहाराद्वारे त्यांची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे मार्गही मुलांना शिकवले गेले.

याप्रसंगी बोलतांना, अमित गर्ग, मार्केटिंग हेड हेल्थ सप्लीमेंट्स, डाबर इंडिया लिमिटेड म्हणाले, डाबर च्यवनप्राश प्रत्येक भारतीयाला १०० वर्षांहून अधिक मजबूत प्रतिकारशक्ती प्राप्त करण्यास मदत करण्यासाठी वचनबद्ध आहे या मुलांना च्यवनप्राश पुरवण्याबरोबरच दरवर्षी अनेकांचा जीव घेणाऱ्या शीतलहरीबद्दलही आम्ही चिंतित आहोत. आम्ही वंचित मुलांना उघड करून त्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करू. डॉ. परमेश्वर अरोरा, एमडी (आयुर्वेद), म्हणाले, हवामान बदलाच्या चक्रात अचानक तापमानात बदल होतो, जो खोकला, सर्दी आणि फ्लू, श्वासोच्छवासाच्या समस्या, कमी प्रतिकारशक्ती इ. सारख्या आजारांना कारणीभूत असतो डाबर च्यवनप्राश हा रोगांशी लढण्याचा प्रभावी उपाय आहे.

या मोहिमेअंतर्गत आग्रा, वाराणसी, गोरखपूर, लखनौ, उदयपूर, जयपूर, भुवनेश्वर, कोलकाता, सिलीगुडी, पाटणा, गया, इंदूर, रायपूर, पुणे, औरंगाबाद, रांची, बेंगळुरू, मुंबई या २२ शहरांमध्ये डाबर च्यवनप्राश उपलब्ध आहे. नाशिक, नागपूर यांनी ग्वाल्हेर आणि भोपाळच्या आघाडीच्या स्वयंसेवी संस्थांशी हातमिळवणी केली आहे.

च्यवनप्राश हे जवळपास ३००० वर्षे जुने प्रसिद्ध आयुर्वेदिक फॉर्म्युलेशन आहे, ज्याचा उपयोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि खोकला आणि सर्दी यांसारख्या दैनंदिन संसर्गापासून प्रतिकार करण्यासाठी केला जातो. डाबर च्यवनप्राशचा मुख्य घटक आवळा आहे जो रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या गुणधर्मांसाठी ओळखला जातो. गुडूची, पिपली, शतावरी, विदारिकंद, हरितकी, कांतकरी, काकडशिनी, भूमिमाकी, वसाका, पुष्करमुल, प्रिशिपर्णी, शालापर्णी इत्यादी इतर घटक सामान्य संक्रमण आणि श्वसनमार्गाच्या ऍलर्जी कमी करण्यास मदत करतात. डाबर च्यवनप्राश हे या औषधी वनस्पती आणि घटकांचे परिपूर्ण मिश्रण आहे जे हिवाळ्याच्या हंगामात चांगल्या आरोग्यासाठी प्रतिकारशक्ती प्रदान करते.

# नेहा जोशी १०० वर्ष जुन्या बेंचवर बसल्यानंतर भावूक झाल्या, ज्यावर अटल बिहारी वाजपेयी बसायचे



**मुंबई, ३ जानेवारी :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'अटल'मध्ये कृष्णा देवी वाजपेयीची भूमिका साकारणाऱ्या प्रतिभावान अभिनेत्री नेहा जोशी या मालिकेचा पहिला वर्धापन दिन साजरा करण्यासाठी नुकतेच ग्वाल्हेरला गेल्या होत्या. ही फक्त ट्रिप नव्हती तर इतिहासाची माहिती देणारी, महान नेता स्वर्गीय श्री. अटल बिहारी वाजपेयी यांना मानवंदना देणारी भेट ठरली, त्यांचा वारसा आजही लाखो व्यक्तींना प्रेरित करत आहे. नेहा यांच्यासाठी हा प्रवास त्यांच्या भूमिकेच्या सेलिब्रेशनपेक्षा अधिक ठरला आणि त्यांना वैयक्तिक अनुभव मिळाला. अटलजींचा जन्म झालेल्या शहराच्या कानाकोपऱ्यामध्ये फेरफटका मारण्याचा निर्धार करत त्यांनी या असाधारण व्यक्तीमत्त्वाच्या जीवनाला आकार दिलेले स्थळ व गाथांचा अनुभव घेतला. त्यांच्या भेटीचे खास आकर्षण ठरलेल्या क्षणाने त्यांना भवूक केले, तो क्षण म्हणजे त्या शंभर वर्षे जुन्या बेंचवर बसल्या, ज्यावर अटलजी बसून त्यांचे आवडते स्नॅक मंगोदाचा (पकोडे) आस्वाद घ्यायचे. हा बेंच फक्त स्थान नव्हते तर अटलजी या बेंचवर बसून अनेक स्वादिष्ट मिष्टान्नाचा आस्वाद घ्यायचे. नेहा यांना त्या काळात गेल्यासारखे वाटले, मालिकेमध्ये त्या साकारत असलेल्या या महान नेत्याच्या आईच्या भावनांशी संलग्न झाल्या. नेहा जोशी ऊर्फ कृष्णा देवी वाजपेयी म्हणाल्या, ''या ऐतिहासिक बेंचवर बसून त्यांच्या आवडत्या पकोड्यांचा आस्वाद घेताना मी भारावून गेले. तो फक्त आहार नव्हता तर जुन्या काळाची आठवण करून देणारा क्षण ठरला. या बेंचमध्ये त्यांच्या विनम्र शुभारंभांची गाथा सामावलेली आहे, ज्यामधून अटलजींच्या जीवनातील साधेपणा व सखोलता दिसून येते. तो क्षण भावूक, तसेच परिवर्तनात्मक ठरला.''

या भेटीदरम्यान त्या एका दुकानदाराला देखील भेटल्या, जो अटलजींना त्यांच्या पंतप्रधान असण्याच्या काळामध्ये त्यांचे आवडते स्नॅक द्यायचा. अनेक वर्षे उलटली तरी या दुकानामध्ये काहीच बदल झालेले नाही आणि आजही कार्यरत आहे. नेहा म्हणाल्या, ''दुकानाच्या मालकाने प्रथम देवाला आणि त्यानंतर अटलजींच्या फोटोच्या बाजूला असलेल्या त्यांच्या आईच्या फोटोला पकोडे वाहिले. आदर व कृतज्ञतेमध्ये सामावलेली ही परंपरा होती आणि मला त्या दिवसामधील पहिला ग्राहक असण्याचा अभिमान वाटला. तो गेस्चर साधा, पण सर्वोत्तम होता, ज्यामधून त्या युगाची कालातीत मोहकता दिसून आली.'' नेहा यांनी इतिहासाला उजाळा देण्यासोबत त्यामध्ये सामावून देखील गेल्या. त्या म्हणाल्या, ''अभिनेत्री म्हणून मी भूमिकांसंदर्भात संशोधन करते आणि भूमिका साकारते, पण या ट्रिपदरम्यान मी त्यांचा प्रवास जगले. ग्वाल्हेरच्या रस्त्यांमधून चालताना, त्यांच्या आवडत्या स्थळांना भेट देत आणि त्यांच्याबाबत कथा ऐकताना मला या महान नेत्यामागील माणूस समजला. या अनुभवाने माझ्या मनावर अमिट छाप पाडली आहे आणि मला माझ्या भूमिकेमध्ये वास्तविकता आणण्यास मदत केली आहे.''

# सी. आर. आय. पंप्सने एक महत्त्वाचा टप्पा गाठला: २५,००० सोलर पंपिंग सिस्टीमसाठी एमएसईडीसीएल, मुंबईकडून रुपये ७५४ कोटींची ऑर्डर प्राप्त



**मुंबई, ३ जानेवारी :** सी. आर. आय. पंप्सला शाश्वतता आणि नूतनीकरणक्षम उर्जा उपायांच्या वचनबद्धतेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा जाहीर करताना अभिमान वाटतो. मागेल त्याला सौर कृषी पंप (एमटीएसकेपी) योजनेचा एक भाग म्हणून, रुपये ७५४ कोटी मूल्याच्या २५,००० सोलर पंपिंग सिस्टीम्सचा पुरवठा करण्यासाठी कंपनीला महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रिब्युशन कंपनी लिमिटेड (एमएसइडीसीएल), मुंबई, महाराष्ट्र द्वारे अधिकृतपणे पॅनलमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

या समावेशासह, सी. आर. आय. पंप्स, नूतनीकरणक्षम ऊर्जा उपायांचा अवलंब करण्यास, महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला सामर्थ्यवान बनविण्यासाठी आणि अधिक हिरवेगार, अधिक शाश्वत भविष्यासाठी योगदान देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी सज्ज आहेत.

या महत्त्वपूर्ण टप्प्यावर टिप्पणी करताना, सी. आर. आय. समूहाचे अध्यक्ष जी. सौंदरराजन म्हणाले, 'या सोलर पंपिंग सिस्टीम्सचा पुरवठा करण्यासाठी एम एस ई डी सी एल द्वारे निवड केल्याचा आम्हाला विशेषाधिकार प्राप्त झाला आहे. या महत्त्वपूर्ण ऑर्डरमुळे विश्वासार्ह, ऊर्जा-कार्यक्षम, शाश्वत पंपिंगचे शाश्वत उपाय विकसित करण्यासाठी सी. आर. आय. ची नवकल्पना आणि उत्कृष्टतेसाठी अटूट वचनबद्धतेवर प्रकाश टाकला गेला आहे. आमची सुदृढ अंमलबजावणी क्षमता, उद्योगातील विशेष कौशल्य आणि सर्व प्रदेशांमध्ये विस्तृत नेटवर्कसह, सी. आर. आय. पंप्स या प्रणालींचे सहज वितरण आणि स्थापना सुनिश्चित करते. नूतनीकरणक्षम ऊर्जेतील जागतिक संक्रमणाला गती प्राप्त होत असताना, सी. आर. आय. पंप्स, अशी सोलर पंपिंग सिस्टीम ऑफर करण्यासाठी सखोलपणे समर्पित आहे जी, पर्यावरणीय कारभाराला चालना देतात आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी शाश्वत भविष्य सुनिश्चित करते.

१७०,००० हून अधिक सोलर पंपिंग सिस्टीम आणि आयओटी-सक्षम स्मार्ट पंप्सच्या यशस्वी स्थापनेसह, सी. आर. आय. पंप्स, शाश्वत नवोपक्रमात नवीन मानके प्रस्थापित करत आहेत. त्याच्या प्रगत पम्पिंग तंत्रज्ञानाद्वारे, सी. आर. आय. पंप्सने महत्त्वपूर्ण यश प्राप्त केले आहे, ज्यामध्ये अंदाजे ५,२०० दशलक्ष युनिट्स केडब्ल्युएच ची ऊर्जा बचत आणि ४.१३ दशलक्ष टन कार्बन उत्सर्जन कमी करणे, ऊर्जा संवर्धन आणि पर्यावरणीय स्थिरतेसाठी त्याचे सखोल योगदानावर प्रकाश टाकणे समाविष्ट आहे.



## आरोहन फायनान्शियल सर्व्हिसेसद्वारे राज्यभर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन

**नागपूर, ३ जानेवारी :** आरोहन फायनान्शियल सर्व्हिसेस, एक अग्रगण्य एनबीएफसी एमएफआय कंपनी असून, महाराष्ट्रातील ९ ठिकाणी जानेवारी महिन्यांत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. एका स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने या आरोग्य तपासणी शिबिर राज्यभरात घेतली जाणार आहे. कमी सुविधा असलेल्या समुदायांना आरोग्यसेवेचा लाभ देणे आणि त्यांच्यासाठी दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

आरोहन फायनान्शियल सर्व्हिसेस यवतमाळ, अमरावती, नागपूर, बुलढाणा, नांदेड आणि लातूर सारख्या जिल्ह्यांमध्ये मूलभूत आरोग्य तपासण्या प्रदान करणार आहे, ज्यामध्ये रक्तदाब, रक्तातील साखरेची तपासणी, बीएमआय मापन इत्यादींचा समावेश असेल. सामान्य आजार आढळलेल्या व्यक्तींना आवश्यकतेनुसार औषधोपचार दिले जातील, तर विशेष उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवले जाईल. महाराष्ट्रा प्रमाणेच बिहार, झारखंड, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम, त्रिपुरा, छत्तीसगड, गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये १५१ आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन आरोहन करत आहे. सामान्य आरोग्य समस्यांच्या सुरुवातीच्या निदानावर आणि त्याच्या व्यवस्थापनावर या आरोग्य शिबिरांचा भर असेल.

या उपक्रमाचा उद्देश आरोग्यसेवा सुधारणे, समुदायांना सक्षम बनवणे आणि ग्रामीण व दुर्गम भागांतील लोकांपर्यंत वेळेवर व दर्जेदार वैद्यकीय सेवा पोहोचवणे हा आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यावर भर देऊन व सुरुवातीच्या निदानाला प्रोत्साहन देऊन, हा उपक्रम लोकांच्या आरोग्यासाठी दीर्घकालीन सकारात्मक परिणाम घडवेल आणि भारतातील नागरिकांच्या कल्याणासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल.

# ऐश्वर्या खरे उर्फ लक्ष्मीच्या थायलंडच्या सोलो ट्रिपची ही छायाचित्रे पहा!



**मुंबई, ३ जानेवारी :** दैनंदिन मालिकेच्या सेटवर जीवन सोपे नसते आणि भाग्यलक्ष्मीच्या ऐश्वर्या खरेला हे चांगलेच ठाऊक आहे. या वर्षी, वर्षभराच्या शूटिंग आणि त्यातील उत्कट कथानकानंतर, तिने ब्रेक घेण्याचे ठरवले आणि वर्षाचा शेवट आनंदात करण्यासाठी सोलो ट्रिपचा आनंद लुटण्याचा निर्णय घेतला. आपल्या कामाबद्दलच्या समर्पणासाठी ओळखल्या जाणाऱ्या, ऐश्वर्याने २०२४ चा बहुतेक काळ आपल्या दमदार अभिनयाने आपली भूमिका साकारण्यात आणि प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात घालवला.

अखेर या ब्रेकमध्ये ऐश्वर्याने थायलंडच्या सोलो ट्रिपची सुरूवात केली आणि तिच्या बकेट लिस्टमधील एक स्वप्न पूर्ण केले. शांत समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारत आणि प्राचीन मंदिरांमध्ये शांतता मिळवताना, तिने या ट्रिपमध्ये आराम मिळवला, गतवर्षाबद्दल विचार केला आणि स्वत:शी पुन्हा जोडण्याची संधी घेतली. तिने गेल्या २ वर्षात बाली आणि सेशेल्स सारख्या ठिकाणी देखील भेट दिली आहे, असं दिसतंय की सोलो ट्रिप्स या ऐश्वर्यासाठी वार्षिक परंपरा बनल्या आहेत!

ऐश्वर्या म्हणाली, अविश्वसनीय पण जबरदस्त वर्षानंतर, मी शेवटी नवीन वर्ष साजरे करण्यासाठी खूप आवश्यक असलेला ब्रेक घेतला आणि घडलेल्या प्रत्येक चांगल्या वाईट गोष्टीचा विचार केला. एक समुद्र प्रेमी म्हणून, मी माझ्या सोलो ट्रिपसाठी थायलंड निवडले. थायलंडच्या निर्मळ सौंदर्याने मला हवी असलेली स्पष्टता आणि शांतता प्रदान केली. दररोज संध्याकाळी, मी समुद्रकिनाऱ्यावर जादुई सूर्यास्त पाहत असे. तिथे मी पारंपारिक थाई मसाज देखील घेतला, स्वच्छ नितळ पाण्यात स्नॉर्कलिंग केले आणि छान स्वादिष्ट स्थानिक व्यंजनांचा आस्वाद घेतला. वर्षाचा शेवट निसर्गाने वेढलेला करताना खरोखरच नवचैतन्य मिळाले आणि आता मी नवीन ऊर्जा आणि उत्साहाने नववर्षात पाऊल ठेवण्यास तयार आहे.

असं दिसतंय की ऐश्वर्याने नक्कीच चांगली सुट्टी घालवली आहे आणि नवीन उर्जा आणि उत्साहाने नवीन वर्षाची सुरुवात करण्यासाठी ती सज्ज आहे!

भाग्यलक्ष्मीच्या आगामी भागांमध्ये प्रेक्षकांसाठी हे पाहणे मनोरंजक असेल की कसे शालू (मुनिरा कुदरती) ऐवजी लक्ष्मीला पळवून नेणाऱ्या गुंडांपासून ऋषी (रोहित सुचांती) तिला कसा वाचवेल.

# ग्रीव्स इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडने सेबीकडे सादर केले डीआरएचपी

ग्रीव्स इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेड ही म्पेरे, एल्ट्रा आणि एले ब्रँड्ससाठी ओळखली जाणारी ईव्ही निर्माती कंपनी असून, इलेक्ट्रिक टू-व्हीलर (E-2W) आणि थ्री-व्हीलर (3W) विभागांमध्ये B2C आणि B2B ग्राहकांसाठी वैयक्तिक व व्यावसायिक उद्देशांसाठी पूर्ण वाहनांचा संच ऑफर करते. कंपनीने प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (IPO) द्वारे निधी उभारण्यासाठी सेबीकडे ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (DRHP) सादर केला आहे.

ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसनुसार, कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग हा फ्रेश इक्विटी शेअर्सचा इश्यू आहे, ज्यामध्ये १,००० कोटींपर्यंतची ताज्या इक्विटी शेअर्सची विक्री होईल आणि १८,९३,९८,२०० इक्विटी शेअर्स (१८.९ कोटी शेअर्स) च्या ऑफर फॉर सेलचा समावेश आहे, जे विक्री करणाऱ्या शेअर्स होल्डर्सद्वारे विकले जातील. ऑफर फॉर सेल घटकांतर्गत, ग्रीव्स कॉटन लिमिटेड, प्रमोटर विक्री करणारा शेअरहोल्डर याचे ५.१ कोटी इक्विटी शेअर्स विकेल आणि अब्दुल लतीफ जामील ग्रीन मोबिलिटी सोल्युशन्स DMCC, गुंतवणूकदार विक्री करणारा शेअरहोल्डर, १३.८ कोटी इक्विटी शेअर्स विकतील.

कंपनीने BRLMs च्या सल्लामसलतीने रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल करण्यापूर्वी २०० कोटींपर्यंतच्या प्री-आयपीओ प्लेसमेंटचा विचार केला जाऊ शकतो. जर प्री-आयपीओ प्लेसमेंट पूर्ण झाल्यास, ताज्या इश्यूचे प्रमाण त्या प्री-आयपीओ प्लेसमेंटच्या प्रमाणात कमी केले जाईल.

२००८ मध्ये स्थापन झालेल्या ग्रीव्स इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेड (GEML) ने निवेदन केले आहे की, कंपनी ताज्या इश्यूच्या निव्वळ उत्पन्नाचा वापर खालीलप्रमाणे करेल: उत्पादन आणि तंत्रज्ञान विकासासाठी आणि बेंगळुरूमधील तंत्रज्ञान केंद्रातील क्षमता वाढवण्यासाठी (३७५.२ कोटी); इन-हाऊस बॅटरी असेंबली क्षमता विकसित करण्यासाठी (८२.९ कोटी); बेस्टवे एजन्सीज प्रायव्हेट लिमिटेड (पूर्णपणे मालकीची सामग्री उपकंपनी) ची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी (१९.८ कोटी); MLR ऑटो लिमिटेड (एक सामग्री उपकंपनी) ची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी (छ३८.२ कोटी); MLR मध्ये कंपनीची हिस्सेदारी खरेदी करून वाढविण्यासाठी (७३.६ कोटी); डिजिटायझेशन वाढविण्यासाठी आणि माहिती तंत्रज्ञान पायाभूत सुविधा उभारण्यासाठी (२७.८ कोटी); इतर खरेदी आणि सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी अजून काही अनैर्गिक वाढ निधी पुरविण्यासाठी.

मोटिलाल ओस्वाल इन्व्हेस्टमेंट ड्व्हायझर्स लिमिटेड, आयआयएफएल कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड आणि जेएम फायनांशियल लिमिटेड हे इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर आहेत.


## आज का अंदाज

**शनिवार ४ जानेवारी २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ८ | ९ | २ | ३ | ६ | ७ |
| ४८० | १५९ | १८९ | १२६ | ११० | ३४६ | ४६६ | ८९० |
| ५७० | २६७ | २६० | २८९ | २३८ | ३४८ | ३६७ | २५० |
| ६६० | ३५० | ३५० | ३६० | ३९० | १२० | २६८ | १६० |
| २० | ५० | ८६ | ९६ | २१ | ३१ | ६५ | ७५ |
| २१ | ५१ | ८४ | ९४ | २० | ३० | ६८ | ७८ |
| २३ | ५३ | ८७ | ९७ | २९ | ३९ | ६४ | ७४ |

**४ जानेवारी: सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ४२ | ५९ | ७९ |
| ३० | ४० | ५१ | ७१ |
| ३८ | ४८ | ५६ | ७६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल, १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला जोडीदाराकडून अनपेक्षित भेटवस्तू मिळेल. ज्यामुळे तुमचा आजचा दिवस आनंदात जाईल. धार्मिक कार्यात रुची वाढेल. नोकरीच्या शोधात असलेल्यांना चांगली संधी चालून येईल.

**वृषभ :** आज तुमच्या मनात नकारात्मक विचार आणू नका. सामाजिक स्तरावर कौतुक होईल. प्रवास करावा लागेल. वाहने जपून चालवावी. संध्याकाळी कुटुंबासह खरेदीसाठी जाऊ शकता.

**मिथुन :** उत्पन्न वाढेल. आरोग्याची काळजी घ्या. आजचा दिवस तुमच्यासाठी भाग्यदायी असेल. नवीन गुंतवणूक करता येईल. त्यातून चांगला नफा मिळेल. एखाद्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकता.

**कर्क :** यामुळे तुमची आर्थिक बाजू सुधारेल. तुम्ही आज एखादी संपत्ती खरेदी करण्याचा विचार करु शकता. शेअर बाजारात गुंतवणूक केल्याने फायदा संभवतो. एखाद्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी व्हाल.

**सिंह :** आज तुम्हाला काहीतरी नवीन करण्याची इच्छा असेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस शुभ असणार आहे. या दिवशी तुम्ही फॉर्म भरण्याशी संबंधित कामे करु शकता.

**कन्या :** तुम्हाला कामकाजाच्या क्षेत्रात मान-सन्मान मिळेल. आज घरातून बाहेर पडण्यापूर्वी वडिलधा-या व्यक्तींचा आशीर्वाद घेतला तर निश्चित लाभ मिळेल. आज तुमची एखादी अपूर्ण इच्छा पूर्ण होईल.

**तुळ :** नोकरीत बढतीची संधी मिळू शकते. जवळच्या व्यक्तीकडून मोलाची मदत होईल. मानसन्मान मिळेल. उत्पन्न वाढेल. यामुळे मानसिक समाधान मिळेल. तुमचा जोडीदार तुमच्या कामात तुमची पूर्ण साथ देईल.

**वृश्चिक :** प्रेमी युगुलांसाठी आजचा दिवस चांगला आहे. प्रगतीच्या संधी मिळू शकतात. भावनांवर नियंत्रण ठेवा. मित्रांसोबत वाढदिवसाच्या पार्टीला जाण्याचाही योग आहे.


**धनु :** मानसिक शांतता मिळेल . आज तुम्ही धार्मिक कार्यक्रमात उत्साहाने सहभागी व्हाल. सरकारी नोकरीत असलेल्या लोकांना आज प्रमोशन मिळू शकते. घरात आनंदाचे वातावरण असेल.

**मकर :** कुटुंबासोबत धार्मिकस्थळी जाऊ शकता. प्रवासाचे योग संभवतात. आजचा दिवस तुमच्यासाठी भाग्यदायी असेल. वर्षाच्या पहिल्याच दिवशी तुम्हाला एखादी मोठी ऑर्डर मिळेल.

**कुंभ :** भाग्य तुम्हाला पूर्ण साथ देईल. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना मल्टीनॅशनल कंपनीकडून नवीन ऑफर मिळेल. विज्ञानाशी संबंधित लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहील.

**मीन :** आजचा दिवस नेहमीपेक्षा थोडा वेगळा असेल. आज एखाद्या कार्यक्रमाला जाण्याचा योग आहे. तुमची एखाद्या जुन्या मित्राशी गाठ-भेट होईल. आज थोड्या मेहनतीने मोठा फायदा होईल.

## शब्दकोडे क्रमांक २००६



**आडवे शब्द :-**
१) उर्ध्व दिशा
३) द्रव पदार्थ
५) द्रव्य
७) घागर
९) पारद
११) रजनी
१२) भारतीय सैनिक
१३) वळवळ हावरटपणा
१५) संपूर्ण
१६) सप्तस्वरातील पहिला स्वर
१९) भोळा शंकर, ** सदाशिव
२०) लोक
२१) चरण-कमल
२३) चांगला , भला
२५) चरबी वाढविणारे पदार्थ
२६) किल्ल्याखालची जमीन
२८) ढीग
३०) पूजा साहित्याचे ताट
३२) उणीव, तोटा
३३) गणपतीचे एक नाव
३५) बारीक सारीक माहितीसह
३७) बांबू
३९) वड समाजातील पत
४०) दर्पण
४१) व्रत
४२) दुष्ट
४४) समोरासमोरची लढाई
४५) रावणाचा वध करणारा
४६) स्थान
४७) बारा वर्षांचा काळ
४९) हद्द
५०) अभिप्राय
५१) हत्ती
५३) पाठवणी
५६) रेवा नदीचे एक नाव
५७) बैलाच्या गळ्याला बांधण्याचा दोर
५९) संरक्षक भिंत
६०) चांदणी
६२) सारखा
६४) काकुळतेने याचना करणे (वा.प्र.)
६८) छोटा खड्डा
७०) किंमत, भाव
७१) परभारे
७२) पिता
७३) एक चर्मवाद्य
७४) उगाच
७५) बातमी

**उभे शब्द :-**
१) वर वधुची मिरवणूक
२) निमग्न
३) धोबी
४) प्रश्नोत्तरे
६) व्यापारातील फायदा
७) फुलाची उमलण्या पूर्वीची अवस्था
८) अब्रू
९) भिंतीवर सरपटणारा प्राणी
१०) गुजराती नृत्यप्रकार
१४) सख्खा भाऊ
१५) कारण, निमित्त
१७) विष
१८) घराचा मागचा दरवाजा
२१) पौर्णिमा किंवा अमावस्याच्या अगोदरची तिथी
२२) फुलातील पुंकेसर
२४) रत्न
२७) पंकज
२९) आरास, शोभा, सुशोभित रचना
३१) काटकसर
३२) रुग्णालय
३४) अभिनेता
३६) अर्धी ओंजळ
३७) कशा प्रकारचा अरुंद, व लांब पिशवी
३८) युक्ती
४१) भूत आणि भविष्यामधील काळ
४२) लाकडी पादुका
४३) घोडे बांधण्याची जागा
४४अ) कामदेव
४५) मनाचे श्लोक लिहिणारे संत
४६) माहितगार
४८) माघारी येणे
५२) शोभिवंत सजावट
५४) रस्ता, मार्ग
५५) श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश
५८) बेचव, पचपचीत
६१) शुष्कता, आग, भकभक
६३) मळलेला
६४) पाऊल, गीत
६५) डोंगराचा तुटलेला भाग
६६) मांडणी
६७) तूर डाळीचे एक कालवण
६९) एक रंगीत कंदमूळ
७१) पंख

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# आता सर्व वाहनांना "हाय सिक्युरिटी नंबरप्लेट'

## अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जा! आरटीओचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ३ :




अकोला वाहनांवरील नंबर प्लेटमध्ये छेडछाड, बनावट प्लेट आदी प्रकारांना आळा घालण्यासाठी आता सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसवण्याची तरतूद करण्यात आली आहे. वाहनधारकांनी संबंधित पोर्टलवर बुकिंग करून नंबरप्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी केले आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० अन्वये शासनाकडून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट (एचएसआरपी) बसवण्याची तरतूद करण्यात आली आहे. वाहनांना नंबर प्लेटमध्ये छेडछाड आणि बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटवणे, तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

अकोला जिल्ह्यासाठी या कामासाठी मेसर्स एफटीए एचएसआरपी सोल्युशन्स प्रा. लि. ही एजन्सी निश्चित करण्यात आली आहे. वाहनधारकांनी पोर्टलवर बुकिंग करून त्यांच्या सोयीप्रमाणे अपॉइंटमेंट घेऊन नंबरप्लेट बसवून घ्यावी. वाहनधारक अकोला कार्यालयातील नोंदणी धारक नसला तरीही काही कामानिमित्त अकोल्यात वाहन वापरत असेल तरीदेखील त्याला ही प्लेट बसवणे

नंबरप्लेट न बसवल्यास दंडात्मक कारवाई नागरिकांनी वाहनांवर एचएसआरपी नंबरप्लेट न बसवल्यास वाहनांचे मालकी हक्क हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त बोजा चढवणे, उतरवणे, दुय्यम प्रत, विमा अद्ययावत करणे आदी कामकाज थांबवण्यात येईल. एचएसआरपी नंबरप्लेट नसलेली वाहने, बनावट एचएसआरपी नंबरप्लेट असलेली वाहने आदी वाहनांवर भविष्यात दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी दिला आहे. एचएसआरपी नंबरप्लेट बसवण्याचे दर एचएसआरपी नंबरप्लेट बसवण्याचे दर निश्चित करून देण्यात आले आहेत. त्यानुसार जीएसटी वगळून शुल्क दुचाकी वाहने व ट्रॅक्टरसाठी ४५० रुपये, तीनचाकीसाठी ४५० रुपये, इतर सर्व वाहनांसाठी ७४५ रुपये इतके असेल.

वाहनधारकांना नंबरप्लेट बसवण्याबाबत काही तक्रार असल्यास संबंधित पोर्टलवर किंवा प्रादेशिक परिवहन कार्यालयात तक्रार करता येईल.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३ :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त विद्यापीठातील दृकश्राव्य सभागृहात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता तथा वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, मानव विज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे , वुमेन्स स्टडीज सेंटरच्या सह समन्वयक डॉ. वैशाली धनविजय, आजीव अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांसह विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

# मियावाकी जंगलामध्ये गवताला लावली आग



■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. ३ :

मोताळा तालुक्यातील सिंदखेड येथे मियावाकी पध्दतीने साडे तीन एकरात विविध प्रकारच्या २१ हजार वनस्पती व वृक्षाची लागवड करण्यात आली आहे. वृक्षाच्या मुळाला आच्छादन देण्यासाठी भंडारा जिल्ह्यातून सात टन गवत आणले होते.

दरम्यान, बुधवारी रात्री अज्ञात व्यक्तीने या गवताला आग लावली. या घटनेमुळे हजारो रुपयाचे नुकसान झाले आहे.

मोताळा तालुक्यातील सिंदखेड येथे मियावाकी जंगल प्रकल्पांतर्गत साडे तीन एकरात विविध प्रकारच्या २१ हजार वनस्पती व वृक्षाची शास्त्रोक्त पध्दतीने लागवड करण्यात आली आहे. मागील दहा वर्षात सिंदखेडचे सरपंच प्रविण कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी ओसाड ठिकाणी जंगलाची निमीर्ती केली आहे. लावण्यात आलेल्या वृक्षाच्या मुळाला आच्छादन देण्यासाठी भंडारा जिल्ह्यातून सात टन गवत आणण्यात आले होते. बुधवारी रात्री सात वाजेच्या सुमारास अज्ञात भामट्याने या गवताला आग लावली. या घटनेची माहिती सरपंच प्रविण कदम यांनी धामणगाव बढे पोलिसांना दिली. दरम्यान आज गुरुवारी जयश्री शेळके यांनी सिंदखेड येथे भेट देवुन झालेल्या नुकसानीची पाहणी केली.

## यवतमाळ हेल्थ मॅरेथॉन २०२५

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ३

यवतमाळमध्ये आरोग्य आणि फिटनेसला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात येणारी हेल्थ मॅरेथॉन २०२५ रविवार, ५ जानेवारी रोजी नेहरू स्टेडियम, यवतमाळ येथे होणार आहे. ही मॅरेथॉन कॉटनसिटी रनर्स फाऊंडेशनतर्फे आयोजित करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष डॉ. परेश गंढेचा यांनी पत्रपरिषदेत दिली.

यावेळी ललित वऱ्हाडे व फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना गंढेचा म्हणाले यामध्ये विविध शारीरिक शिक्षक संघटना, ॲथलेटिक्स संघटना, आयएमए जिल्हा पोलिस दल, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, आयडीए संघटना, वैद्यकीय प्रतिनिधी संघटना, फिजिओथेरपिस्ट संघटना आणि श्रमिक पत्रकार संघ यांचा सक्रिय सहभाग असणार आहे.

या मॅरेथॉनचे मुख्य उद्दिष्ट सर्व नागरिकांना आरोग्याचे महत्त्व पटवून देणे, शारीरिक तंदुरुस्तीला चालना देणे आणि एक सकारात्मक वातावरण निर्माण करणे आहे. यावर्षी विविध श्रेणींमध्ये होण्यासाठी विविध प्रकारचे गट २१ किमी हाफ मॅरेथॉन, १० किमी पॉवर रन, ५ किमी फिटनेस रन, ५ किमी चिल्ड्रन्स रन आणि ३ किमी फॅमिली फन रन उपलब्ध आहेत. मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला खास टी-शर्ट, बिब, टाइमिंग चिप, हायड्रेशन स्टेशन्स, वैद्यकीय सहाय्य, फिजिओथेरेपी सुविधा, मिडल, ई-सर्टिफिकेट आणि फ्री रेस देण्यात येणार आहेत. आतापर्यंत २५०० जणांनी नोंदणी केलेली आहे.

# हिवरा आश्रम हे समाजातील सर्व घटकांसाठी सुंदर पर्यटनस्थळ बनले : सुधीर दिवे

■ महासागर प्रतिनिधी
हिवरा आश्रम, दि. ३ :



हिवरा आश्रम हे बालक, पालक, चालक व समाजातील सर्व घटकांसाठीचे सुंदर पर्यटनस्थळ बनले आहे, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे सल्लागार तथा महाराष्ट्र पशू आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कार्यकारी संचालक सुधीर दिवे यांनी व्यक्त केले.

नववर्षानिमित्त दिवे यांनी बुधवार, दि. १ जानेवारी रोजी आश्रमास सदिच्छा भेट दिली. यावेळी ते बोलत होते. त्यांनी यावेळी शुकदास महाराजांच्या समाधीचे व स्वामी विवेकानंदांच्या स्मारकाचे दर्शन घेतले. विवेकानंद आश्रमाच्या परिसरात असलेले सौंदर्य, निसर्ग, पवित्रता मनाला प्रसन्न करते. या ठिकाणी बालकांसाठी बाग, खेळणी, नौकाविहार, कारंजे. पालकांना मनःशांती व प्रेरणा देणारे देवालय, विवेकानंद स्मारक, अथांग जलाशय व व्यवस्थापन करणाऱ्या संचालकांना नियोजन, शिस्त, स्वच्छता, आदरभाव, नम्रता याची अनुभूती या ठिकाणी मिळते, असे ते यावेळी म्हणाले. शिक्षणानेच माणूस आदर्श जीवन जगू शकतो. माणसातील सर्व शक्तीची ओळख निर्माण होउन त्या सर्व सामर्थ्यांचा उपयोग तो स्वकल्याण व त्यातून राष्ट्र कल्याणासाठी करू शकतो. संस्कार व सदाचारासोबत विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊनच महाराजांनी शैक्षणिक कार्य सुरू केले असेही ते म्हणाले. सुधीर दिवे यांनी यावेळी गोशाळेला भेट दिली. गोशाळेतील कर्मचाऱ्यांना त्यांनी विविध प्रजाती, त्यांचे संगोपन, पोषण, संरक्षण व वंशवृद्धी याबाबत मार्गदर्शन केले. गीर प्रजातीच्या वाढीसाठी व संवर्धनासाठी गीरचा वळू गोशाळेला भेट देत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आश्रमात त्यांचा सपत्नीक सत्कार केला.

## विद्यापीठाची हिवाळी एम.ई. इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग सत्र-१ ची परीक्षा स्थगित

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३ :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची हिवाळी-2024 लेखी एम.ई. इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग (इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड पॉवर) (सी.बी.सी.एस.) सत्र-1 व एम.ई. इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग (इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम) (सी.बी.सी.एस.) सेमि.-1 लेखी परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

परंतु विद्या विभागाकडून प्राप्त सुधारित परीक्षा योजनांचे अनुषंगाने आय.ई.ई.पी. 05 रिसर्च मेथॉडॉलॉजी अ‍ॅन्ड आय.पी.आर. तसेच आय.ई.पी.एस. 05 रिसर्च मेथॉडॉलॉजी अ‍ॅन्ड आय.पी.आर. या विषयास सुधारित परीक्षा योजनेत अंतर्गत गुण दर्शविल्यामुळे उपरोक्त दोन्ही विषयांची दि. 04 जानेवारी, 2025 रोजी नियोजित असलेली परीक्षा रद्द करण्यात येत असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालये, प्राचार्य, केंद्राधिकारी, परीक्षा केंद्रांना परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना कळवायचे आहे. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता त्यांचेशी 9850042357 या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्या वतीने कळविण्यात येत आहे.

## ३ हजार ९०० रुपयांचा नायलॉन मांजा जप्त

**दिग्रस :** संक्रांतीच्या तोंडावर चक्क ३ हजार ९०० रुपये किंमतीचा जीवघेणा नायलॉन मांजा जप्तीच्या कारवाईने मांजा विक्रेत्यांमध्ये पोलिसांबाबत चांगलीच धास्ती निर्माण झाली आहे. पतंग उडविण्यासाठी नायलॉन वापरावर बंदीचे आदेश असताना पडगिलवार लेआऊट परिसरात तेजस किराणा दुकानातून विजय तानाजी बोंडगे हा नायलॉन मांजा विक्री करत असल्याच्या माहितीवरून गुरुवार, २ जानेवारीला ठाणेदार सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक महेश देशमुख, अनिल मदने व इतर पोलिसांनी या दुकानावर धाड टाकून ३ हजार ९०० रुपयाचा नायलॉन मांजा जप्त केला.

मकरसंक्रांतीच्या पतंगाचा हंगाम सुरू होतो. याच दरम्यान मोठ्या प्रमाणात मुले गच्चीवर, रस्त्यांवर आपल्याला पतंग उडवताना दिसतात. पतंग उडविण्यासाठी नायलॉन मांजाचा वापर केला जातो. त्यातही पतंग काटण्याची शर्यत लावल्या जाते. अशात पतंग तुटून तो मांजा रस्त्यावरून दुचाकीने जाणाऱ्यांच्या अचानक समोर येऊन गळा कापण्याच्या घटना घडल्या आहेत. यावर आवर घालण्यासाठी अशा मांजावर केली आणि करणार असल्याचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांनी सांगितले. नायलॉन मांजात अडकून अनेक पक्षी गंभीर जखमी झाले आहेत. त्यात काही पक्ष्यांचा जीव गेला, तर अनेक पक्षी या मांजात अडकून तारेवर तासनतास अडकून राहतात.

# बाजारात तीळ २०० तर गूळ ७० रुपये किलो

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. ३ :



येत्या आठवड्यांवर यंदाची संक्रांत येऊन ठेपली आहे. मात्र, अशातच वाढत्या महागाईने जनसामान्य नागरिकांवर संक्रांत आणली आहे. तीळ आणि गुळाचे भाव गगनाला भिडले असल्याने संक्रांत गोड करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

मकरसंक्रांतीच्या सणानिमित्त ग्रामीण भागातील आठवडी बाजारात सध्या तीळ आणि गुळाची आवक आहे. आठवड्यातील बाजारात पांढऱ्या रंगाचे तीळ व गुळ विक्रीसाठी आला आहे. त्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे या गोडव्याची चव यंदा कडवट दिसत आहे. तिळाचे भाव २०० रुपये तर गुळाचे भाव ६० ते ७० रुपये किलो आहेत. या सोबतच शेंगदाणा हे १३० रुपये किलो पर्यत पोहोचले आहे. भारतात सण-उत्सव सुरूच असतात. सण आला म्हणजे त्यासोबत गोड पदार्थही आलेच. प्रत्येक सणासाठी काही विशिष्ट गोड पदार्थ तयार केले जातात. मकर संक्रांतीला तीळ-गुळाचे पदार्थ तयार केले जातात. तीळ-गुळाचे लाडू, चिक्की असे वेगवेगळे पदार्थ तयार केले जातात. तीळ हे उष्ण असतात त्यामुळे आपल्या शरीराला त्याचा फायदा होऊ शकतो. त्यामुळे तीळ आणि गुळाचे पदार्थांचे सेवन केल्याने शरीरात गर्मी तयार होते. त्यामुळे मकर संक्रांतीला तीळ-गुळाचे पदार्थ तयार केले जातात.

यंदा तीळ व शेंगदाणा यांचे भाव गगनाला भीडत असल्याचे दिसत आहे, त्यामुळे यंदा तीळ गूळ खा म्हणणाऱ्यांची संख्या कमी होणार असल्याचे चित्र आहे, त्यामुळे गृहिणीच्या अडचणीत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. गुळ ७० शेंगदाणा १३० तीळ २०० असे आहेत भाव (प्रतिकिलो)

केसांची वाढ चांगली व्हावी यासाठी तिळाचे तेल केसांना लावणे चांगले असते. थंडीच्या वेळी लसूण, खोबरे घालून केलेली तिळाची चटणी खाणे चांगले. तीळ पचायला जड असल्याने थंडीमध्ये भूक शमवण्यासाठी भाकरीला तीळ लावून खाण्याची पद्धत आहे.

# मनपाच्या कर्मचाऱ्यांना एक तपानंतर मिळणार पदोन्नती

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ३ :



महापालिकेत वर्ष २०१२ मध्ये कर्मचाऱ्यांची पदोन्नती झाली होती. त्यानंतर तब्बल बारा वषार्नंतर वर्ग क आणि ड गटातील कर्मचाऱ्यांची पदोन्नती होणार आहे. येत्या एक- दोन दिवसांत महापालिकेतील तृतीय आणि चतुर्थ श्रेणीतील सुमारे ६० कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळण्याचे संकेत आहेत. पदोन्नतीच्या पदाकरिता आवश्यक शैक्षणिक पात्रतेनुसार महापालिकेतील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या मार्गदर्शनात गेल्या दोन दिवसांपासून पदोन्नती समितीच्या बैठकांवर बैठका सुरू आहेत.

शासनाने १३ फेब्रुवारी २०२३ रोजी एकूण १ हजार ५०९ पदांचा महापालिकेचा आकृतीबंध मंजूर केलेला असून, त्या अनुषंगाने शासनाने २० जून २०२४ रोजी सेवा प्रवेश नियमास मान्यता प्रदान केली आहे. सेवा प्रवेश नियमामध्ये पदोन्नतीची पदे निर्धारित केली आहेत. महापालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना मागील १२ वर्षांपासून पदोन्नतीचा लाभ मिळालेला नाही. महापालिकेचा आकृतीबंध १ हजार ५०९ पदांचा असून, बिंदू नामावली व सेवा प्रवेश नियमाला शासनाने मंजुरी दिली आहे.

त्यामुळे टप्प्याटप्प्याने कालबद्ध पदोन्नती, अनुकंपा तत्त्वावरील भरती प्रक्रिया तसेच हद्दवाढ झालेल्या मलकापूर, खडकी, शिवणी, शिवापूर, अकोली खुर्द आदी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्यात येणार असून, या टप्प्यात ५५ ते ६० जणांची पदोन्नतीमध्ये लॉटरी लागण्याची शक्यता असल्याची सूत्रांची माहिती आहे.

# जनसंघर्ष अर्बनवर प्रशासकांची नेमणूक करा

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ३ :

जनसंघर्ष अर्बन निधी बँकेत ४४ कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. बँकेचे संचालकांना अजूनही अटक झालेली नाही. ठेवीदारांचे अडकलेले पैसे, तसेच प्रशासकीय कामांना गती यावी, यासाठी बँकेवर प्रशासकांची नेमणूक करावी, या मागणीसाठी कर्मचारी, खातेदार व ठेवीदारांनी गुरुवारी २ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक कार्यालयावर धडक देवून विविध मागण्यांचे निवेदन दिले.

जनसंघर्ष अर्बन निधी बँकेत पैसे अडकल्याने सहा हजार ठेवीदार अडचणीत आले आहेत. यामुळे बँकेवर उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नेमणुक करावी. आरोपींच्या सपंत्तीचा लिलाव करून ठेवीदारांचे पैसे देण्याची मागणी केली.

दिग्रस येथील जनसंघर्ष अर्बन निधीमध्ये ४४ कोटी रूपयांचा घोटाळा झाला आहे. जनसंघर्ष अर्बनच्या कर्मचारी व ठेवीदारांनी यवतमाळ विधानसभेचे माजी आमदार मदन येरावार यांची भेट घेवून झालेल्या प्रकाराची माहिती दिली.


## कार्यालय नगरपरिषद रामटेक जिल्हा नागपुर

Email id. m.c.ramtek@gmail.com

मुख्याधिकारी नगरपरिषद रामटेक जि. नागपुर यांचे वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत संजय गेडाम यांच्या घरासमोर सी.डी. वर्कचे बांधकाम करणे व अन्य सहा कामे या कामासाठी ई-निविदा ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. निविदेसंबंधी सविस्तर माहिती, निविदा प्रपत्र किंमत, अनामत रक्कम, अटी व शर्ती व लागू असल्यास पुढील शुद्धीपत्रके ही http://www.mahatenders.gov.in संकेत स्थळावरच दिनांक ०३/०१/२०२५ ला सायंकाळी ६ वाजेपासून उपलब्ध आहेत.

मुख्य अधिकारी
नगरपरिषद, रामटेक



## कार्यालय नगरपंचायत गोधणी (रेल्वे)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
तह. नागपूर (ग्रामीण) जिल्हा नागपूर
Email:-np.godhanirailway@gmail.com
स्वच्छ भारत — एक कदम स्वच्छता की ओर

नपगो. जा क्र. ०८ / २०२४ | दिनांक -: ०३/०१/२०२५

**महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण कायदा १९९५ अन्वये जाहिरात प्रसिद्ध (बॅनर,फ्लेक्स,पोस्टर इत्यादी ) बाबत जाहीर सूचना**

गोधणी (रेल्वे) शहरातील सर्व नागरिकांना तसेच सर्व प्रिटींग मालकांना तसेच सबंधितांना सूचित करण्यात येते कि, मा. उच्च न्यायालय मुंबई दिनांक 30/09/2014 ला जनहित याचिका क्रमांक 155/2011 मध्ये दिनांक 06/08/2011 रोजी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण कायदा 1995 अंमलबजावणी करिता कळविण्यात येते कि, नगर पंचायत क्षेत्रात खाजगी , सार्वजनिक तथा इतर जागेवर नगरपंचायतीची पूर्व परवानगी न घेता कोणत्याही प्रकरचे बोर्डस, होर्डिंग कट आऊटस जाहिरात बॅनर, लावण्यत येवू नये.

नगरपंचायत च्या बांधकाम दूरध्वनी क्रमांक 0712 – 2955417 व 8149785813 ( Whats App) वरील तक्रारीकरिता ) तसेच नोडल ऑफिसर स्थापत्य अभियंता, न.पं. गोधणी (रेल्वे) यांच्याशी जाहिरात धारकांनी परवानगी करिता कार्यालयीन वेळात संपर्क करावा, या करिता नगरपंचायती मार्फत लवकरच टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जाहिरात प्रसिद्ध करतांना नगरपंचायतची परवानगी घेवून व त्या परवानगीचा क्रमांक व दिनांक, जाहिरातीचा कालावधी व आकारमान नमूद असलेले QR (कोड) बोर्डवर स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे. यांची नोंद होर्डिंग, पोस्टर, बॅनर, छापून घेणारे व प्रिटींग प्रेस धारकांनी घ्यावे. जर या जाहिरातीवर परवानगी क्रमांक, दिनांक व कालावधी, आकारमान नमूद असलेले QR कोड नसल्यास असे बोर्ड अनाधिकृत बेकायदेशीर असल्याचे गृहीत धरून बोर्ड जप्तीची व दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

वरील सुचनाचे उल्लघन केल्याचे निर्देशनास आल्यास महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण कायदा 1955 नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल,
याची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगरपंचायत गोधणी (रेल्वे)


RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# अस्मिता

## खुसखुशीत मशरूम पोहा कटलेट

रसगंधा

आपल्यापुढे संध्याकाळच्या स्नॅक्सचा प्रश्न आ वासून उभा असतो. चहाला आलेल्या पाहुण्यांना छानसा पदार्थ खिलवण्यासाठी मग यू ट्यूबवरचे रेसिपी व्हिडिओ धुंडाळले जातात. पाककलेची पुस्तकं चाळली जातात. पाहुण्यांसाठी काहीतरी हटके बनवण्याच्या विचारात असाल तर ही मशरूम पोहा कटलेट रेसिपी नक्की ट्राय करा.

**साहित्य:** दोन कप मशरूम, दीड कप पोहे, एक बारीक चिरलेला कांदा, अर्धा कप बारीक चिरलेली फरसबी, अर्धा कप किसलेलं गाजर, चमचाभर आल्याची पेस्ट, एक मिरची, अर्धा टी स्पून लाल तिखट, प्रत्येकी पाव चमचा गरम मसाला, चाट मसाला, आमचूर, चिरलेली कोथिंबिर, ब्रेड क्रम्स, तेल आणि चवीनुसार मीठ

**कृती:** पोहे पंधरा मिनिटं भिजवून ठेवा. चाळणीत ठेऊन पाणी काढून टाका. आता कढईत थोडं तेल गरम करा. कांदा सोनेरी रंगावर परतून घ्या. यात हिरव्या मिरचीचे तुकडे, गाजर, फरसबी आणि आल्याची पेस्ट घालून दोन ते तीन मिनिटं शिजवून घ्या. भाज्या शिजल्यावर गॅस बंद करा. हे मिश्रण थंड झाल्यावर त्यात मशरूमचे काप, लाल तिखट, गरम मसाला, चाट मसाला, आमचूर,



पोहे,कोथिंबिर आणि मीठ घालून नीट मॅश करून घ्या. या मिश्रणाचे छोटे किंवा मध्यम आकाराचे चपटे गोळे करा. ब्रेड क्रम्सने कोटिंग करा. कढईत तेल गरम करा. त्यात हे गोळे तळून घ्या. हे कटलेट तुम्ही शॅलो फ्रायही करू शकता. सॉस किंवा चटणीसोबत खायला द्या.

## लढा तंबाखू विरोधात

मानिनी

**भारतात तोंडाच्या कॅन्सरचं प्रमाण बरंच जास्त आहे. गरीब घटकातली लहान मुलंही या कॅन्सरला बळी पडत आहेत. तंबाखूचं सेवन हे यामागचं महत्त्वाचं कारण. तंबाखूच्या दुष्परिणामांची या मुलांना अजिबात कल्पना नसते. तंबाखूमुळे नवी पिढी उध्वस्त होत असल्याचं पाहून डॉ. सुमेधा कुशवाह खूप अस्वस्थ झाल्या. तोंडाच्या कॅन्सरबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. याची चांगली फळं त्यांना मिळत आहेत.**

व्यवसायाने डेंटिस्ट असणाऱ्या डॉ. सुमेधा कुशवाह तंबाखूचं व्यसन कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. समाजातल्या विविध घटकांना तंबाखूमुक्त आयुष्य जगण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करत आहेत. त्यांनी अनेकांना तंबाखूचं व्यसन सोडवायला मदत केली आहे. सुमेधा यांनी बीडीएस आणि एमडीएसची पदवी घेतली आहे. दिल्लीतल्या महाविद्यालयातून दंतवैद्यकशास्त्राची पदवी घेणाऱ्या सुमेधा यांना ओपीडीतल्या तपासणीदरम्यान तोंडाचा कॅन्सर झालेले किंवा कॅन्सर होण्याच्या टप्प्यापर्यंत पोहोचलेले बरेच रुग्ण भेटले. तंबाखूचं सेवन हे त्यांच्या कॅन्सरचं महत्त्वाचं कारण होतं. तोंडाच्या कॅन्सरच्या रुग्णांची ही वाढती संख्या सुमेधा यांना अस्वस्थ करून गेली. तंबाखूचा प्रभाव कमी करण्यासाठी काहीतरी करायला हवं हे तेव्हाच त्यांच्या मनात आलं.

तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करण्याचे बरेच प्रयत्न होत असले तरी समाजातला एक मोठा घटक या व्यसनापासून मुक्त झालेला नाही. तंबाखू सोडण्याच्या दृष्टीने त्यांना कोणतंही मार्गदर्शन मिळत नाही. अशा वर्गासाठी काम करण्याचा निश्चय सुमेधा यांनी केला. एका आरोग्य शिबिरात त्यांना तोंडाच्या कॅन्सरने ग्रस्त असणारा १३ वर्षांचा मुलगा भेटला. त्याला तोंडही उघडता येत नव्हतं. वेदनेने विव्हळणाऱ्या त्या मुलाला बघून सुमेधा अक्षरश: हादरून गेल्या. तोंडाच्या कॅन्सरचं भयावह रूप त्यांच्या समोर होतं. गुटखा खाण्याचे परिणाम या मुलापर्यंत पोहोचलेच नव्हते. याच निष्काळजीपणाविरोधात सुमेधा यांना लढा उभा करायचा होता. तरुण मुलं आपलं आयुष्य अशाप्रकारे उध्वस्त करत असल्याचं त्यांना बघवलं नाही. म्हणूनच त्यांनी प्रशिक्षित समुपदेशक होण्याचा निर्णय घेतला.



या प्रशिक्षणासाठी त्या नावाजलेल्या रुग्णालयात रूजू झाल्या. या रुग्णालयात समुपदेशनासाठी येणाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारलं जायचं. गरीब घटकातल्या रुग्णांना एवढे पैसे परवडू शकत नव्हते. मधल्या काळात सुमेधाने तोंडाचा कॅन्सर आणि तंबाखू नियंत्रणाच्या क्षेत्रातल्या विविध एनजीओंसोबत काम केलं. मात्र त्यांना स्वत:च्या पद्धतीने बदल घडवायचा होता. यासाठी त्यांनी 'एम टू टर्मिनेट टोबॅको अँड कॅन्सर' (एटीटीएसी) या संस्थेची स्थापना केली. यात त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांचीही साथ लाभली. त्यांच्या संस्थेला 'युवराज सिंह फाउंडेशन'कडून निधी मिळतो. विविध कॉर्पोरेट ऑफिसेसमध्येही त्यांची संस्था कार्यशाळेचं आयोजन करते. २०१४ मध्ये त्यांनी ही संस्था सुरू केली होती. आजवर त्यांनी ३० हजार लोकांना तंबाखू मुक्तीचा मार्ग दाखवला आहे. छोटी शहरं आणि गावांमध्ये त्यांना पोहोचायचं आहे. सुमेधा कुशवाह यांना आपला समाज तंबाखूमुक्त झालेला पहायचा आहे.

### हेअर केअर

#### होममेड मिस्ट



केसांची चमक वाढवणारी बरीच उत्पादनं बाजारात मिळतात. पण त्यातली रसायनं घातक ठरू शकतात. म्हणूनच घरीच तयार केलेलं मिस्ट तुम्ही वापरू शकता. यासाठी तीन चमचे खोबरेल तेल आणि वाटीभर गुलाब पाणी घ्या. गुलाब पाण्यात खोबरेल तेल मिसळा. हे मिश्रण स्प्रे बॉटलमध्ये भरा. केस धुण्याच्या अर्धा तास आधी हा स्प्रे केसांवर फवारा. मग हलक्या हाताने मसाज करा. केस खूप कोरडे झाले असतील तर रोज रात्री केसांवर स्प्रे करून मसाज करा. केस शँपूने धुतल्यानंतरही स्प्रे करा. यामुळे केस मुलायम होतील.

### स्मार्ट टिप्स

#### बॅकलेस घालण्याआधी...

बॅकलेस ब्लाउज किंवा ड्रेस घालण्याआधी पाठीचं सौंदर्य खुलवायला हवं. पाठीवर पुरळ किंवा ब्लॅकहेड्स असतील तर दिवसातून दोन वेळा आंघोळ करा. नियमितपणे बॅक स्क्रबिंग करून घ्या. यासाठी संत्र्याची सालं वाळवून पूड करून घ्या. त्यात दूध मिसळून पेस्ट तयार करा. आठवड्यातून दोन वेळा पाठीला लावा. स्क्रब केल्यामुळे पाठीचा रक्तप्रवाह सुरळीत सुरू राहील. पाठीला ॲलोव्हेरा जेलने मसाज करता येईल किंवा एखादा पॅकही लावता येईल. तुम्ही पील



ऑफचा वापरही करू शकता. बॅकलेस घालण्याआधी पाठीला चेहऱ्याप्रमाणे मेक अप करा. फाउंडेशन, कॉम्पॅक्ट लावा. पाठ चमकदार दिसण्यासाठी शिमर लूक देणारं लोशनही लावता येईल. पाठीचं ब्लीचही करून घ्या.

### हेल्दी लाईफ

#### पर्याय गव्हाच्या पोळीला...

वजन कमी करण्यासाठी आहारातलं कर्बोदकांचं प्रमाण कमी करावं लागतं. गव्हाच्या पोळीत कर्बोदकांचं प्रमाण जास्त असतं. त्यातच नेहमी गव्हाची पोळी खाऊन खूप कंटाळा येतो.



अशा वेळी तुम्ही लो कॅलरी आणि लो कार्ब धान्यांपासून पोळी किंवा भाकरी बनवू शकता. नाचणीची भाकरी हा पोळीला खूप चांगला पर्याय ठरेल. विविध जीवनसत्त्वं आणि खनिजांची युक्त नाचणी वजन कमी करणाऱ्यांसाठी वरदान आहे. सोयाबिनच्या पीठापासून पोळ्या करता येतील. ओट्सची बिस्किटं, कुकीज, एनर्जी बार लोकप्रिय आहेत. त्याचप्रमाणे याच्या पोळ्याची करता येतील. ओट्सची चव आवडत नसेल तर कणकेत थोडं ओट्सचं पीठ मिसळता येईल.

## आयडियाज फॉर रिनोव्हेशन

लक्षात घ्या

घरातला तोचतोपणा कंटाळवाणा वाटू लागतो तेव्हा रिनोव्हेशन करावंसं वाटू लागतं. कल्पनेत हे जितकं रम्य असतं त्यापेक्षा वास्तव भयानक असतं कारण एकदा रिनोव्हेशन सुरू झालं की ॲडव्हान्सच्या नोटा मोजताना मिळालेलं 'मॅडमजी दस दिन में काम निपटेगा, फिकर मत किजिए' हे वचन चक्रवाढव्याज साचल्यासारखं वाढत जातं आणि त्यावर दिवसांचंच काय पण आठवड्यांचं व्याज चढायला लागतं! दहा दिवसांचा वायदा असतो. त्यामुळे सातव्या दिवसापासून आपला काऊंटडाऊन सुरू होतो आणि बाराव्या–तेराव्या दिवशीही काम निपटलेलं नसतं तेव्हा तर आपला मिस्त्रीसोबत रितसर पंगाच होतो. घरात जिकडे तिकडे सांडलेलं सिमेंट, भिंतीवरचे थर, पाणी आणि हत्यारांची कचकच हे सगळं असह्य होऊन 'उचल तुझं सामान आणि चालू लाग' असं सांगण्याचा मोह आवरत नाही; पण करता काय? हे सगळं आपल्याला करता येण्यासारखं नसतं. घराचं रिनोव्हेशन करणाऱ्या सर्वांचंच हे असं होतं. या सगळ्यात कमीत कमी त्रास व्हावा असं वाटत असेल तर योग्य 'प्लॅनिंग' सर्वात महत्वाचं. पहिला नियम म्हणजे सगळं काम एकदम काढू नका. एकाच फटक्यात सगळं होऊन जाईल हे ऐकायला बरं वाटत असलं तरी हा फटका किती दिवसांचा असू शकतो याला काही मर्यादा असत नाही. म्हणून प्लॅनिंग करताना नेमकी काय काय कामं करायची आहेत याची यादी बनवा आणि ती बनवताना मोठी कामं वेगळी आणि लहान कामं वेगळी काढा. लहान सहान कामं आधी करून घ्या. स्वीच बोर्ड बदलणं, प्लंबिंग किंवा तत्सम कामं आधी करवून घ्या. भिंतीच्या फोडाफोडीची आणि बांधण्याची कामं आणि रंगकाम एका फटक्यात करा. ही कामं शक्यतो प्रोफेशनल सर्व्हिसकडून करवून घ्या कारण सामान हलवण्याचं मोठं काम परस्पर होणार असतं. शिवाय दिलेल्या मुदतीच्या फार फार तर एक–दोन दिवस इकडे तिकडे होऊन ते पूर्ण होतं. सर्वात महत्वाचं म्हणजे ज्याप्रमाणे खर्च थोडा फार कमी जास्त होतो तसंच हे दिवसांचं गणितही गडबडणार असतं हे गृहीत धरा. म्हणून समोरचा दहा दिवस सांगत असेल तर तुमची तयारी पंधरा दिवसांची ठेवा.



## सुरू करा मेहंदीचा व्यवसाय

स्कील डेव्हलपमेंट

नोकरीसोबत एखादा जोड व्यवसाय करण्याचा विचार असेल किंवा नव्याने व्यवसाय सुरू करण्याच्या प्रयत्नात असाल तर मेहंदी विक्रीचा चांगला पर्याय तुमच्याकडे आहे. आपल्या संपर्काच्या बळावर हा व्यवसाय पुढे नेता येईल. मेहंदी विक्रीच्या व्यवसायाबाबतचं हे मार्गदर्शन...

* मेहंदीच्या बाजारपेठेत अजून विशिष्ट ब्रँडने स्वत:ची मक्तेदारी प्रस्थापित केलेली नाही. त्यामुळे साध्या मेहंदीचीही मोठ्या प्रमाणावर विक्री होते. म्हणूनच या क्षेत्रात स्वत:चं स्थान निर्माण करताना फारशा अडचणी येणार नाहीत. वितरणाच्या कक्षा विस्तारून तुम्ही तुमचे मेहंदी कोन विविध ठिकाणी विक्रीसाठी ठेऊ शकता.

* मेहंदीचा उद्योग सुरू करण्यासाठी फार भांडवल आणि उपकरणांची गरज नसते. यात सर्वात महत्त्वाचा असतो तो कच्चा माल म्हणजे मेहंदीची पानं. तसंच मेहंदीचा दर्जा वाढवण्यासाठी लागणाऱ्या काही वस्तू तसंच पॅकिंगसाठी प्लास्टिक आणि इतर साधनं घेतली की तुम्ही व्यवसाय सुरू करू शकता. यासोबतच पल्वरायझर मशीन, मेहंदीतला कचरा चाळण्यासाठी चाळणी, वजनकाटा आणि मेहंदीची पाकिटं सील करण्यासाठी पाऊच सीलिंग मशीन लागेल.



* मेहंदीच्या पानांपासून त्याची पूड तयार करण्यासाठी लागणारं युनिट बसवणं फार कठीण नाही. तसंच यासाठी फार जागाही लागत नाही. फक्त युनिट असणाऱ्या ठिकाणी भरपूर सूर्यप्रकाश यायला हवा.

* मेहंदीची पानं तुम्ही विक्रेत्यांकडून विकत घेऊ शकता. शक्य असेल तर मेहंदीची लागवडही करू शकता. मेहंदीच्या पानांचे तीन प्रकार असतात. काळे डाग पडलेली पानं हलक्या दर्जाची मानली जातात तर हलकी पिवळी झालेली पानं मध्यम दर्जाची असतात. मेहंदीच्या हिरव्यागार पानांचा दर्जा सर्वोत्तम असतो. मेहंदी तयार करण्यासाठी ही पानं वेगळी करून सुकवून घ्या. मशीनमध्ये टाकून मेहंदी पावडर तयार करा. ही पावडर चाळून घ्या. वजनाप्रमाणे पॅक करा. मेहंदीची ही पाकिटं दुकानांमध्ये विक्रीसाठी पाठवता येतील.

## बाळाच्या जन्माआधी...

काळजी घ्या

गर्भारपण हा प्रत्येक आईसाठी आनंदाचा अनुभव असतो असं नाही. अनेकजणी या कालावधीत अनेक प्रकारच्या तणावातून जात असतात. काहीजणींना नोकरीच्या ठिकाणी तणावाला सामोरं जावं लागतं तर काहीजणींना कौटुंबिक कलहाच्या तणावाला. आपल्याकडे म्हणजे भारतीय समाजात असं मानण्यात येतं की भावी मातेनं नऊ महिन्यांच्या कालावधीत नेहमी हसतं खेळतं असलं पाहिजे. तज्ज्ञांच्याही मते भावी आईचे हे नऊ महिन्यातले मनाचे खेळ बाळाच्या आयुष्यावर कायमस्वरुपी परिणाम करत असतात. म्हणून या नऊ महिन्यात तिनं तणाव दूर ठेवत हर प्रकारे आनंदी रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आवडतं संगीत, आवडती पुस्तकं वाचून किंवा खावंसं वाटतं ते तब्येतीची काळजी घेत खाऊन, प्रिय व्यक्तींच्या सानिध्यात राहून आनंद मिळवला पहिजे. गर्भारपणात ज्या माता तणावातून जातात त्यांची मुलं कुरकुरी, छोट्या छोट्या प्रसंगातही भेदरणारी असण्याच्या शक्यता जास्त असतात. बाळाला काहीही लागलं, दुखलं–खुपलं किंवा भीती वाटली तर ते आईच्या कुशीत आल्यानंतर शांत होतं. ही सुरक्षिततेची भावना त्याला पोटात असल्यापासूनच होत असते असं तज्ज्ञांचं मत आहे. पोटात असताना आईचा हळूवार स्पर्श आणि त्याच्याशी संवाद साधणं त्याला थेटपणानं समजत नसलं तरी या भावनेचा आणि लहरींचा सकारात्मक परिणाम बाळावर होत असतो असं त्यांचं मत आहे. मुलांच्या भावनिक समस्यांचा अभ्यास करणाऱ्यांच्या मते बहुतेक वेळा अशा मुलांच्या समस्यांचं मूळ त्यांच्या गर्भातल्या असुरक्षिततेच्या भावनेशी जाऊन मिळतं. भावी आयुष्यात ही मुलं तणावाला कशी सामोरी जाणार हेदेखील याच कालावधीतल्या असुरक्षिततेशी जाऊन मिळतं असं त्यांचं मत आहे. मँचेस्टर येथील एका महाविद्यालयात पहिलटकरीण आणि तिचे भावनिक तणाव आणि मुलाची पहिल्या वर्षातली भावनिक वाढ याबाबत एक अभ्यास केला गेला. त्यावेळी असं दिसून आलं की, ज्या माता नऊ महिने तणावात होत्या त्यांची मुलं जास्त रागीट, आक्रमक आणि 'डिप्रेशन प्रोन' होती. याच अभ्यासादरम्यान असं निदर्शनास आलं की आई तणावात असली आणि तिनं बाळाला थोपटलं तर त्याचाही सकारात्मक परिणाम दिसून येतो. सात महिन्याची गर्भवती आपल्या पोटावर बाळाला थोपटल्याप्रमाणे अलगद थोपटते आणि लाड करते त्यावेळेस बळाच्या हार्टरेटमध्ये फरक दिसून आला.



## एकटं वाटतंय!

समुपदेशन

मी २३ वर्षांची तरुणी असून फ्रान्समध्ये उच्च शिक्षण घेते आहे. इथे मला मित्रमैत्रिणी मिळाले आहेत. भारतातल्या एका मुलासोबत मी लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये आहे. त्याच्या आणि भारतातल्या इतर मित्रमैत्रिणींच्या मी सतत संपर्कात असते. हे सगळं करूनही मला इथे खूप एकटं वाटतं. इथलं सर्व काही सोडून भारतात निघून जावं असं सतत वाटत रहातं. व्यस्त रहाण्यासाठी मी छंदवर्गांना जाते. पार्ट टाईम जॉबही करते. पण एकटेपणा मला खात रहातो. ही स्थिती नॉर्मल आहे का? मी मानसोपचारतज्ज्ञाकडे जायला हवं का? मला मार्गदर्शन करा.

– परदेशात गेल्यानंतर एकटेपणा जाणवणं नैसर्गिक आहे. आपल्या माणसांपासून, संस्कृतीपासून लांब गेल्याने नैराश्य येणं अगदी स्वाभाविक आहे. मला वाटतं तू स्वत:ला वेळ द्यायला हवा. तुझ्या मनातल्या विचारांचा उहापोह करणंही गरजेचं आहे. सर्वात आधी तू तुझे प्राधान्यक्रम ठरव. फ्रान्समध्ये शिक्षण घेणं तुझी प्रायोरिटी असेल तर तिथल्या वातावरणाशी जुळवून घे. भारतात परतल्याने तुझं भलं होणार असेल तर तोही विचार कर. घरच्यांशी बोल. तू मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेऊ शकतेस. भारताला, आपल्या संस्कृतीला मिस करत असशील तर फ्रान्समधल्या भारतीयांशी संपर्क साध. त्यांच्यात मिसळण्याचा प्रयत्न कर. भारतीय मुलंही तुझ्यासोबत असतील. त्यांच्याशी मैत्री कर. काही काळानंतर तुला तिथल्या परिस्थितीशी नक्कीच जुळवून घेता येईल.



## गेट रेडी फॉर वीकेंड

स्टाईल स्टेटमेंट

वीकेंडला एखादा प्लॅन ठरल्यावर ऑकेजनला साजेशा पेहरावाचा शोध सुरू होतो. अशावेळी नेहमीच्या फॉर्मल्सपेक्षा काहीतरी ट्रेंडी, हटके घालण्याची संधी असते. उन्हाळ्यात तर हमखास वीकेंड प्लॅन्स ठरतात. कुटुंबिय, मित्रमैत्रिणींसोबत पिकनिक, ब्रंच किंवा शॉपिंगला जायचं असेल तर पेहरावही मोकळाढाकळा हवा. वीकेंड फॅशनच्या या काही टिप्स...

* आरामदायी, स्टायलिश आणि ट्रेंडी अशा तिन्ही गोष्टींचा मेळ साधायचा असेल तर शर्ट ड्रेसला पर्याय नाही. शर्ट ड्रेसची सध्या प्रचंड क्रेझ आहे. तुम्हाला शर्ट आवडत असेल पण जीन्स किंवा ट्राउझर घालायचा कंटाळा आला असेल तर शर्ट ड्रेस ट्राय करा. हा पेहराव तुम्हाला सॉफिस्टिकेट लूक देईल. फिटिंगवाला किंवा थोडा ढगळ शर्ट ड्रेस घ्या. त्यावर बेल्ट बांधा. मोजक्या ॲक्सेसरीज घाला. तुमची फॅशन नक्कीच लक्षवेधी ठरेल.



* यंदा डंगरीची फॅशनही इन आहे. डंगरी हा प्रकार बऱ्याच वर्षांपासून चलनात असला तरी यंदा त्याचे अनेकविध पर्याय पहायला मिळत आहेत.

* फ्लोरलला प्रचंड डिमांड असते. एखाद्या संध्याकाळी मस्त हवेत उडणारा, झुळझुळता फ्लोरल ड्रेस घाला. मुलायम अशा शीर फॅब्रिकचे फ्लोरल ड्रेस खूप छान दिसतील. कंफर्टसाठी कॉटन ड्रेस ट्राय करा.

* चारचौघींमध्ये उठून दिसायचं असेल तर जंपसूट घाला. फॉर्मल आणि कॅज्युअल अशा दोन्ही ऑकेजन्सना जंपसूट चालून जातो. हा पेहराव दिवसभर कॅरी करता येईल. दिवसभर शॉपिंग केल्यानंतर रात्री डिनरचा कार्यक्रम असेल तरी तुम्ही जंपसूट घालू शकता.

* तुम्ही क्रॉप टॉपही वेगवेगळ्या पद्धतीने ट्राय करू शकता. या टॉपवर डेनिम जॅकेट किंवा श्रग घालता येईल. क्रॉप टॉपमध्ये तुम्ही ट्रेंडी दिसाल.

## चेहरा निस्तेज दिसतोय?

ब्युटी टॉक

जुने फोटो बघताना आपण किती बारीक होतो, आपली त्वचा कशी नितळ आणि तजेलदार दिसायची असे विचार मनात रुंजी घालत रहातात. काळाच्या ओघात त्वचा निस्तेज दिसू लागते. तरुण वयातलं चेहऱ्यावरचं तेज कुठेतरी गायब होतं. यामागे बरीच कारणं असतात. अर्थात त्वचेच्या समस्यांवर उपायही आहेतच. त्वचा निस्तेज होण्यामागची कारणं आणि त्यावरचे उपाय जाणून घेऊ या.

* मृत पेशी हे त्वचा निस्तेज दिसण्याचं महत्त्वाचं कारण आहे. त्वचेतल्या या मृतपेशी साठून राहिल्याने चेहऱ्याचा तजेला हरपतो. चेहरा काळपट दिसू लागतो. मृतपेशी काढून टाकण्यासाठी आठवड्यातून एक किंवा दोनवेळा चेहरा एक्सफोलाइट करायला हवा. संवेदनशील त्वचा असेल तर होममेड स्क्रब्ज वापरा. नियमित स्क्रबिंगमुळे मृत त्वचेचा प्रभाव कमी होईल. उन्हाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी स्क्रबिंग शक्यतो रात्री करा.

* ओलावा कमी झाल्यामुळेही त्वचा निस्तेज आणि कोरडी दिसू लागते. हे टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या. दररोज सकाळी आणि रात्री चेहऱ्याला मॉईश्चरायझर लावा. यानंतरही कोरडेपणा दूर होत नसेल तर मॉईश्चरायझर लावण्याआधी फेस ऑईल्स आणि सिरम्सचा वापर करा.

* उन्हामुळे त्वचेचं सर्वात जास्त नुकसान होतं. पुरेशा काळजीअभावी चेहऱ्यावर काळे डाग पडणं, हायपरपिग्मेंटेशनसारख्या समस्या डोकं वर काढतात. सातत्याने उन्हात फिरल्याने चेहरा पार काळवंडून जातो. उन्हात जाणं टाळता येत नाही. पण सन्सक्रीनचा पर्याय तुमच्याकडे आहे. उन्हामुळे स्कीन कॉलाजेनचं संतुलन बिघडतं. कॉलाजेनचं नुकसान टाळण्यासाठी त्वचातज्ज्ञाच्या सल्ल्याने रेटिनॉलयुक्त उत्पादनांचा वापर करता येईल.

* वाढतं प्रदूषण हे सुद्धा त्वचेच्या समस्यांचं महत्त्वाचं कारण आहे. प्रदूषित घटकांमुळे त्वचेवर फ्री रॅडिकल्सची निर्मिती होते. यामुळे कॉलाजेनचं नुकसान होतं. परिणामी स्कीनटोनचं संतुलन बिघडतं. प्रदूषणाचा परिणाम कमी करण्यासाठी घरी आल्यावर चेहरा धुवून घ्या. यामुळे त्वचेवरची धूळ आणि प्रदूषित घटक स्वच्छ होतील. क जीवनसत्त्वयुक्त सिरम्स आणि लोशन्सचा वापर प्रभावी ठरू शकेल.



* ताणामुळेही त्वचा निस्तेज होते. शरीरात स्ट्रेस हार्मोन्सचं प्रमाण वाढलं की चेहऱ्याला होणाऱ्या रक्तप्रवाहाचं प्रमाण कमी होतं आणि त्वचा काळपट दिसू लागते. ताण कमी करण्यासोबतच रक्तपुरवठा सुधारण्यासाठी चेहरा धुताना तसंच मॉईश्चरायझर लावताना हलक्या हातांनी मसाज करा. यामुळे चेहऱ्याची चमक परत येईल.

## कुटुंब जोडणी, प्रबोधनाकडे संघाने वळवले लक्ष


# ओंकारेश्वरला दोन दिवस राष्ट्रीय कुटुंब बैठक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :
येत्या ४ आणि ५ जानेवारी २०२५ रोजी ओंकारेश्वर येथे कुटुंब प्रबोधनाची अखिल भारतीय बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या सभेत सरसंघचालक डॉ. मोहन भागवत संपूर्ण वेळ उपस्थित राहतील, अशी माहिती अखिल भारतीय समन्वयक डॉ. रवींद्र शंकर जोशी यांनी दिली.

आगामी काळात कुटुंब संघाच्या कायासीबत जोडणे, त्यांचे प्रबोधन करणे हा उद्देश ठेवून राष्ट्रीय स्तरावरील बैठकीचे आयोजन केले जात असल्याचे दिसत आहे. त्याचा अर्थातच भाजपला निवडणुकीत लाभ होऊ शकतो.

कौटुंबिक प्रबोधन उपक्रम २००८ मध्ये सुरू झाला. पहिली अखिल भारतीय बैठक २०१८ मध्ये मुंबईत झाली. दुसरी बैठक



२०२२ मध्ये काशी येथे झाली. तिसरी बैठक येत्या ४-५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीत देशातील विविध प्रांतातील प्रांत समन्वयक आणि सहसंयोजक आपल्या कुटुंबासह ओंकारेश्वर येथे एकत्र येत आहेत. विशेष म्हणजे सरसंघचालक मोहन भागवत यांची या बैठकीला पूर्णवेळ उपस्थित राहणार आहे. त्यामुळे या बैठकीला अधिक प्राप्त होणार असल्याचे म्हटले जात आहे.

**९०० जिल्ह्यांत विस्तार**

बैठकीत कुटुंबप्रणाली सक्षम करा या विषयावर संवाद व कुतूहल संकल्पना आयोजित करण्यात आली आहे. कौटुंबिक प्रबोधन उपक्रमाच्या भौगोलिक रचनेत अकरा गटप्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. कौटुंबिक मित्रांच्या माध्यमातून ४६ प्रांत आणि ९०० जिल्ह्यांमध्ये कायाचा विस्तार करण्याची योजना आहे.

विविध उपक्रमांद्वारे कौटुंबिक मित्र त्यांच्या शेजारच्या कुटुंबातील सदस्यांना आणि बंधू आणि बहिणींना आमंत्रित करतात. कुटुंबात राष्ट्रीय दृष्टी आणि सामाजिक मूल्ये जागृत करून परस्पर प्रेम, आदर आणि विश्वासाचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो, अशी माहिती आयोजकांनी दिली.

## फडणवीसांचे कौतुक होणं ही आनंदाची बाब

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :
सामनातून फडणवीसांचे कौतुक होणं ही आनंदाची बाब आहे. मुख्यमंत्री फडणवीसांचे आताचे काम हे फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अजून बाकी आहे. यापूर्वी आम्ही काही निर्णय घेतले त्यावेळी सामनातून कौतुक होईल अशी वाट आम्ही पाहिल्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, उत्तम जानकर यांनी खासदार सुप्रिया सुळे यांचा सल्ला घेत पुढे जायला हवे, असे म्हणत बावनकुळेंनी त्यांना टोला लगावला आहे. ३ महिन्यात राज्य सरकार कोसळेल असे वक्तव्य आमदार जानकरांनी केले होते.

बावनकुळे म्हणाले की, संतोष देशमुख हत्येचे राजकारण होऊ नये. ही घटना गंभीर आणि न पटणार आहे. सरपंचपदावरील व्यक्तीची हत्या होणं हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला पटण्यासारखे नाही. या घटनेनंतर फडणवीस सरकारने ज्या प्रकारे काम केले आहे, ते या घटनेच्या खोलपर्यंत गेले आहेत.

संतोष देशमुख हत्या प्रकरणी कोणीच तपास यंत्रणांना किंवा पोलिसांचे खच्चीकरण होईल असे विधान करु नये. देशमुख यांच्या घरी लोकांनी गेले पाहिजे, आमचे काही म्हणणं नाही. पण माध्यमांचे प्रेशर तपासावर येऊ नये.

बावनकुळे म्हणाले की, उद्योग येण्याचा हा उच्चांक ही केवळ सुरवात आहे. पिक्चर अभी बाकी है. राज्याला दिलेले वचनं आमचे सरकार पूर्ण करणार आहे



**बीडचे पालकमंत्री दादा ठरवतील**

बावनकुळे म्हणाले की, बीडचे पालकमंत्रीपद पूर्वी त्यांचे होते आताही त्यांनी मागितले आहे. त्यामुळे बीडचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादीकडे आहे, ते कुणाला द्यायचे हे अजित पवार ठरवतील असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## पुस्तक देवून सीएम फडणवीसांचे स्वागत



■ वृत्तसंस्था, सातारा, दि. ३ :
राज्यात शासकीय दौऱ्यावर असताना पुष्पगुच्छ देणे तसेच पोलिसांकडून मानवंदना देण्याची प्रथा बंद करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या आदेशानंतर आज मुख्यमंत्री फडणवीस यांचे साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पुस्तक देवून स्वागत केले. या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन उपस्थित होत्या.

## शिंदेसेनेचे बंडोबा घरवापसीच्या तयारीत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या (शिंदेसेना) काही जणांनी बंडखोरी केली होती. बेलापूर, ऐरोली, कल्याण मतदारसंघात पदाधिकाऱ्यांनी थेट रिंगणात उडी घेतली होती, तर अंबरनाथ, मुरबाडमध्ये काही पदाधिकाऱ्यांनी महायुतीच्या उमेदवारांविरुद्ध उघड प्रचार मोहीम राबवली.

यामध्ये प्रामुख्याने विजय चौघुले, विजय नाहटा, महेश गायकवाड यांचा समावेश आहे. त्यातील एकालाही यश मिळाले नाही. कोणीही निवडून आले नाही. त्यामुळे ते महापालिका, नगरपालिका निवडणूक लक्षात घेऊन पुन्हा शिवसेनेत परतण्याची तयारी करत आहेत. अनेकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संवाद सुरू केला आहे.

## २३ वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

### १३ ते २० फेब्रुवारी दरम्यान आयोजन

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ :
फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 23 वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यंदा 13 ते 20 फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

या चित्रपट महोत्सवात जागतिक व मराठी चित्रपट स्पर्धात्मक विभाग आणि अन्य विभाग यांमध्ये सुमारे 150 हून अधिक देशी-विदेशी चित्रपट दाखवण्यात येणार आहेत.

## तर मस्साजोगचा सरपंच करणार...

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ३ :
बुलडाणा जिल्ह्यातील कळमेश्वर येथे अवैध व्यवसायाला विरोध करणाऱ्या सरपंचाच्या पतीला तुझा मस्साजोगचा सरपंच संतोष देशमुख करून टाकीन, अशी धमकी देत पाच जणांनी मारहाण केली.

ही घटना मंगळवारी रात्री घडली. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे. कळमेश्वर येथील सरपंचांचे पती सुभाष मनोहर खुरद यांनी या प्रकरणी १ जानेवारी रोजी जानेफळ पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

सुभाष खुरद यांनी गावातील अवैध धंद्यांना आळा घालण्याचा प्रयत्न केल्याने गावातीलच अवैध व्यावसायिकांनी मंगळवारी त्यांना रस्त्यात अडवले. त्यापैकी गणेश भराड याने तू माझ्या अवैध धंद्याला विरोध करशील तर तुझा दुसरा मस्साजोगचा सरपंच संतोष देशमुख करून टाकीन, अशी धमकी दिली.

यावेळी या पाच जणांनी त्यांना मारहाण केली. तसेच त्यांच्या खिशातील पैसे आणि सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख २७ हजार रुपयांचा ऐवज हिसकावून नेला, असे या तक्रारीत नमूद केले आहे. या तक्रारीवरून जानेफळ पोलिसांनी आरोपी गणेश भराड, आकाश सपकाळ आणि त्यांचे अन्य तीन साथीदार अशा पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

## शाळेत अंध मुलावर अनैसर्गिक अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
खामगा, दि. ३ :
बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात एका अल्पवयीन बालकावर दोन नराधमांनी अनैसर्गिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे.

एका १४ वर्षीय मुलावर दोघा नराधमांनी बळजबरी लैंगिक अत्याचार केला. खामगाव नांदुरा रोडवरील जिल्हा परिषद शाळेत हा चीड आणणारा खळबळजनक प्रकार घडला. याप्रकरणी दोघा नराधमांविरुद्ध खामगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खामगांव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीत मुलगा १४ वर्षांचा असून ४० टक्के अंध आहे. त्याच्या असहायतेचा फायदा नराधमांनी घेतला. स्वप्निल दिलीप गवारगुरु (२९, रा. धोबी खदान, खामगाव) आणि आशीष अरुण शिंदे (३६, रा. हरी फैल, आंबेडकर नगर) अशी नराधम आरोपींची नावे आहेत.

पोलीस सूत्रांनुसार दोन्ही आरोपी पिडीत मुलाच्या मागावर होते. दोघांनी पिडीत मुलाला जिल्हा परिषदेत शाळेत नेले. तेथे त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार केला. या घटनेनंतर पिडीत बालकाला वेदना होऊ लागल्याने त्याने घडला प्रकार कुटुंबीयांना सांगितला. कुटुंबीयांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर खामगांव पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

## होतकरू नेमबाजांना संधी देणारी स्पर्धा

**: साप्ताहिक संवाद :**

काही वर्षांपूर्वी केवळ क्रिकेट एके क्रिकेटलाच महत्व देणाऱ्या आपल्या देशात आता, क्रिकेटच्या व्यतिरिक्त इतरही क्रीडा प्रकाराना ज्या खेळांना ऑलिंपिक स्पर्धांमध्ये स्थान आहे, अशा स्पर्धांना शासकीय आणि सामाजिक स्तरावर देखील प्रोत्साहन मिळू लागले आहे.

भारतातील होतकरू रायफल नेमबाज स्पर्धकांना संधी देणारी, भारताच्या माजी रायफल नेमबाज सुमा शिरूर यांच्या लक्ष शूटिंग क्लबचे माध्यमातून १५ वी आर आर लक्ष कप स्पर्धा पनवेल येथील कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी मध्ये ४ आणि ५ जानेवारीला संपन्न होणार आहे.याच अनुषंगाने लक्ष शूटिंग.क्लबच्या संचालिका, माजी रायफल नेमबाज अर्जुन पुरस्कार विजेत्या सुमा शिरूर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**आर आर लक्ष क्लब स्पर्धेचे स्वरूप काय असणार आहे?**

आर आर लक्ष कप स्पर्धा पनवेल मध्ये ४आणि ५ जानेवारी रोजी संपन्न होत आहे.यंदाचे या स्पधेर्चे १५ वे वर्ष असून,या स्पर्धेच्या माध्यमातून होतकरू नेमबाजांना संधी मिळणार आहे. या स्पर्धेत राष्ट्रीय एअर रायफल नेमबाजी स्पर्धेतील पुरुष व महिला.विजेते शाहू मने आणि अन्या नायडू यांच्यासह दिव्यांग सिंग पवर, अर्जुन बबुला आणि संदीप सिंग यांच्यासारखे नामांकित ऑलिंपियन देखील सहभागी होतील.

या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे लंडन ऑलिंपिक स्पर्धेचे कांस्य पदक विजेते आणि पॅरिस ऑलिंपिक २०२४ साठी भारतीय संघाचे प्रमुख शेफ द मिशन गगन नारंग उपस्थित असणार आहेत.




लोकरंग

**लक्ष कप स्पर्धेच्या आयोजनामागचा उद्देश काय आहे?**

आर आर लक्ष कप स्पर्धांचे आयोजन करण्यामागे आमचा उद्देश म्हणजे, खेळाडूंचे कौशल्य ओळखणे, उत्कृष्ट्रेला सन्मान देणे आणि नेमबाज यांना त्यांच्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करण्यासाठी सर्वोच्च व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. ही स्पर्धा केवळ स्पर्धा नसून, ती मेहनतीचा, समर्पणाचा आणि खिलाडू वृत्तीचा उत्सव आहे.

**या स्पर्धेत विजेत्यांना दिल्या जाणाऱ्या पारितोषिकाचे स्वरूप काय असेल?**

ही स्पर्धा वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटात होणार असून वरिष्ठ गटातील प्रथम विजेत्याला दीड लाख आणि ट्रॉफी तसेच भेटवस्तू मिळणार आहेत. तर कनिष्ठ गटातील प्रथम विजेत्याला ७५ हजार आणि ट्रॉफी व भेटवस्तू देण्यात येतील.

वरिष्ठ गटात द्वितीय विजेत्याला ७५ आणि तृतीय विजेत्याला ४० हजार आणि भेटवस्तू तर कनिष्ठ गटातील द्वितीय विजेत्याला ४० हजार आणि तृतीय विजेत्याला २५ हजार आणि भेटवस्तू देण्यात येतील.शिवाय काही उत्तेजनार्थ पारितोषिक उत्कृष्ट नेमबाज यांना देण्यात येतील. ■ ■

**: चला पर्यटनाला :**

मध्य प्रदेश, भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य, त्याचे प्रशासकीय केंद्र भोपाळमध्ये आहे. मोठ्या संख्येने अभ्यागत या प्रदेशाकडे आकर्षित होतात कारण त्याचा एक प्रसिध्द इतिहास आणि नैसर्गिकरित्या सुंदर आकर्षणे भरपूर आहेत. तलावांचे शहर म्हणून ओळखल्या जाण्याव्यतिरिक्त, भोपाळला भारतातील सर्वात हिरवे शहर म्हणून देखील ओळखले जाते.

अप्पर लेक हे भोपाळमधील सर्वात महत्वाचे सरोवर आहे, आणि भोजताल म्हणूनही प्रसिद्ध आहे. भोपाळच्या पश्चिमेला




असलेल्या या कृत्रिम तलावाला देशातील सर्वात जुने तलाव म्हणून ओळखले जाते. तेथे राहणारे स्थानिक लोक याला बडा तालब म्हणूनही ओळखतात. तलाव हा रहिवाशांसाठी पिण्याच्या पाण्याचा मुख्य पुरवठा आहे आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दरवर्षी अंदाजे तीस दशलक्ष गॅलन पिण्याचे पाणी पुरवतो.

अकराव्या शतकात कोलान्स नदी अडवून तलाव बांधणाऱ्या राजा भोजच्या नावावरून या आश्चर्यकारकपणे विस्तारलेल्या पाण्याचे नाव देण्यात आले. येथील लोककथा अशी आहे की शासकाने हा प्रचंड तलाव बनवला होता जेणेकरून तो त्याला झालेल्या त्वचेच्या आजारावर उपचार करू शकेल. तलावाच्या एका कोपऱ्यावर आढळणाऱ्या स्तंभावर राजा भोजचे शिल्प दिसू शकते.

पुल पुख्ता या नावाने ओळखला जाणारा ओव्हरब्रिज अप्पर लेक आणि लोअर लेक यांच्यामध्ये विभक्त होण्यासाठी बसला आहे.

अप्पर लेकच्या पूर्वेकडील बोट क्लबची निर्मिती करण्यात आली होती आणि आता ते पाहुण्यांना आनंद घेण्यासाठी विविध प्रकारचे जल क्रियाकलाप प्रदान करते, ज्यात पॅरासेलिंग, कयाक्स, पॅडलिंग आणि राफ्टिंग यांचा समावेश आहे. नयनरम्य कमला पार्क शेजारी दिसू शकते. रॉयल गार्डन एक म्हणून करते की दिले नवीन गोष्टींचा अनुभव घेण्यास उत्साही असलेल्यांसाठी एकत्र येण्याचे ठिकाण, उच्च हंगामात ते खूप व्यस्त असते. भोपाळला भेट देणाऱ्या ठिकाणांमध्ये बोट क्लब, सूर्यास्त आणि मत्स्यालय यांचा समावेश असेल, सर्व काही ताजी हवेने प्रसन्न होते. ■ ■

**: अक्षररंग :**

**माझे शाळेतले प्रयोग**

एका प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झालेल्या शिक्षिकेचा प्रवास या पुस्तकात मांडलेला आहे. मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, विषयाचे आकलन व्हावे या विचाराने केलेले विविध अभ्यासाचे प्रयोग आणि त्यांचे विद्यार्थ्यांवर होणारे चांगले परिणाम याचा लेखाजोखा माझे शाळेतले प्रयोग या पुस्तकात मांडलेला आहे. या पुस्तकाच्या लेखिका स्मिता गौड आहेत तर राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाची किंमत २४० रुपये आहे.

**प्रवासात भेटलेली माणसं**

भटकंती अर्थात दूरदूर प्रवासाला जाणं हि गोष्ट प्रत्येकालाच प्रिय असते. प्रवासात भेटलेली माणसं या पुस्तकात लेखकाने त्यांनी केलेल्या प्रदीर्घ प्रवासात त्यांना भेटलेल्या विविध माणसांचे शब्दचित्र रेखाटलेले आहे. लेखकाला भेटलेली हि माणसं, त्यांचे स्वभावधर्म आणि त्यांच्यातील वल्लीचा परामर्श मला भेटलेली माणसं या पुस्तकात वाचायला मिळतो. सुहास बारटक्के लिखित या पुस्तकाचे प्रकाशक नवचैतन्य प्रकाशन आहे तर किंमत १९० रुपये आहे. ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## छ. संभाजीनगरमध्ये उद्धव ठाकरेंना धक्का

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
छत्रपती संभाजीनगरमध्ये ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. शहराचे माजी महापौर, माजी खासदार व शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचे निकटवर्तीय मानले जाणारे नंदकुमार घोडेले आणि माजी महापौर अनिता घोडेले यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याची माहिती आहे.

विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात एकही लोकप्रतिनिधी नसणाऱ्या उद्धवसेनेला मनपा निवडणुकीच्या आधी मोठा धक्का बसला आहे. घोडेले हे उद्धवसेनेतील प्रमुख नेते अशी त्यांची ओळख आहे.

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर त्यांचे पक्षांतर उद्धवसेनेसाठी धक्कादायक मानले जात आहे. शिंदेसेनेत त्यांना संघटनेमध्ये मोठे पद व त्याशिवाय मोठी जबाबदारी मिळणार असल्याची चर्चा आहे. ही मागणी मान्य झाल्यानेच त्यांनी पक्षात प्रवेश केल्याचे म्हटले आहे.

नंदकुमार घोडेले हे शिवसेनेचे एकनिष्ठ नेते म्हणून ओळखले जातात. ते माजी महापौर देखील राहिले आहेत. तर त्यांच्या पत्नी अनिता घोडेले या देखील महापौर राहिल्या आहेत. घोडेले हे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचे अत्यंत विश्वासू मानले जातात.

## ६ वाहनांना ट्रेलरची धडक सर्व वाहने मिठी नदीत कोसळली



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
भरधाव वेगातील एका ट्रेलरने रस्त्याशेजारी थांबलेल्या ५ ते ६ वाहनांना धडक दिल्याची विचित्र घटना मुंबईच्या धारावीत घडली आहे.

धडक दिलेली सर्व वाहने मिठी नदीच्या पात्रात कोसळली आहेत. या घटनेमुळे मुंबईतील बेस्ट बसच्या अपघाताच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. वेगात असलेल्या ट्रेलर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि रस्त्याच्या कडेला उभ्या तसेच मार्गावरून धावणाऱ्या वाहनांना त्याने धडक दिली. ही सर्व वाहने मीठी नदीच्या पात्रात कोसळली. अपघातानंतर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

# सासुरवाडीला गेला अन अनर्थ झाला!

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ३ :
पत्नीला आणायला गेलेल्या लोणार (जिल्हा बुलढाणा) येथील युवकाची पालघर शहरात क्रूरपणे हत्या करण्यात आली.

केवळ मोबाईल आणि जवळील पैसे दिले नाही म्हणून दोन अट्टल गुन्हेगारांनी त्याचे जीवन संपविल्याचे तपासात निष्पन्न झाले. यामुळे पालघर सर लोणार मध्ये खळबळ उडाली आहे.

लोणार तालुक्यातील येवती या गावातील या युवकाचा पालघर येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला. सदर युवकास दोन आरोपींनी चाकूचे वार करुन जखमी केले होते. ही घटना गुरुवारी १ जानेवारी रात्री घडली. मृतक युवकाचे नाव महादेव घुगे (वय ३०) असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे.

प्राप्त माहिती नुसार येवती येथील युवक महादेव घुगे यांचे दोन महिन्यापूर्वीच पालघर मधील खानपाडा येथील एका युवतीशी लग्न झाले होते. विवाहानंतर पत्नीची प्रकृती बिघडल्याने ती काही दिवसासाठी माहेरी गेली होती. तिला परत आणण्यासाठी महादेव नव्या वर्षात सासरी पोहचला होता.

रात्री जेवन झाल्यावर महादेवने आपल्या सासु व सासऱ्याला आपण फेरफटका मारण्यासाठी बाहेर जात असल्याचे सांगितले. दरम्यान महादेव फिरत फिरत शहरातील हुतात्मा स्मारक (स्तंभ) परिसरात पोहचला.

यावेळी परिसरात आधीच उपस्थित असलेले अनीस खान (वय २५)व राजू वाघारी (वय २३) या दोघांनी महादेवला हटकले. यावेळी दोघांनी महादेवला चाकूचा धाक दाखवत त्याच्या जवळील रक्कम व मोबाइल मागितला. महादेवने नकार दिल्याने दोघांनी महादेव सोबत वाद घातला. यावेळी रागाच्या भारत दोन्ही आरोपींनी चाकूने सपासप वार केल्याने महादेव गंभीर जखमी झाला. त्याच अवस्थेत महादेवने कसेबसे पोलिस ठाणे गाठले.

पोलिसांनी त्याला जखमी अवस्थेत प्रथम पालघर येथे भरती केले, परंतू महादेव अत्यवस्थ असल्याने त्याला पुढील उपचारासाठी सिल्वासा येथील रुग्णालयात भरती करण्यात आले.

या ठिकाणी गुरुवार २ जानेवारी रात्री महादेवचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला. या प्रकरणी पालघर पोलिसांनी अनीस खान व राजू वाघारी या दोन्ही आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करत अटक केली आहे.

या हत्येप्रकरणी पोलिसांनी हुतात्मा स्तंभ परिसरातून राजू वाघारी याला तर घटनास्थळावरुन पसार झालेल्या अनीस खान यास भोईसर येथील गांधीपाडा मधून अटक केली. दोन्ही आरोपी हे अट्टल गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी देखील अनेक गंभीर गुन्हे दाखल आहे. पोलिस उपअधिक्षक सतीश धाराशीवकर, पालघरचे ठाणेदार अनंत पराड यांनी ही माहिती दिली.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
▪ शनिवार, दि. ४, जानेवारी २०२५ ▪

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या दोन आरोपींना अटक

**कन्हान :** कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत केरडी शिवारात दोन आरोपींनी ज्ञानेश्वर खंडार आणि त्याचा मुलाला फावड्याने व काठीने माराहण करुन गंभीर जख्मी केल्याने पोलीसांनी दोन आरोपींना अटक करुन त्याचा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार बुधवार (दि.१) जानेवारी ला सकाळी ८ वाजता ते ८:३० वाजता च्या दरम्यान फिर्यादी नामे ज्ञानेश्वर काशीराम खंडार, (वय ७०) वर्ष रा.केरडी हा आपल्या शेतामधील गहुला पाणी ओलत होते. आरोपी नामे प्रकाश खंडार यांनी फिर्यादीच्या गव्हाच्या शेतातुन ट्रॅक्टरनी धान भरुन नेले आणि गव्हाचे नुकसान केले. ज्ञानेश्वर ने त्याला हटकले असता आरोपी १) प्रकाश बाबुराव खंडार (वय ५१) वर्ष , २) लक्ष्मण बाबुराव खंडार वय ४४ वर्ष दोन्ही राहणार केरडी यांनी ज्ञानेश्वर ला लाकडी काठीने व मुलाला डोक्यावर फावडयाने मारुन गंभीर जखमी केले. या प्रकरणी कन्हान पोलीसांनी फियार्दी ज्ञानेश्वर खंडार यांचा तक्रारी वरून दोन्ही आरोपीतांना अटक करुन त्याचा विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक रोशन बावनकर हे करीत आहे.

# आदिवासी तरुणांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण द्या : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

आदिवासी समाजातील तरुण-तरुणींना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्यातील कौशल्य विकसित करा. त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था उभी करा. आदिवासी मुली एअर हॉस्टेस झाल्या पाहिजे. त्यांच्यातून पायलट, दर्जेदार शेफ घडले पाहिजे. त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घ्या, अशा सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग नितीन गडकरी यांनी आदिवासी विकास विभागाला दिल्या.



## आदिवासी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पधेर्चे उद्घाटन ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. पोलीस लाईन टाकळी येथील पोलीस मुख्यालय ग्राऊंडवर या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. उद्घाटन सोहळ्याला आदिवासी विकास मंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके, माजी महापौर माया इवनाते, माजी आमदार टेकचंद सावरकर, आदिवासी विभागाच्या आयुक्त नयना गुंडे, अपर आयुक्त रविंद्र ठाकरे, कृष्णराव परतेकी आदींची प्रमुख उपस्थिती होती. शासकीय अनुदानित आश्रमशाळांचे विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाल्याचा आनंद नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

नितीन गडकरी म्हणाले, ह्यउत्तम कर्तृत्व आणि नेतृत्व घडवायचे असेल तर मुला-मुलींचा खेळांमध्ये सहभाग आवश्यक आहे. आदिवासी मुलांमध्येही उत्तम संशोधक, नागरिक, शिक्षक, खेळाडू लपलेला आहे, हे त्यांनी सिद्ध केले आहे. आदिवासी मुला-मुलींमध्ये खूप क्षमता आहे. त्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. ज्ञानातून शैक्षणिक विकास शक्य आहे. हे ज्ञान देण्याची जबाबदारी देखील आदिवासी विकास विभागाची आहे.

आदिवासी समाजातून संशोधक, डॉक्टर, आयएएस तयार व्हावे, यासाठी प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्यासाठी आश्रमशाळांचे रेटिंग करा. ज्या आश्रमशाळा चांगले काम करत असेल त्यांना कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यासाठी मदत करा, अशा सूचनाही नितीन गडकरी यांनी आदिवासी विकास विभागाला केल्या.

गेल्या २५ वर्षांपासून विदभार्तील आदिवासी भागांमध्ये स्व. लक्ष्मणराव मानकर ट्रस्टच्या वतीने १६०० आश्रमशाळा चालवल्या जातात. या शाळांमध्ये १८०० शिक्षक आहेत.

त्यातील ९० टक्के शिक्षक आदिवासी आहेत. कुठलेही सरकारी अनुदान न घेता हे कार्य सुरू आहे. या शाळांमधील ६५ मुली उत्तम खेळाडू आहेत. माझे मित्र रविंद्र फडणवीस यांनी नागपुरातील महिला महाविद्यालयात या मुलींसाठी वसतीगृह निर्माण केले.

# सीताबर्डीचे २ वसुलीबाज पोलीस निलंबित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

रेस्टॉरंट मालकाविरुद्ध दाखल झालेल्या मारहाणीचा गुन्हा रफादफा करण्यासाठी सीताबर्डी ठाण्याच्या 2 पोलिस कर्मचाऱ्यांनी 5 लाख रुपयांची खंडणी मागितली. याबाबत पीडिताने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली.

या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी डीसीपी राहुल मदने यांना कारवाईचे आदेश दिले. चौकशीनंतर गुरूवारी दोन्ही कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. निलंबित कर्मचाऱ्यांमध्ये सीताबर्डी पोलिस ठाण्याचे हवालदार प्रवीण वाकोडे आणि समाधान कांबळे यांचा समावेश आहे. दोघेही विशेष पथकाचे प्रमुख होते. वाकोडे यापूर्वीही काही प्रकरणांमुळे चर्चेत राहिला आहे.

यापूर्वी पाचपावली आणि धंतोली पोलिस ठाण्यात तैनाती दरम्यान अशाच तक्रारींमुळे त्याची बदली करण्यात आली होती. पीडित रेस्टॉरंट संचालक यश दुबे यांचे वेस्ट हायकोर्ट रोडवर फर्जी कॅफे आहे. 31 डिसेंबरच्या रात्री तेथे पार्टी होती. सिव्हिल लाईन्स येथील नानकिंग रेस्टॉरंटचे संचालक सायरस चेंग हे देखील या पार्टीत आले होते. पार्टीत काही कारणावरून सायरसचा एका तरुणीसोबत वाद झाला होता. तरुणीने सायरसविरुद्ध सीताबर्डी पोलिस ठाण्यात मारहाणीची तक्रार दाखल केली.

पीएसआय कविता जगताप यांनी गुन्हा नोंदवून केस डायरी पोलिस ठाण्यातील कपाटात ठेवली. वाकोडे आणि त्याच्या साथीदाराने अवैधरित्या ही डायरी स्वतःकडे ठेवून घेतली.

### ओलीस ठेवून केली मारहाण

डायरी प्राप्त केल्यानंतर वाकोडे आणि कांबळे यांनी सायरसला सीताबर्डी पोलिस ठाण्यात आणले. दोघांची पोलिस ठाण्यात विशेष खोली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, येथेच आरोपी पोलिस कर्मचाऱ्यांनी सायरसला ओलीस ठेवून मारहाण केली. त्यानंतर केस डायरीत नोंद मारहाणीचे प्रकरण रफादफा करण्यासाठी 5 लाख रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास परिणाम भोगण्याची धमकी दिली. सायरस यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रार केली. गुरूवारी चौकशीअंती दोघांनाही निलंबित करण्यात आले.

# विमान चुकल्यामुळे एम्समध्ये प्रवेश हुकला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

पश्चिम बंगालमधील कल्याणी येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेमध्ये (एम्स) जनरल मेडिसीन विषयात प्रवेशासाठी एका विद्यार्थिनीने अपार कष्ट केले. मात्र, अपरिहार्य कारणास्तव थोडक्यात कोलकाताला जाणारे विमान हुकल्यामुळे ती मूळ कागदपत्रांसह दिलेल्या कालावधीत उपस्थित राहू शकली नाही. एम्स प्रशासनाला याबाबत माहिती दिल्यावर विनंती करूनही त्यांनी असहकार्याची भूमिका घेतल्याने विद्यार्थिनीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाद मागितली. उच्च न्यायालयाने याप्रकरणी मुलीची गुणवत्ता आणि अपरिहार्य परिस्थिती लक्षात घेता एम्समधील तिच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा केला.

**काय घडले होते?**

कल्याणी विजय चक्रावार, असे या याचिकाकर्त्या विद्यार्थिनीचे नाव आहे. याचिकेनुसार, याचिकाकर्ती ही सध्या नागपूरच्या एम्सच्या रेडिओ डायग्नोस्टिक्स शाखेत पदव्युत्तर (एमडी) तीन वर्षांच्या या अभ्यासक्रमात प्रथम वर्षात शिकते.

एम्स, नवी दिल्ली दरवर्षी पश्चिम बंगाल येथील कल्याणीसह देशभरातील विविध एम्स संस्थांमध्ये एमडी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आयएनआय-सीईटी परीक्षा आयोजित करते. ही परीक्षा विद्यार्थीनीने दिली होती. या परीक्षेत तिने देशात गुणवत्ता यादीत ११९ क्रमांक प्राप्त केला. १९ डिसेंबर २०२४ रोजी प्रकाशित झालेल्या समुपदेशन आणि ऑनलाइन सीट वाटपाच्या पहिल्या फेरीत अनारक्षित श्रेणीतील अत्यंत मागणी असलेल्या जनरल मेडिसिन स्पेशलायझेशन साठी पश्चिम बंगालच्या कल्याणी एम्स येथे विद्यार्थिनीचा नंबर लागला. त्यानंतर निवडलेल्या उमेदवारांना कागदपत्रांसह प्रत्यक्ष सादर राहण्यासाठी सांगण्यात आले होते. कागदपत्रांची औपचारिकता पूर्ण करण्यासाठी पश्चिम बंगाल येथे २४ डिसेंबरला संध्याकाळी पाच वाजेपर्यंतचा अवधी देण्यात आला होता.

१९ डिसेंबर ते २४ डिसेंबर या अत्यंत कमी कालावधीमध्ये याचिकाकर्तीला डिमांड ड्राफ्ट देखील तयार करायचा होता. त्यामुळे, तिने २३ डिसेंबर रोजी बँकेचा व्यवहार पूर्ण करीत २४ डिसेंबरचे सकाळी ७.३० वाजताचे नागपूर ते कलकत्ता विमानाचे तिकीट बुक केले होते.

उच्च न्यायालयाने याप्रकरणी मानवी दृष्टिकोन बाळगून ३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत विद्यार्थिनीचे नाव समाविष्ट करण्याचे निर्देश एम्स प्रशासनाला दिले. याचिकाकर्तीच्या वतीने ॲड. अनिश कठाणे यांनी बाजू मांडली.

# वेगळ्या विदर्भ राज्यासाठी क्रांती महामोर्चा करणार संघर्ष

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

वेगळ्या विदर्भाची मागणी १०० वर्षे जुनी असून, अनेक नेत्यांनी ही मागणी रेटून धरीत स्वतःची पोळी शेकण्याचे काम केले आहे. त्यामुळे लोकांचा आता नेत्यांवर विश्वास राहिला नसून, विदर्भ वेगळा व्हावा, अशी जनतेची मागणी आहे. जनतेतूनच आता विदर्भ राज्य क्रांती महामोर्चाची स्थापना करण्यात आली आहे. या मोर्चाचे संस्थापक-अध्यक्ष प्रशांत जयकुमार असून, उपाध्यक्ष रवींद्र भामोडे, रामेश्वर मोहबे, महासचिव अशोक पाटील, सचिव धन्नुलाल प्रजापती आहे. वेगळ्या विदभार्साठी संघर्ष करणार असल्याचे प्रशांत जयकुमार यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

# ॲप एक, सुविधा अनेक

## महावितरणच्या सेवा आपल्या बोटावर!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

विद्युत ग्राहकांना नवीन वीज कनेक्शन घेण्यापासून बिले भरणे, तक्रारी नोंदविणे आणि वीजचोरीची माहिती देणे अशा विविध सुविधा आपल्या बोटावर असलेल्या महावितरणच्या मोबाईल ॲपला ग्राहकांचा प्रतिसाद मिळत असून केवळ गुगल प्ले वरुन मोबाईलमध्ये ॲप डाऊनलोड करण्याची संख्या 50 लाखापेक्षा अधिक असून ॲपलच्या ॲप स्टोर्स वरुन देखील लाखोंच्या संख्ने महावितरण मोबाईल ॲप डाऊन लोड करण्यात आले आहे.

ॲप डाऊनलोड करून ते सतत वापरणाऱ्या ग्राहकांची संख्या 35 लाखापेक्षा अधिक असून या ॲपचा वापर करणा-या ग्राहकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महावितरणच्या ग्राहकांना मोबाईल ॲपचा वापर करून महावितरणच्या अनेक सेवा सहजपणे मोबाईल फोनवरून मिळविता येतात. ऊर्जा चॅटबॉट्च्या माध्यमातून ग्राहकांच्या मनातील अनेक प्रश्नांची तात्काळ ऊत्तरे. नवीन कनेक्शनसाठी अर्ज करणे, त्यासाठीची कागदपत्रे अपलोड करणे आणि त्यासाठीची फी भरून नवीन कनेक्शन मिळविणे ही सुविधा ॲपमार्फत उपलब्ध आहे. या ॲपवरून ग्राहकांना आपले विजेचे बिल पाहता येते आणि भरताही येते.

वीजबिलाची नोटिफिकेशन आणि बिल भरल्याची माहिती या ॲपाद्वारे उपलब्ध होते. ग्राहकांना वीजेच्या बाबतीत तक्रार नोंदविणे आणि आपल्या तक्रारीवर पुढे काय कारवाई झाली याची माहिती घेणे ॲपमुळे सोपे जाते. वीजचोरीची खबर देण्याचीही सुविधा या ॲपवर उपलब्ध आहे. मोबाईल ॲपवरून ग्राहकांना आपल्या मीटरचे रिडिंग स्वतःच भरता येते. जवळचे महावितरणचे कार्यालय अथवा बिल भरणा केंद्र कोठे आहे आणि तेथे कसे जायचे, याचीही माहिती ॲपवरून मिळते.

वापरण्यास सहज आणि सोपे असलेले महावितरणचे हे ॲप ग्राहकांना उपलब्ध करुन दिलेल्या पारदर्शक सोयीव्हे उत्तम्क उदाहरण आहे. या ॲपचा अधिकाधिक ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# सत्यशोधक महिला संमेलन ५ जानेवारीला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

सत्यशोधक सत्यशोधक महिला महासंघ द्वारे महाराष्ट्रात विविध उपक्रम आयोजित केले जातात समाजातील कर्तुत्ववान स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास वर्तमान काळात लोकांसमोर आणण्याची गरज आहे. लोकमान्य राजमाता अहिल्याराणी होळकर यांनी आपल्या कार्यकाळात विविध लोकहितांचे उपक्रम आपल्या संस्थानात राबविले होते. आर्थिक दृष्ट्या समाजाला प्रबळ करण्याचे काम तर त्यांनी केलेच,सोबतच सामाजिक सुधारण्याच्या दृष्टिकोनातून घेतलेल्या भूमिका लक्षणीय आहे.

त्यांची राजकीय कारकीर्द अतिशय आव्हानात्मक असूनही त्यांचा धाडसीपणा वैशिष्ट्य पूर्ण ठरला त्यांची हीच परंपरा आम्ही सत्यशोधक पुढे नेत आहोत. लोकमान्य राजमाता अहिल्याराणी होळकर यांच्या कार्यकर्तुत्वाची चर्चा वर्तमानात आव्हानात्मक परिस्थितीशी सामना करण्याचे बळ देते.

5 जानेवारी २०२५ ला चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी सत्यशोधक महिला संमेलन होऊ घातले आहे.

या निमित्ताने कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्ष समाजसेविका आशाताई शिंदे, चौंडी कार्यक्रमाच्या उद्घाटक प्रा. सविताताई हजारे, महिला प्रतिनिधी भारतीय पिछडा शोषित संघटन दिल्ली, संमेलनाध्यक्ष रंजनाताई कांबळे, अध्यक्ष आम्ही सावित्रीच्या लेकी महाराष्ट्र राज्य, मार्गदर्शक प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर, सुप्रसिद्ध लेखक,साहित्यकार, संभाजीनगर, स्मिता पानसरे, सुप्रसिद्ध ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चोपडे, सत्यशोधक विचारवंत वर्धा. ॲड. वैशालीताई डोळस, सुप्रसिद्ध पुरोगामी विचारवंत संभाजीनगर प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड, लेखक सत्यशोधक विचारवंत संभाजीनगर. कार्यक्रमात सत्रचे अध्यक्ष प्रा. कविता म्हेत्रे, सत्यशोधक विचारवंत सातारा. या संमेलनात सत्यशोधक सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला. साहित्य उद्योजक आणि सामाजिक क्षेत्रात महाराष्ट्रातून मा. निसर्गवासी गणपतराव उगले, ज्येष्ठ साहित्यकार सत्यशोधक, विद्या करपे, सामाजिक राहुरी, अहिल्यानगर, पूजा मानमोडे, यांना हा सन्मान संमेलनात सन्मानित करण्यात येणार आहे.

तसेच साहित्यकरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभणार सकाळी 9 वा./ सत्यशोधक युवा महासंघ सत्यशोधक महिला महासंघ इतर समविचारी संघटना यांची रॅली निघणार आहे. विविध महापुरुषांच्या वेशभूषेत विद्यार्थी रॅलीत उपस्थित राहणार आहे. मोठ्या संख्येने महाराष्ट्रातून लेखक साहित्यिक विचारवंत सत्यशोधक कार्यकर्ते या संमेलनाला आपली हजेरी लावणार आहेत आहेत. सल्लागार मंडळी प्रा.वृंदाताई शेंडे, वृंदाताई ठाकरे, ॲड. धनराज वंजारी, अनुज हुलके, बाबा बिडकर, सुनिता शिंदे, वनितताई काळे, ऋषिकेश उगले, प्रा.डॉ. विना राऊत, प्रा .स्वाती पाटील, प्रा. प्रियंका शिंदे, प्रा.प्रतिभा रेवतकर स्वागत समिती मालन अविनाश शिंदे, सरपंच चौंडी. गणेश हरिदास उबाळे उपसरपंच चौंडी, सुनिता दरवडे, मीना नवले, वैजनाथ घडलिंग, मदनदादा नागपुरे, राम वाडीभस्मे, कल्याणी राठोड या मान्यवरांची हजेरी लागणार आहे, तरीपण या संमेलनाला आमंत्रित आहात, अशी माहिती सत्यशोधक समाजाच्या संयोजक अध्यक्ष वंदना वनकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य यांनी दिली.



**नागपूर:** नागपुरातील पोलीस लाईन टाकळी मैदानावर आदिवासी विभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात हेमलकसा येथील लोक बिरादरी शाळेचे खेळाडू विद्यार्थी मल्लखांब करतांना

# विदर्भ विज्ञान उत्सव २०२४-२५ चे उद्घाटन संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

'विदर्भ विज्ञान उत्सव', जो विज्ञान भारती विदर्भ मंडळ, एल.ए.डी. आणि आर.पी. महिला कॉलेजच्या IQAC तसेच आर.टी.एम. नागपूर विद्यापीठाचा संयुक्त उपक्रम आहे, याचे उद्घाटन ३ जानेवारी २०२५ रोजी एल.ए.डी. कॉलेजच्या शंकर नगर परिसरात झाले.




या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून आर.टी.एम.एन.यू. चे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, नागपूरचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य, आणि नितिका फार्मास्युटिकल्सचे सीईओ रवलीन सिंग खुराना उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यात विज्ञान भारती विदर्भचे अध्यक्ष डॉ. सतीश वटे आणि डब्ल्यू.ई.एस.चे उपाध्यक्ष डॉ. अविनाश देशमुख यांचीही उपस्थिती होती.

रवलीन सिंग खुराना यांनी विद्यार्थ्यांना मौलिकता, सर्जनशीलता आणि नवकल्पना वापरून भारताला जागतिक नेता (विश्वगुरु) बनवण्यासाठी प्रोत्साहित केले आणि जागतिक औषध उद्योगात भारताच्या महत्त्वपूर्ण स्थानावर प्रकाश टाकला. श्री सतीश वटे यांनी विद्यार्थ्यांना, शाळा आणि महाविद्यालयांना भारताच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण संपत्ती म्हणून ओळखले आणि प्रगतीसाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या महत्त्वावर जोर दिला.

अतुल वैद्य यांनी मुख्य भाषण दिले, ज्यात त्यांनी सांगितले की विज्ञान हे मानव जीवनाचा अविभाज्य आणि सर्वव्यापी भाग आहे. त्यांनी समाजाच्या भल्यासाठी विज्ञानाच्या उपयोगाची महत्त्वाची आवश्यकता व्यक्त केली आणि नवकल्पना आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या व्यावहारिक दृष्टिकोनाची आवश्यकता स्पष्ट केली.

विज्ञान भारतीचे कार्यकारी सदस्य नरेश चाफेकर, संयोजक राजेश कारेमोरे, एल.ए.डी. कॉलेजच्या कार्यवाहक प्राचार्या डॉ. रिजुता बापट आणि वैशाली गाडे यांनीही आपली उपस्थिती नोंदवली. एल.ए.डी. कॉलेजच्या प्रमुख उपस्थितांमध्ये डॉ. नंदा राठी, डब्ल्यू.ई.एस.च्या मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. हर्षा झारिया, IQAC समन्वयक डॉ. ए. मसराम आणि डॉ. सुमिता सप्रे यांचा समावेश होता. उद्घाटन सोहळ्यात विदर्भस्तरीय विज्ञान मॉडेल स्पर्धा-सह-प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यासोबत विज्ञान पोस्टर स्पर्धा, विज्ञान रांगोळी स्पर्धा, एआय मॉडेल प्रदर्शन, प्रमुख भारतीय महिला वैज्ञानिकांचे गॅलरीचे आयोजन करण्यात आले. सर्व स्पर्धा कृषी, पर्यावरण आणि आरोग्यसेवेमधील विज्ञान आणि त्याचा अनुप्रयोग या विषयावर आधारित होत्या.

या स्पर्धेत इयत्ता ८ वी ते ११ वीमधील विद्यार्थ्यांनी तयार केलेली ६६ मॉडेल्स (कार्यशील आणि गैर-कार्यशील) प्रदर्शित करण्यात आली. ही मॉडेल्स डिसेंबर २०२४ मध्ये विदभार्तील ११ जिल्ह्यांमध्ये आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धांमधून निवडली गेली होती. याशिवाय, नागपूरमधील विविध शाळा आणि महाविद्यालयांमधून ६० विज्ञान पोस्टर आणि ५० रांगोळ्या प्रदर्शित करण्यात आल्या.

आधीच्या जिल्हास्तरीय फेऱ्यांमधून निवडलेली २२ पोस्टरही प्रदर्शनाचा भाग होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अनिता येम्दे यांनी केले आणि औपचारिक आभार प्रदर्शन डॉ. प्रकाश इटनकर यांनी केले. पारितोषिक वितरण 4 रोजी : पारितोषिक वितरण समारंभ ४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३ वाजता जस्टिस भवानी शंकर नियोगी हॉल, एल.ए.डी. कॉलेज, शंकर नगर येथे समारोप सोहळ्यादरम्यान आयोजित केला जाईल. या प्रसंगी VNIT चे संचालक डॉ. प्रेमलाल पटेल, AIIMS चे संचालक डॉ. प्रशांत जोशी आणि आर.टी.एम.एन.यू.चे प्रो-वाइस-चांसलर डॉ. राजेंद्र काकडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

# रंग रंगीले, छैल छबिले आंतर शालेय बाल स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

सदातन आयुर्वेद प्रा. लिमि. आणि बसोली ग्रुप नागपूर द्वारा आज शनिवार 4 जानेवारी 2025 ला अरण्य गोरेवाडा बोधाली येथे रंग रंगीले, छैल छबिले या आंतरशालेय ऑन द स्पॉट बालचित्र स्पधेर्चे आयोजन करण्यात आलेले आहे. स्पर्धेची वेळ दुपारी 1.45 ते 3.45 पर्यंत असून ही स्पर्धा अ गट वर्ग 1ते 4 व ब गट वर्ग 5 ते 9 साठी घेण्यात येणार आहे.

प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि पाच उत्तेजनार्थ पारितोषिके त्याच दिवशी 4.30 वाचता देण्यात येणार आहेत. स्पर्धकांनी स्पर्धेच्या दिवशी आयोजित ठिकाणी 15 मिनिटे आधी यावे.

स्पर्धेचे विषय वेळेवर देण्यात येतील. स्पर्धकांनी चित्राच्या मागे पूर्ण नाव, वर्ग, गट आणि शाळेचे नाव लिहावे. स्पर्धकांना चित्रासाठी लागणारा कागद आयोजकांतर्फे पुरविण्यात येईल.

स्पर्धेसाठी लागणारे वॉटर कलर, रंग कांड्या, स्केचपेन वगैरे साहित्य स्पर्धकांनी आणावे. ब्रश पुसायला कापड आणि खाली ठेवायला बोर्ड ही स्पर्धकांनी आणावे. विजेत्यांना पारितोषिके आणि प्रमाणपत्र देण्यात येईल.

स्पधेर्साठी कोणतीही फी आकारण्यात येणार नाही. अधिक संपकार्साठी सदातन प्रायव्हेट लिमिटेड चे ॲडमिनिस्ट्रेशन मॅनेजर अरविंद इंगोले यांच्याशी 9970886601 या क्रमांकावर संपर्क साधावा.

# फुले दांपत्याला भारतरत्न देऊन विद्यापीठांसमोर पुतळा बसवा

### बहुजन समाज पार्टीची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

फुले दांपत्यांनी भारतात सर्व सामान्यांच्या शिक्षणाची सर्वप्रथम सुरुवात केली. त्यामुळे त्यांनी सुरू केलेल्या पुण्याच्या भिडे वाड्यातील पहिल्या शाळेच्या जागेवर राष्ट्रीय स्मारक बांधावे, फुले दांपत्याला भारतरत्न मिळावे, राज्यातील सर्व विद्यापीठांसमोर त्यांची स्मारके बनवावीत, त्यांच्या साहित्याचे पुनर्प्रकाशन व्हावे, क्रांतीज्योतींचे शासनमान्य तैलचित्र सर्व शाळा व कार्यालयात लावावे, अशी मागणी आज बसपा नेत्यांनी नागपुरात केली.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या 194 व्या जयंती निमित्ताने बसपा नेते कॉटन मार्केट येथील क्रांतीज्योतीच्या पुतळ्यासमोर माल्यार्पण व अभिवादनासाठी एकत्र आले असताना ही मागणी केली. महाराष्ट्र प्रदेश बसपाचे नागोराव जयकर, उत्तम शेवडे, जिल्ह्याचे रंजनाताई ढोरे, राजकुमार बोरकर, योगेश लांजेवार, मोहम्मद इब्राहिम



टेलर, चंद्रशेखर कांबळे, अभिलेश वाहने, जितेंद्र घोडेस्वार, राहुल सोनटक्के यांच्या नेतृत्वात माल्यार्पण व अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी प्रामुख्याने माजी जिल्हाध्यक्ष संदीप मेश्राम, रुपराव नारनवरे, उमेश मेश्राम, अंकित थूल, अजय उके, मुकेश मेश्राम, नितीन वंजारी, अभय डोंगरे, विकास नारायने, राजेंद्र सुखदेवे, जगदीश गजभिये, जगदीश गेडाम, ओमप्रकाश शेवाळे, अरविंद तायडे, अरविंद मेश्राम, पंकज नाखले, अमित गजभिये, अनिल मेश्राम, दिव्यांशू लांजेवार, जगदीश मेश्राम, संभाजी लोखंडे, विजय मेंढे, प्रेम पाटील, अरुण शेवडे, हेमंत बोरकर, करूना तामगाडगे, उर्मिला माने, हिरा पाटील, सविता चौरे, शारदा पाटील, नीलिमा जांभुळकर, राणी गजभिये, पौर्णिमा तिरपुडे आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

## प्रा. किशोर येवले यांचा सेवानिवृत्त सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ३ :

स्थानिक खैरगाव येथील जनता हायस्कूल व कनिष्ठ एमसीव्हीसी महाविद्यालय खैरगावंचे प्राध्यापक किशोर निळकंठ येवले हे दि. 31 डिसेंबर 2024 रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने दि. 1 जानेवारी 2025 रोजी त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अनिल साठोणे, पर्यवेक्षिका सुषमा साठोणे याच्या प्रमुख उपस्थितीत शाल, नारळ, व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. येवले हे 29 वर्ष कार्यरत राहिले. स्वभावाने प्रेमळ आणि मनमिळाऊ, काम करण्याची जिद्द, मित्रत्वाचे संबंध, कायम ठेवत 29 वर्ष सेवा करत कसे दिवस निघाले हे अजूनही लक्षात आले नाही असे भावनिक उद्गार सेवानिवृत्ती निरोप समारंभ कार्यक्रमात संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अनिल साठोणे यांनी यावेळी अवगत केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा, आकोटकर ,संचालन प्रा, माहुरे आणि आभार प्रा, घारपुरे यांनी मानले.

# सरस्वती विद्यामंदिर मध्ये विज्ञान प्रदर्शनी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३ :

सरस्वती माध्यमिक विद्या मंदिर बिनाकी येथे शालेय स्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन डॉ. संदीप शेंडे यांच्या हस्ते मंगळवार ३१ डिसेंबर रोजी शाळेचे सचिव महेंद्र सदावर्ते, मुख्याध्यापक प्रवीण ढोक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

वर्ग ५वी ते १२ वी पर्यतच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात भाग घेऊन ८३ मॉडेल तयार केले. यामध्ये दृश्य मॉडल, गणितीय मॉडेल आणि कॉम्प्युटर मॉडेल सहभागी होते.

तिन्ही प्रकारचे मॉडेलचा उपयोग विज्ञानाच्या प्रत्येक विभागामध्ये केला




जातो. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात नव नवीन कल्पना साकारून मॉडेल तयार केले होते. डॉ. संदीप शेंडे यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेलचे निरीक्षण करून मॉडेलची माहिती जाणून घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. आयोजनासाठी पर्यवेक्षिका मेघा पंडे , शिक्षक यशवंत कातरे,नामदेव बारापात्रे, अतुल घोसेकर, गौरी खडगी, रामा सेलोकर, सचिन जुगनाहाके, सुभाष शिवणकर, सुभाष भुसारी, राजू धांडे, रुपेश रक्षमवार, प्रेमा चवरे, स्वाती फुलझले व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## मरामझिरी रेल्वे स्थानकावर स्टेशन महोत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने ०२ जानेवारी २०२५ रोजी मरामझिरी रेल्वे स्थानकावर "स्टेशन महोत्सव" यशस्वीरित्या आयोजित केला. भारतीय रेल्वेच्या वारशाचा गौरव करण्यासाठी आणि त्याच्या समाजातील योगदान तसेच ऐतिहासिक महत्त्वाबद्दल जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित केलेला हा अनोखा कार्यक्रम होता. या कार्यक्रमात गावकरी, रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांनी उत्साहीपणे सहभाग घेतला, ज्यामुळे हा कार्यक्रम एक रंगीबेरंगी समुदाय मेळावा बनला.

कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे झाली, ज्यात स्थानिक कला रूपांचा दाखला देण्यात आला. यानंतर ऐतिहासिक प्रदर्शन आयोजित केले गेले, ज्यामध्ये जुने रेल्वे छायाचित्रे, आणि आठवणींचा संग्रह ठेवण्यात आला. या प्रदर्शनाने युवा पिढीत रेल्वेच्या इतिहासातील रुची वाढवली. कार्यक्रमात स्थानक प्रमुख आणि वरिष्ठस्थानक कर्मचाऱ्यांनी उपस्थितांना संबोधित करताना रेल्वे वारशाच्या जतनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचा समारोप रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समुदायासाठी केलेल्या योगदानाचे कौतुक करण्यासाठी एका सन्मान समारंभाने झाला.

# नगरधन येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३ :

ग्रामपंचायत कार्यालय नगरधन येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जयंतीनिमित्त त्यांचा फोटोला माल्यार्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सी.आर.पी. सौ. सीमा सुरेंद्र बिरनवार यांनी त्यांचा जीवनावर प्रकाश टाकला. यावेळी सरपंच मायाताई अरुण दमाहे, सदस्या मीनाक्षीताई वाघमारे, रोशनीताई वासनिक, तरारेताई, सी.आर.पी. सौ. सीमा सुरेंद्र बिरनवार, आशा वर्कर करुणाताई पौनिकर, वैशालीताई बावनकुळे, प्रीती सरोदे उपस्थित होते.

दरवर्षी ३ जानेवारी हा दिवस देशभरात सावित्रीबाई फुले जयंती म्हणून साजरा केला जातो. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एका गावात झाला. त्यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. सावित्रीबाई फुले या समाजसेविका, स्त्री मुक्ती चळवळीत सहभागी आणि देशाच्या पहिल्या शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी प्रदीर्घ लढा दिला



आणि त्यांची स्थिती सुधारण्यासाठी मोठे योगदान दिले.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म दलित कुटुंबात झाला. पूर्वीच्या काळी दलितांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते, पण सावित्रीबाई फुले यांनी या सर्व वाईट गोष्टींविरुद्ध लढा दिला आणि आपले शिक्षण चालू ठेवले. त्यांना त्यांच्या समाजात अस्पृश्यतेचा सामना करावा लागला पण त्यांनी हार मानली नाही आणि शिक्षण चालू ठेवले. यानंतर तिने अहमदनगर आणि पुणे येथे शिक्षिका होण्याचे प्रशिक्षण पूर्ण केले आणि नंतर त्या शिक्षिका झाली.

पतीसोबत पहिली महिला शाळा सुरू केली : सावित्रीबाई फुले यांचा विवाह त्यांच्या वयाच्या ९ व्या वर्षी झाला होता. त्यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी झाला होता, लग्नाच्या वेळी ते १३ वर्षांचे होते. स्वतःचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांनी आपल्या पतीसह, १८४८ मध्ये पहिली महिला शाळा उघडली. यानंतर त्यांनी देशभरात महिलांच्या अनेक शाळा उघडण्यास मदत केली. त्यांच्या या कार्याबद्दल ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने त्यांचा गौरव केला. सावित्रीबाई फुले यांनी त्यांचे पती ज्योतिबा फुले यांच्यासमवेत अनेक चळवळींमध्ये भाग घेतला, त्यातील एक सती प्रथा होती. स्त्रिया विधवा झाल्यावर मुंडण करण्याच्या प्रथेच्या विरोधात त्यांनी आवाज उठवला.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५६ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. शुक्रवार (3) रोजी शोध पथकाने 56 प्रकरणांची नोंद करून 30,500/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 15 प्रकरणांची नोंद करून 6,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 8 प्रकरणांची नोंद करून 3,200/-



रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 8 प्रकरणांची नोंद करून 7,500/- रुपयांची वसुली करण्यात आली.

चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्याचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000 रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/ रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 14 प्रकरणांची नोंद करून 2,800/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 9 प्रकरणांची नोंद करून 9,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मी नगर झोन अंतर्गत मे. मेसींन्ग ॲड फुड सर्विसेस यांनी यांनी चेंबर मध्ये टाकाऊ पदार्थ व अन्न टाकून चेंबरचा ब्लॉक केल्याबद्दल रु. 10,000/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. धंतोली झोन अंतर्गत मे. अनुसया एन्टरप्राइजेस यांनी मनपा यांच्या विरूध्द विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. नेहा स्वीट्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल 5 हजार रुपयांचा दंड वसुल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. सुधांशु स्वीट्स यांनी मे. तिरूपती सेल्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला.

# बर्धन फक्त व्यक्ती नव्हे तर संस्था : प्रो. अजय पटनायक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

कॉमरेड भाई ए.बी.बर्धन नुसती व्यक्ती नसून तर ती एक संस्था होती, ज्यातून बरेचसे कार्यकर्ते तयार झाले व चळवळींना नवा उजाळा मिळाला, असे प्रतिपादन दिल्लीतील जेएनयूचे प्रो.अजय पटनायक यांनी परवाना भवन येथे आयोजित ए.बी.बर्धन यांच्या ९ व्या स्मृती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले. डॉ.वि.स.जोग व मोहन शर्मा संयुक्तपणे लिहिलेल्या भाई अर्धेन्द भूषण बर्धनः एक झंझावात या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

ते पुढे म्हणाले बर्धन हे साधी



राहणी व उच्च विचारसरणीतले होते. मोर्चे व चळवळींबाबत ए.बी.बर्धन यांचे कार्य फार मोठे त्याची तुलना करत जुन्या काळच्या जेएनयूच्या संघटनेत व आजच्या संघटनेत जमीन आसमानचा फरक असल्याचे त्यांनी सांगितले.

आजच्या शासन काळाबाबत बोलताना त्यांनी शेतकरी आत्महत्या थांबल्या नाहीत, त्याचबरोबर आजचा विद्यार्थी पण आत्महत्या आणि डिप्रेशनने जगत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी डॉ. वि.स.जोग, मुख्य अतिथी दिल्लीतील जेएनयूचे प्रो.अजय पटनायक, परवाना ट्रस्टी डी.एस. बुचे, नागपूर आयटकचे अध्यक्ष मोहन शर्मा, भालचंद्र कानगो, श्याम काळे, सचिव सी.एम. मोहरे मंचावर उपस्थित होते.

भालचंद्र कानगो यांनी प्रास्ताविकात भाकप संघटना माणसे जोडण्याचे काम करते, याचमुळे संघटना उभ्या करण्यात ए.बी.बर्धन कसे महान होते, याची बरीच उदाहरणे देत उपस्थितांना पटवून दिले. त्यांनी कामगारांचे प्रश्न, माहितीचा व शिक्षणाचा अधिकार यासाठीचे प्रयत्न तसेच राष्ट्रपती पहिली महिला प्रतिभाताई पाटील व्हाव्यात म्हणून केलेले प्रयत्न यावरही कानगो यांनी आपली भूमिका मांडली. तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आयटकचे शहर अध्यक्ष मोहन शर्मा यांनी अध्यक्षीय भाषणात चळवळी, मोर्चे याबद्दल संघटना मजबूत करण्यात ए.बी.बर्धन यांनी यांचा हातखंडा कोणी पकडू नाही तसेच त्यांचे डब्लुसीएल चंद्रपूर व एमएसईबी फेडरेशनचा संघर्ष याचे उदाहरण देत ए. बी. बर्धन ७५ वर्षांपासून एकाच पक्षात कार्यरत राहिलेल्या एकमेव कार्यकत्यार्ची आजच्या परिस्थितीत आवश्यक होती, याचा आवर्जुन उल्लेख करत जुन्या स्मृतींना उजाळा दिला.

# आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

स्त्री शिक्षणाच्या अग्रदूत, थोर समाज सुधारक, शिक्षण प्रसारक ज्ञानज्योती, आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त म.न.पा.केन्द्रीय कार्यालयातील आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. या प्रसंगी उपायुक्त विजया बनकर, उपायुक्त विजय देशमुख, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी श्री. मनिष सोनी, अमोल तपासे, अजय माटे, गजानन जाधव,मेधार्थी पानतावने, नेहा मंडारी, आदी उपस्थित होते. महात्मा फुले मार्केट स्थित सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अधिक्षक विश्वास कणुर्के, राजेश गायधने, जितेंद्र हिरणवार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

# मराठी अभिजात भाषा राष्ट्रीय परिषद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

मराठी अभिजात भाषा सांस्कृतिक वारसा आणि भविष्यकालीन वाटचाल या विषयावरील राष्ट्रीय परिषद वनामती हॉल धरमपेठ येथे घेण्यात आली होती.साहित्य अकादमीचे सदस्य प्रा. नरेंद्र पाठक, हे या परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. "ज्ञानदेवाने रचिला होता जिचा पाया।। बहिणाबाईने लावली मराठीला माया। । सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन आपलं काम केलं. आपल्या भाषेचं वैभव टिकवायचं असेल तर, सरकारवर अवलंबून राहून चालणार नाही. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठीतून न बोलण्याचा न्यूनगंड सोडावा लागेल आणि आपल्या भाषेचा रास्त अभिमान बाळगावा लागेल. आपले साहित्यिक मोठे आहेच, पण मराठी साहित्य देशात व जगभरात पोहोचवण्यासाठी अनुवादकाचे मनुष्यबळ निर्माण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे मत यावेळी प्राध्यापक नरेंद्र पाठक यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, परिषदेच्या संयोजिका डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांनीही आपली मतं मांडली.

कार्यक्रमाचा समारोप डॉ सलील कुलकर्णी आणि संदीप खरे यांच्या गाजलेल्या, आयुष्यावर बोलू काही या कवितेच्या कार्यक्रमाने झाला. कार्यक्रमाला नागपूरच्या मराठी प्रेमी रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

## पतंजली योग समितीतर्फे सावित्रीबाई फुले यांना आदरांजली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या, अनंत अडचणीवर मात करत मुलींसाठी पहिली शाळा सुरू करणाऱ्या पहिल्या शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त पंडित दीनदयाल उपाध्याय गार्डन, रघुजी नगर येथे आदरांजली अर्पण करण्यात आली. पतंजली योग समिती व ज्येष्ठ नागरिक मंडळ दत्तात्रय नगरतर्फे झालेल्या कार्यक्रमात शारदा ईटणकर (जिल्हाधिकाऱ्यांच्या मातोश्री) प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांनी सावित्रीबाईच्या फोटोला पुष्पहार अर्पण केला. ज्येष्ठ योग शिक्षक नामदेव फटिंग अध्यक्षस्थानी. होते प्रा. महादेव बोराडे, हरीश देशमुख, भीमराव पाटील व गुलाब उमाठे यांनी सावित्रीबाईच्या जीवन व कार्याची माहिती दिली. यावेळी गजानन महाले, श्रीराम दूरगकर, पद्माकर आगरकर, भास्कर राघोर्ते, वंदना तांदूळकर, वाल्मीक आंबेकर, मोरेश्वर मेघरे, सुवर्णा पाकलवार, साधना धाबेकर, कल्पना गाडगे, वेणू घोडखंदे उपस्थित होते.

# वाडीच्या कराटे पटूंचा ग्वालियरमध्ये डंका



■ महासागर प्रतिनिधी
वाडी दि. ३ :

ग्वालियरमध्ये पार पडलेल्या आठवे योद्धा राष्ट्रीय कराटे स्पर्धेत के.डी.ओ. कराटे डो संघटनेच्या कराटे पटुंनी उत्कृष्ठ कामगिरी करीत विविध वयोगटात विभिन्न पदकांची कमाई केली.

स्पर्धेत रुद्रांश बिर्हा- सुवर्ण पदक (काता), तनुश्री महोजे- रौप्य पदक (काता) आयुषी गौरे - कांस्य पदक (काता) कांस्य पदक (कुमिते), पलक इखारे- कांस्य पदक (काता) कांस्य पदक (कुमिते), धारा साहू- कांस्य पदक (काता), श्रुति मेंढे- सुवर्ण पदक (कुमिते) कांस्य पदक(काता), आशय घरडे - कांस्य पदक (काता) कांस्य पदक (कुमिते) आर्यन शेजूल -कांस्य पदक (काता), प्रणिता ठाकरे - रौप्य पदक (काता) कांस्य पदक (कुमिते), निखिल वांन्हदरे - ७१ किलो वजनी गटात रौप्य पदक (कुमिते), अविका झालपुरे - ४५ किलो वजनी गटात सुवर्णपदक (कुमिते), कांस्य पदक (काता ), तेजस्विनी पाटणकर - ६५ किलो वजनी गटात सुवर्णपदक (कुमिते), रौप्य पदक (काता), यथार्थ गीध - ३५ किलो वजनी गटात कांस्यपदक (कुमिते), कांस्य (काता) धीरज लारोकर -७८ किलो वजनी गटात कांस्यपदक,स्पेशल इव्हेंटमध्ये ८४ किलोपेक्षा जास्त वजन गटात सुवर्णपदक (कुमिते), ओजस पाटील - कांस्यपदक काता कांस्य, मैथली धांडे - सुवर्णपदक (काता), विदिका फंदी-कांस्य पदक (कुमिते), निवृत्ती साहारे-कांस्य पदक (काता), पार्थ ठाकरे - कांस्य पदक (कुमिते), मल्हार धांडे- कांस्य पदक(काता) स्पर्धेचे आयोजन तांत्रिक संचालक शिहान जयदेव शर्मा, स्पर्धा नियंत्रक शिहान पारितोष शर्मा यांनी केले.


सर्व कराटे पटुनी आपल्या यशाचे श्रेय आई वडीलासह, सेन्साई विनोद गुप्ता, सेन्साई सतीश बिर्हा, सेन्साई विशाल मानवटकर, सेन्साई यश हरडे, सेन्साई प्रवीण नेहारे यांना दिले.

# मध्य रेल्वे, नागपूर विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक पदाचा विनायक गर्ग यांनी कार्यभार स्वीकारला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

श्री विनायक गर्ग, भारतीय रेल्वे सेवा विद्युत अभियंता 1995 च्या बॅचचे अधिकारी, यांनी मध्य रेल्वे, नागपूर विभागाच्या नवीन विभागीय रेल्वे व्यवस्थापक म्हणून कार्यभार स्वीकारला आहे.

श्री गर्ग यांना रेल्वे मंत्रालय आणि इतर प्रतिष्ठित संस्थांमध्ये महत्त्वाच्या पदांवर काम करण्याचा व्यापक अनुभव आहे. या पदावर रुजू होण्यापूर्वी, ते 29 जुलै 2020 पासून नवोदय विद्यालय समितीचे



आयुक्त म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी महत्त्वाचे योगदान दिले.

NVS मधील भूमिकेपुर्वी, श्री गर्ग भारत पर्यटन विकास महामंडळात, पर्यटन मंत्रालयात मुख्य सतर्कता अधिकारी होते, जिथे त्यांनी पारदर्शकता आणि सुशासनाला प्रोत्साहन दिले. रेल्वेतील आपल्या कारकिर्दीत त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर उल्लेखनीय योगदान दिले आहे.

रुड़की विद्यापीठाचे माजी विद्यार्थी, श्री गर्ग यांनी विद्युत अभियांत्रिकीमध्ये बी.टेक (ऑनर्स) ही पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी सिक्किम मणिपाल विद्यापीठातून प्रकल्प व्यवस्थापनामध्ये एमबीए करून आपली कौशल्ये अधिक परिष्कृत केली आहेत.

नागपूर विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक म्हणून, श्री गर्ग यांचे उद्दिष्ट कार्यक्षमता वाढवणे, प्रवासी समाधान वाढवणे आणि मालवाहतूक व्यवसायाचा विकास करणे आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली सेंट्रल रेल्वेचा हा गतिमान विभाग नवनवीन बदल आणि उत्कृष्टतेच्या उंचीवर पोहोचेल.

## गजानन महाराजांच्या चरणी बुंदीचे लाडू अर्पण करणार

**नागपूर :** आम्ही सर्व भक्तांच्या सहभागातून हरिपाठ मंडळाच्या वतीने एक संकल्प, तो म्हणजे श्री संत गजानन महाराजांचे शेगावला जाऊन श्री संत गजानन महाराजांच्या चरणी बुंदीचे लाडू अर्पण करणार आहोत. असा संकल्प केलेला आहे.

त्याकरिता आम्ही एक लाख २१ हजार १२१ बुंदीचे लाडू अर्पण करणार आहोत. अर्पण सोहळ्याचा कार्यक्रम दि. ५ जानेवारी २०२५ रोजी (रविवारी) आयोजित केलेला आहे. कृपया गजानन भक्तांनी नोंद घ्यावी. तो संकल्प पूर्ण होण्यासाठी आपलं सहकार्य लाभो याकरिता मेसेज टाकतो आहे.

# भावी पिढीमध्ये रुजवावे संतांचे विचार

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी; विश्व वारकरी सेवा संस्थेतर्फे अभिनंदन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

महाराष्ट्राची संस्कृती संतांच्या वाङ्मयाशी जुळलेली आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज, गजानन महाराज, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज आदी संतांनी जीवन कसे जगावे, याचा संदेश दिला. सुसंस्कृत समाज निर्माण होण्यासाठी संतांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. त्यासाठी भविष्यातील पिढीमध्ये संतांचे विचार रुजविण्याचे कार्य आपल्याला करायचे आहे. त्यातून समाज उभा होईल आणि राष्ट्रनिमार्णाचे उद्दिष्ट साध्य होईल, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (शुक्रवार, दि. ३ जानेवारी) केले.




विश्व वारकरी सेवा संस्थेच्या वतीने जुना सुभेदार ले-आऊट येथील आदर्श मंगल कार्यालयात अभिनंदन सोहळा आयोजित करण्यात आला. त्यावेळी नितीन गडकरी बोलत होते. यावेळी विश्व वारकरी सेवा संस्थेचे संदीप काळे यांची उपस्थिती होती. नितीन गडकरी म्हणाले, महासागरातील प्रत्येक थेंब महत्त्वाचा असतो. तसेच अंधःकार नाहीसा करण्यासाठी एक छोटासा दीप महत्त्वाचा असतो. सुर्याचा आणि चंद्राचा अस्त होईल, तारे लोप पावतील. सगळीकडे अंधःकार होईल. अशावेळी दीप म्हणतो की, मी जळत राहील. किती उजेड देऊ शकेन, हे माहिती नाही; पण अंधःकार दूर करण्याचा माझा प्रयत्न अखेरपर्यंत सुरू राहील. संतांचे विचार, त्यांनी दिलेले संस्कार भक्तीमार्गाच्या माध्यमातून भविष्याच्या पिढीपर्यंत पोहोचावेत, असा उद्देश आहे. सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी संतांचा प्रत्येक विचार अंधःकार नाहीसा करणाऱ्या तेजस्वी पणतीप्रमाणे आहे, असेही ते म्हणाले.

जे का रंजलें गांजले, त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा. माझी आई मला नेहमी संत तुकाराम महाराजांचा हा अभंग सांगायची. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे : आकाशात पतितं तोयं, यथा गच्छति सागरम। सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति पडे खालती जे नभातून पाणी जसे सागरा तेच जाते मिळोनी; नमस्कार कोणाही देवास केला तरीं अंती तो पोचतो केशवाला असा या संस्कृत सुभाषिताचा मराठी अनुवाद आहे.

स्वामी विवेकानंदांनी शिकागोच्या भाषणात हेच सांगितले आहे. माझा धर्म किंवा परमेश्वर श्रेष्ठ आहे, हे सांगायला मी इथे आलेलो नाही. कारण तुमची ज्या धर्मावर, परमेश्वरावर श्रद्धा असेल, त्याची भक्ती करून शेवटी आपण एकाच ठिकाणावर पोहोचणार आहोत, असा विचार स्वामी विवेकानंदांनी मांडला, या शब्दांत नितीन गडकरी यांनी संतांच्या विचारांचे महत्त्व विशद केले.

भक्तीरसाचा संस्कार समाजात निर्माण झाला तर समाजात गुणात्मक बदल होईल. आपण चांगल्या विचारांच्या सहवासात असलो तर चांगली प्रेरणा मिळते. संत गोरा कुंभार, चोखामेळा, गजानन महाराज, तुकडोजी महाराजांची आपण जात विचारत नाही. कारण माणूस त्याच्या जातीने नव्हे तर गुणांनी श्रेष्ठ असतो. त्यामुळे जे चांगले आहे ते स्वीकारण्याची भूमिका असली पाहिजे, असेही नितीन गडकरी म्हणाले.

# जन्मदात्यांच्या हत्येचा उत्कर्षला पश्चाताप

## खसाळ्यातील डाखोळे दाम्पत्य हत्याकांड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

बाबांनी हाकलल्याने मन अतिशय खिन्न झाले होते. मनात सतत आत्महत्येचे विचार फिरत होते. टोकाचा निर्णयही घेतला होता. मात्र, हिंमत झाली नाही. काही तास-ांनी बाबा घरी परतल्यावर पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होईल. त्यामुळे त्यांनाच संपविण्याचा विचार उत्कर्षच्या डोक्यात फिट झाला. आणि दुपारी आईची हत्या केली. बाबा आल्यावर त्यांच्यावरही चाकूने वार करीत खून केला. परंतू आता पश्चताप होत असून सध्या तो मानसिक तणावात आहे. तो चौकशीत सहकार्य करीत असून विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देत असल्याची माहिती पोलिस सुत्रांकडून मिळाली आहे. मृतक लीलाधर डाखोळे (50) आणि अरुणा डाखोळे (43) यांच्या पार्थिवावर बुधवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिसांनी उत्कर्षला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला 7 जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

लीलाधर कोराडी वीज केंद्रात तांत्रिक कर्मचारी होते तर आई अरूणा शिक्षिका होती. मुलगा उत्कर्ष (24) हा अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला तर मुलगी सेजल (21) ही बीएएमसच्या प्रथम वषार्ला शिकते. घटनेच्या दिवशी म्हणजे 26 डिसेंबरला उत्कर्षच्या वडिलांनी त्याला घरातून बाहेर निघून जाण्यास म्हटले आणि नातेवाईकाच्या अंत्ययात्रेसाठी निघून गेले. परत आल्यावर तू घरात दिसायला नको, असेही त्याला बजावून सांगितले होते. आता काय करावे असा प्रश्न उत्कर्षसमोर उभा झाला.

बाबा घरात घेणार नाही आणि मी बाहेर राहू शकणार नाही. त्यामुळे आत्महत्या हा एकमेव पर्याय त्याच्यासमोर होता. त्याने टोकाचा निर्णय घेतलाही परंतु त्याची हिंमत झाली नाही. त्यामुळे त्याने आई-वडिलांनाच संपविण्याचा निर्णय घेतला. दुपारी आई स्वयंपाक खोलीत असताना त्याने गळा आवळून तिची हत्या केली. वडील आल्यानंतर त्यांच्यावरही चाकूने हल्ला करत रक्ताच्या थारोळ्यात लोळविले.

### वर्ग मैत्रिणीसोबत लग्न करण्याची ईच्छा

उत्कर्षचे वर्गमैत्रिणीसोबत चार वर्षांपासून प्रेमसंबंध होते. त्यांना प्रेमविवाह करायचा होता. उत्कर्षने प्रेयसीला घरी बोलावले आणि आई-वडिलांशी भेट घालून दिली. मात्र, आईने लग्नाला चक्क नकार दिला होता तर वडिलांनी उत्कर्षच्या कानाखाली लगावली होती. या प्रकारामुळे तो प्रेयसीसमोर अपमानीत झाला होता.

# मनपाद्वारे नागपूरकरांना नवीन वर्षाची भेट

## नवीन वर्षात पाणी देयकातील ८० टक्के विलंब शुल्क माफ होणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

नागपूरकर जनतेला नागपूर महानगरपालिकेद्वारे नवीन वर्षाची अनोखी भेट देण्यात येत आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात पाणी देयकामधील ८० टक्के विलंब शुल्क माफ करण्याची महत्वाकांक्षी योजना मनपाद्वारे सुरू करण्यात आली आहे. १ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे.

नागपूर शहरात सध्यास्थितीत एकूण ४२३८०९ उपभोक्ते अस्तीत्वात आहेत. यापैकी सर्व प्रकारच्या ग्राहकांपैकी आजच्या घटकेला एकूण ९६३६८ उपभोक्त्यांवर मुळ रक्कम व विलंब शुल्कासह एकूण २९९.४६ कोटी (दि. २६.१२.२०२४ पर्यंत) बकाया आहे. उपरोक्त बकाया राशीबाबत तपासणी केल्यानंतर निदर्शनास आल्यानुसार, मुळ रक्कम ही ११७.५७ कोटी एवढी आहे तर विलंब शुल्क १८१.८९ कोटी आहे. मुळ रक्कमेपेक्षा विलंब शुल्क जास्त असल्याने बहुतांश उपभोक्ता पाणी देयकाचा भरणा करण्यास टाळतात व त्यामुळे एकूण बकाया रक्कम खूप जास्त प्रमाणात निर्दशनास येते. पाणी पुरवठा न होणे, पाणी पुरवठा अनियमित असणे, दुषीत पाणी पुरवठा होणे, २००९ मध्ये पाणी दरात झालेली वाढ व त्यानंतर सन २०१० मध्ये कमी झालेले दर, मौक्यांवर नळ कनेक्शन बंद असणे, मात्र पाण्याचे देयके सुरू असणे, जुने नळ कनेक्शन असताना मोक्यावर इमारत किंवा अर्पाटमेंट तयार होऊन जुने पाण्याचे देयकाकरीता रक्कम भरण्यास नवीन रहिवाश्यांची तयारी नसणे, वरील कारणामुळे संबंधीत उपभोक्त्यांनी पाणी देयकाची रक्कम जमा करणे बंद केले व थकीत रक्कमेवर वार्षीक १८ टक्के सरचार्ज लावण्याची तरतुद असल्याने ही रक्कम दिवसेंदिवस वाढत गेली. या बाबींमुळे ग्राहक पाणी देयक भरण्यास टाळाटाळ करतात. या सर्व बाबी लक्षात घेता व यावर तोडगा काढण्याचा दृष्टीने व बकाया रक्कमेची वसुली अधिक प्रमाणात करता येईल याद्दष्टीने पाणी बकाया धारक उपभोक्त्यांच्या देयकातील ८० टक्के विलंब शुल्क माफ करणारी महत्वाकांक्षी योजना नागपूर महानगरपालिकेद्वारे सुरू करण्यात आली आहे.

१ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेच्या माध्यमातून शहरातील एकूण ४२३८०९ पाणी उपभोक्त्यांपैकी सर्व प्रकारच्या ग्राहकांपैकी एकूण ९६३६८ बकाया धारक, उपभोक्त्यांच्या पाणी देयकातील ८० टक्के विलंब शुल्क माफ करण्यात येईल. यामुळे एकूण १४५.५१ कोटी रक्कम निर्लेखित करण्यात येईल. ही योजना राबविल्यास मुळ बकाया आणि २० टक्के विलंब शुल्क यासह १५३.९४ कोटी (निम्नतम शुल्कासह) वसुली मनपाला अपेक्षित आहे. ज्या उपभोक्त्यांनी या योजनेचा दिलेल्या कालावधीत लाभ घेतला नाही किंवा सामील होण्यास तयार नसतील त्यांचे विरूध्द या कालावधीत पाणीपट्टी उपविधीच्या तरतुदीच्या अधीन राहून कार्यवाही करण्यात येईल. ज्या उपभोक्त्यांचे नळ जोडण्या बकाया राशी भरली नसल्याने बंद करण्यात आले आहे. अश्या उपभोक्त्यांना या योजनेचा लाभ घेतल्यावर नळ जोडणी परवानगी देण्यात येईल, मात्र अश्या उपभोक्त्यांना रिकनेक्शन शुल्क भरावे लागतील. त्याच प्रमाणे अशा उपभोक्त्यांना बंद कालावधीचे निम्नतम दरानुसार रक्कम भरावी लागेल किंवा मालमत्ता करात आमपाणी कर भरावे लागतील, असेही मनपाद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे.

## जगातील सर्वात तरुण आर्यन मॅन ठरलेल्या दक्ष खंते याचा होणार गौरव

**नागपूर :** क्रिडा विभाग, मित्र परिवार व प्रेस क्लब नागपूरच्या वतीने पश्चिम ऑस्ट्रेलियातील बसल्टन येथे नुकतीच पार पडलेली अत्यंत प्रतिष्ठेच्या 20 व्या जागतिक पूर्ण अंतराची आयर्न मॅन ही शर्यत वयाच्या 18 वर्षी पूर्ण करून जगातील सर्वात तरुण आयर्न मॅन ठरलेल्या दक्ष खंते याचा गौरव करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम शनिवार, 4 जानेवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता प्रेस क्लब ऑफ नागपूर, सिव्हील लाईन्स येथे होणार असून उपसंचालक क्रीडाशेखर पाटील यांच्या हस्ते हा सत्कार होईल. कार्यक्रमाला प्रेस क्लब ऑफ नागपूरचे अध्यक्ष प्रदीप मैत्र व स्पोर्ट्स जर्नालिस्ट्स असोसिएशन ऑफ नागपूरचे प्रभारी अध्यक्ष अमीत संपत यांची प्रमुख उपस्थिती राहील.

# १० महिन्यात २०२ विशेष रेल्वेगाड्या रद्द

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

सणासुदीच्या काळात, उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने रेल्वेतर्फे विशेष गाड्या सुरू करण्यात येतात, पण या गाड्याही मोठ्या प्रमाणात रद्द केल्या जातात आणि अनेक गाड्यांना विलंब होत असल्याची बाब समोर आली आहे.

दरवर्षी दिवाळी, गणोत्सव, दुर्गा पूजा आणि छटपूजा तसेच उन्हाळ्यात रेल्वेकडून विशेष गाड्या सोडल्या जातात. या गाड्या काही विशिष्ट कालावधीसाठी असतात. या गाडीला नियमित गाड्यांपेक्षा अधिक डबे असतात.

बहुतांश वेळा या गाडीचे प्रवास भाडे अधिक असते. सणांच्या काळात आणि उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये लाखो लोक आपल्या कुटुंबियांसह आणि प्रियजनांसह सण साजरा करण्यासाठी आपापल्या घरी परतत असतात. त्यामुळे रेल्वेगाड्यांची मागणी वाढते. नियमित गाड्यांमधून अचानक वाढलेल्या प्रवाशांना सामावून घेणे शक्य नसते. म्हणून ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी रेल्वेतर्फे विशेष गाड्या सोडण्यात येतात. परंतु अनेकदा या गाड्या रद्दही केल्या जातात. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळण्याऐवजी गैरसोय अधिक होत असते. मध्य रेल्वेने जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत एकूण १ हजार ५४४ विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात त्यापैकी २०२ रेल्वेगाड्या धावल्या नाहीत.

## सूरसप्तकतर्फे 'कभी कभी मेरे दिल में' रविवारी

**नागपूर:** सूर सप्तकतर्फे सिनेसृष्टीतील राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र व विनोद खन्ना या पाच सुपर स्टार्स वर चित्रित गाण्यांचा कार्यक्रम 'कभी कभी मेरे दिल में 'आयोजित केला आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असून रविवार दिनांक २ जानेवारीला संध्याकाळी ६ वाजता सायंटिफिक सभागृहात संपन्न होणार आहे. कार्यक्रम संकल्पना अध्यक्ष सुचित्रा कातरकर व निर्मिती कार्याध्यक्ष प्रा पद्मजा सिन्हा यांची आहे. अरुण ओझरकर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. निवेदन शुभांगी रायलू यांचे आहे. मुकुल पांडे, डॉ. अमोल कुळकर्णी, आशिष घाटे,निसर्ग राज,अरुण ओझरकर, योगेश देशपांडे, धीरज आटे, आदित्य फडके, पद्मजा सिन्हा, अश्विनी लुले, प्रतिक्षा पट्टलवार, डॉ. ऋचा येनुरकर, संगीता भगत, अर्चना उचके, लता पटेल, अनुजा जोशी, दीपाली पनके हे गायक कलाकार गीतं सादर करतील. त्यांना परिमल जोशी, पंकज यादव, नंदु गोहाणे, प्रमोद बावणे, आशिष घाटे, तुषार विघ्ने, गौरव टांकसाळे हे वादक कलाकार साथसंगत करतील. रसिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आयोजकांकडून आवाहन करण्यात आले आहे.

# नागपूरच्या सक्षमचे प्रयागराजमध्ये नेत्रकुंभ

## ५ लाख लोकांच्या नेत्रतपासणीचा संकल्प

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे जानेवारी महिन्यात 'महाकुंभ २०२५'ला सुरुवात होत आहे. सरकारच्या आकडेवारीनुसार ४० कोटी लोक महाकुंभाच्या दरम्यान प्रयागराजमध्ये येणार आहेत. परमेश्वराने निर्माण केलेली ही सुंदर सृष्टी प्रत्येकाला पाहता यावी, या उद्देशाने यंदाच्या महाकुंभामध्ये नागपूरच्या सक्षम संस्थेतर्फे प्रयागराज येथे 'नेत्रकुंभ' आयोजित करण्यात येणार आहे. या नेत्रकुंभात ५ लाख लोकांचा नेत्रतपासणीचा संकल्प सक्षमचा असल्याची माहिती राष्ट्रीय महासचिव उमेश अंधारे यांनी पत्रपरिषदेत दिली.



ते म्हणाले की 'दिव्यांग' हे देशाचे नागरिक असून त्यांनाही समान अधिकार आहे, असे सक्षम समजते. त्यामुळे दिव्यांगांचे शिक्षण, प्रशिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण देणे तसेच त्यांच्या विकलांगतेनुसार त्यांना सक्षम बनवण्याचे कार्य करते. २०. जून २००८ ला या संस्थेची स्थापना झाली होती.

'सक्षम' पूर्ण नाव 'समदृष्टी, क्षमता, विकास एवं अनुसंधान मंडळ' आहे. सक्षमचे मुख्य कार्यालय नागपूर येथे आहे. भारतात १ कोटी २५ लाख लोक डोळ्यांच्या आजाराने ग्रस्त आहे.

यामध्ये बहुतांश लोक परिस्थितीमुळे डोळ्यांचे उपचार करू शकत नाहीत. महाकुंभात सर्वच स्तरातील लोक येतात. त्यामुळे येथे नेत्रकुंभ आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. उत्तर प्रदेश सरकारने त्यासाठी १२ एकर जागा उपलब्ध केली आहे.

देशभरातून ५०० नेत्रतज्ज्ञ येथे सेवा देणार आहेत. या नेत्रकुंभातून ५० हजार लोकांचे मोतीबिंदूचे ऑपरेशन करण्याचे ध्येय असल्याचे अंधारे म्हणाले. पत्रपरिषदेला नामदेव अग्रवाल, अतुल पाठक, मिलिंद खग्रास आणि इतर उपस्थित होते.

# ११ व १२ जानेवारीला एलआयटीयूच्या माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठातील जागतिक माजी विद्यार्थ्यांच्या मेळावा (ग्लोबल ॲल्युमनी मीट : कनेक्ट - 2024-25) 11 व 12 जानेवारीला आयोजित करण्यात आला आहे. एलआयटीला राज्यशासित स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यानंतरचा हा दुसरा माजी विद्यार्थी मेळावा आहे. मेळाव्यात देश-विदेशात विविध क्षेत्रात एलआयटीचा नावलौकिक वाढवणारे माजी आणि विद्यमान विद्यार्थी हजेरी लावणार आहेत.

कनेक्ट 24-25 चे उद्घाटन 11 जानेवारीला होणार असून 12 तारखेला ज्वेल ऑफ एलआयटी अवार्ड्स हा विशेष कार्यक्रम होणार आहे. जग विख्यात केमिकल इंजिनिअर पद्मविभूषण डॉ. एम.एम. शर्मा हे प्रमुख पाहुणे रहातील. मुख्यमंत्री व एलआयटी विद्यापीठाचे संरक्षक देवेंद्र फडणवीस हे ऑनलाईन उपस्थित राहणार आहेत. एलआयटी विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ गर्व्हनन्सचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. गणपती यादव हे विशेष अतिथी राहणार असून, विद्यापीठाचे प्रमुख सल्लागार मोहन पांडे, अमेरिकेतील एलए टोटली ओसम ग्रुपचे संस्थापक-सीईओ व एलआयटीचे माजी विद्यार्थी लोकसारंग हरदास व प्रसिद्ध उद्योजक चैतन्य केमिकल इंडस्ट्रीजचे संचालक संतोष बोरगावकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

नागपुरात 1942 साली स्थापन झालेल्या एलआयटीमधून आतापर्यंत दहा हजारांहून अधिक रासायनिक अभियंते आणि तंत्रज्ञ तयार झाले आहेत. अनेक एलआयटीयन्स भारतातील अग्रणी उद्योग क्षेत्रामध्ये तसेच, आंतरदेशीय कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये उच्च व्यवस्थापन पदांवर कार्यरत आहेत. सध्या एलआयटी माजी विद्यार्थी संघटनेची सक्रिय जवळपास तीन हजारावर आहे.

आजी-माजी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष माधव लाभे, माजी अध्यक्ष अजय देशपांडे, सचिव उत्कर्ष खोपकर, सहसचिव सचिन पळसोकर यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी डॉ. सुगंधा गारवे, सहप्रमुख श्रीकांत गुडधे, डॉ. राजेश बिनीवाले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अनारक्षित लोकल मेमू गाड्यांच्या क्रमांकामध्ये बदल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

रेल्वे प्रशासनाच्या निदेर्शानुसार, नागपूर विभागातील प्रवासी विशेष गाड्या, इतर गाड्या आणि नियमित प्रवासी गाड्यांचे नवीन क्रमांक १ जानेवारी पासून लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार, नागपूर विभागात चालणाऱ्या अनारक्षित लोकल मेमू गाड्यांचे क्रमांक खालीलप्रमाणे बदलण्यात आले आहेत.



यात प्रामुख्याने गाडी क्रमांक ०१२०३ मेमू नागपूर ते आता गाडी क्रमांक ६१११७ या धावेल. तसेच गाडी क्रमांक ०१२०४ मेमू आमला ते नागपूर आता गाडी क्रमांक ६१११८ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३१५ मेमू वर्धा ते बल्लारशाह आता गाडी क्रमांक ६११२७ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३१६ मेमू बल्लारशाह ते वर्धा आता गाडी क्रमांक ६११२८ या नावाने धावेल. क्रमांक ०१३१७ मेमू आमला ते आता गाडी क्रमांक ६११२१ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३१८ मेमू इटारसी ते आमला आता गाडी क्रमांक ६११२२ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३१९ मेमू आमला ते छिंदवाडा आता गाडी क्रमांक ६११२३ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३२० मेमू छिंदवाडा ते आमला आता क्रमांक ६११२४ या नावाने धावेल. गाडी ०१३२१ मेमू आमला ते छिंदवाडा आता गाडी क्रमांक ६११२५ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३२२ मेमू छिंदवाडा ते आमला आता गाडी क्रमांक ६११२६ या नावाने धावेल.

गाडी क्रमांक ०१३२३ मेमू नागपूर ते आमला आता गाडी क्रमांक ६१११९ या नावाने धावेल. गाडी क्रमांक मेमू आमला ते नागपूर आता गाडी क्रमांक या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३६७ मेमू बडनेरा ते नरखेड आता गाडी क्रमांक ६११०३ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३६८ मेमू नरखेड ते बडनेरा आता गाडी क्रमांक ६११०४ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३६९ मेमू बडनेरा ते नरखेड आता गाडी क्रमांक या नावाने धावेल.

गाडी क्रमांक ०१३७० मेमू नरखेड बडनेरा आता गाडी क्रमांक ६११०६ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३७१ मेमू न्यू अमरावती ते वर्धा आता गाडी क्रमांक ६११०७ या नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३७२ मेमू वर्धा ते न्यू अमरावती आता गाडी क्रमांक ६११०८ या नावाने धावेल.

गाडी क्रमांक मेमू न्यू अमरावती ते नागपूर आता गाडी क्रमांक ६११०९ नावाने धावेल. गाडी क्रमांक ०१३७४ मेमू नागपूर ते वर्धा आता गाडी क्रमांक ६१११० या नावाने धावेल. यात प्रामुख्याने गाड्यांच्या वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# दत्तात्रय नगर उद्यानात सुरु असलेल्या कामाचे ऑडिट करण्याचे आयुक्तांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

नागपूर महानगरपालिकेतर्फे सक्करदरा येथील दत्तात्रय नगर उद्यान नावाने प्रसिद्ध असलेल्या संत ज्ञानेश्वर संजीवन समाधी उद्यानाची मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ अभिजीत चौधरी व आमदार मोहन मते यांनी संयुक्तरित्या गुरुवारी (ता. 2) पाहणी केली. मनपाच्या उद्यान विभागातर्फे येथे सुगंधित फुलांचे उद्यान तयार केले जात आहे.



मागील दीड वर्षांपासून येथे काम सुरु असून नागरिकांसाठी उद्यान बंद करण्यात आलेले आहे. संथ गतीने सुरु असलेल्या कामाबद्दल आयुक्त डॉ. चौधरी आणि आमदार मोहन मते यांनी नाराजी व्यक्त केली. डॉ. चौधरी यांनी उद्यानात सुरु असलेल्या कामाचे ऑडिट करण्याचे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. तसेच नागरिकांसाठी उद्यान सुरु करण्याचे देखील निर्देश उद्यान विभागाला दिले. संत ज्ञानेश्वर संजीवन समाधी उद्यानामध्ये संथ गतीने सुरू असलेल्या कामाबद्दल आमदार मोहन मते यांनी आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानुसार आयुक्तांनी उद्यानातील कामाचे निरीक्षण केले.

नागपूर सुधार प्रन्यासतर्फे तयार करण्यात आलेले सदर उद्यान नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यात आले होते. सात एकरच्या या उद्यानामध्ये पाच एकर परिसरात मनपा तर्फे मोगरा, मधू मालती, सोनचाफा, जाई जुई, चमेली, रांझाई, रातराणी, पारिजात, देशी गुलाब या सारख्या सुगंधित फुलांचे उद्यान दोन कोटी रुपये निधी खर्च करून तयार केले जात आहे. उद्यानाचे काम सुरु असल्यामुळे नागरिकांना येथे प्रवेश बंदी आहे. आयुक्तांनी उद्यानात सुरु असलेल्या कामाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आणि अधीक्षक अभियंता श्री. मनोज तालेवार यांना सुरु असलेल्या कामाची विशेषज्ञांकडून तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच उद्यानात किरकोळ दुरुस्तीचे काम करण्याचेही आदेश दिले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, उपायुक्त गणेश राठोड, उद्यान अधीक्षक अमोल चौरपागार, नेहरू नगर झोनचे सहायक आयुक्त विकास रायबोले, कार्यकारी अभियंता नरेश शिंगनजोडे, कमलेश चव्हाण आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.